

ऑगस्ट २०२५/पाने ६८/किंमत ₹१०

# लोकराज्य

शिवनेरी
रायगड
प्रतापगड
पन्हाळा
लोहगड
सिंधुदुर्ग
राजगड
सुवर्णदुर्ग
विजयदुर्ग
साल्हेर
खांदेरी
जिंजी

## छत्रपतींच्या दुर्गवैभवाला वैश्विक मानवंदना!

जागतिक वारसा नामांकन यादीत १२ किल्ले समाविष्ट!


महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
छत्रपती शिवाजी महाराजांचे
१२ किल्ले युनेस्को जागतिक वारसा नामांकन
यादीत समाविष्ट झाल्याबद्दल
महाराष्ट्रातील जनतेचे हार्दिक अभिनंदन!
शिवनेरी
राजगड
रायगड
प्रतापगड
पन्हाळा
साल्हेर
लोहगड
खांदेरी
सुवर्णदुर्ग
विजयदुर्ग
सिंधुदुर्ग
जिंजी
महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा!
आपल्या गौरवशाली इतिहासाची जागतिक स्तरावर घेतलेली दखल,
ही सर्व मराठी माणसांसाठी अभिमानाची बाब आहे.
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
ॲड. आशिष शेलार

## ६ अभिमानाचा क्षण!

मराठा मिलिटरी लँडस्केप संकल्पनेंतर्गत १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा नामांकन दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा आणि सैन्यशास्त्रावर आधारित नीतीचा जागतिक स्तरावर गौरव झाला आहे. शिवछत्रपतींचा एक मावळा आणि राज्यातील १४ कोटी जनतेचा प्रतिनिधी म्हणून माझ्यासाठी हा अतिशय अभिमानाचा क्षण आहे.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## ८ गडकोटांना युनेस्कोचा मुजरा!

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्य उभारणीच्या संघर्षाचे साक्षीदार असलेल्या महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, लोहगड, शिवनेरी, पन्हाळा, साल्हेर, खांदेरी, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी या १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाला, ही महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**



## ७ शिवरायांच्या गडकिल्ल्यांना जागतिक गौरवाचे कोंदण!

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकामुळे प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयात विशेष स्थान प्राप्त झालेल्या 'रायगडा'सह राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच महाराष्ट्राबाहेरही मराठ्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारा तमिळनाडूतील 'जिंजी' किल्लाही यात आहे. या किल्ल्यांच्या कणाकणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाच्या गाथा गुंजत आहेत.

**- एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

## ९ छत्रपतींच्या कर्तृत्वाला जगाचा सलाम!

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांना जागतिक वारसा नामांकन मिळणे ही अत्यंत गौरवाची बाब आहे. तसेच या नामांकनामुळे आपल्या महाराष्ट्रातील पर्यटन वाढीस लागणार आहे. जागतिक पर्यटक हे देशातील युनेस्को नामांकित स्थळांना अवश्य भेट देतात. त्यामुळे आपल्या पर्यटन अर्थव्यवस्थेला निश्चितच चालना मिळेल. जगात भारी असलेल्या आपल्या सांस्कृतिक ठेव्याला जगाच्या नकाशावर अधिकृतपणे महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याचा हा प्रयत्न आहे.

**- ॲड. आशिष शेलार, सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री**


समृद्ध संस्कृतीचा ठेवा! — ११
मीनल जोगळेकर

छत्रपतींच्या दुर्गवैभवाला वैश्विक मानवंदना! — १३
मीनल जोगळेकर

शिवछत्रपतींच्या गडकोटांचे वास्तुशास्त्रीय महत्त्व — ३८
संजय डी.ओरके

शिवकालीन पराक्रमाचे साक्षीदार! — ४४
हेमंतकुमार चव्हाण

लोकाभिमुख महसूल विभाग — ४८
ब्रिजकिशोर झंवर

पणन सुविधांना बळकटी! — ५१
ब्रिजकिशोर झंवर

युवाशक्तीला नवी दिशा! — ५४
श्रद्धा मेश्राम

सेवा, संकल्प, विकासाचा साज — ५६
गजानन जाधव

महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ नागपूरचा शैक्षणिक मानबिंदू! — ५७
पल्लवी धारव

रोहिणी ग्रामपंचायतीची ई-गव्हर्नन्समध्ये भरारी! — ५९
विलास बोडके

सरन्यायाधीशांचा हृद्य सत्कार! — ६१
किरण वाघ

पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा — ६३
नंदकुमार वाघमारे

जीवनमूल्यांचे रक्षक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी — ६५
हरिहर पांडे

वर्ष ७६ वे | अंक ७ | ऑगस्ट २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई – ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# 'विकसित महाराष्ट्र २०४७' व्हिजन डॉक्युमेंटची तयारी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली '१०० दिवस' कार्यालयीन सुधारणा उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला असून पुढील १५० दिवसांच्या सुधारणा टप्प्यास गती मिळाली आहे. या उपक्रमांतर्गत 'विकसित भारत २०४७'च्या धर्तीवर 'विकसित महाराष्ट्र २०४७' व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

या सुधारणा कार्यक्रमात लोकाभिमुखता, सुलभता आणि उत्तरदायित्व या तीन मूलभूत तत्त्वांवर भर देण्यात आला. राज्यातील १२,५०० कार्यालयांनी सहभाग नोंदवत कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडवले आहेत. ४८ विभागांनी आपले कार्य प्रातिनिधिक स्वरूपात सादरीकरण केले.




'Ease of Living', 'Ease of Doing Business' आणि 'G2G - Ease of Working' या क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्यासाठी केंद्र-राज्य सरकार यांचा समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. ६ मे ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत त्रैवार्षिक टप्प्यांत (२०२९, २०३५, २०४७) आराखडा तयार करून 'विकसित महाराष्ट्र २०४७' ची दिशा स्पष्ट केली जाणार आहे.

यावेळी १०० दिवसांतील उत्कृष्ट कामगिरीसाठी विविध विभाग व अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. मुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच महिला व बालविकास, कृषी, ग्रामविकास, परिवहन, सांस्कृतिक, जलसंपदा, खनिकर्म, उच्च शिक्षण, कामगार, वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन व रोजगार हमी यांसारख्या विभागांनी १०० टक्के उद्दिष्टपूर्ती केली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या सेवाकर्मी पुरस्कार अंतर्गत वित्त, सार्वजनिक बांधकाम व कौशल्य विकास विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा ही सन्मान यावेळी करण्यात आला.

मुख्यमंत्र्यांनी शेवटी आवाहन केले की, सर्वांच्या सामूहिक इच्छाशक्तीने 'विकसित महाराष्ट्र' साकार करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करू या.

# महाराष्ट्राच्या मानबिंदूंचा वैश्विक सन्मान!

राज्यात सध्या जणू विविध सकारात्मक घडामोडींचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. इतिहासाच्या ठेव्यापासून ते आधुनिक तंत्रज्ञानापर्यंत, पर्यावरणीय जाणिवांपासून ते प्रशासकीय सुधारणांपर्यंत... या परिवर्तनाच्या लाटेमुळे राज्य नवनिर्माणाच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे. राज्याच्या सामाजिक, तांत्रिक; तसेच प्रशासनिक प्रागतिकतेमुळे देशालाही नवी दिशा मिळत आहे. या साऱ्या उपलब्धींसोबतच महाराष्ट्राच्या वारशाचा गौरवही वेळोवेळी होत असतो. त्यातील एक सोनेरी पर्व म्हणजे दिनांक ११ जुलै २०२५ रोजी आपल्या सर्वांचे आराध्य असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अतुलनीय शौर्याची साक्ष देणाऱ्या शिवनेरी, राजगड, रायगड, प्रतापगड, पन्हाळा, साल्हेर, लोहगड, खांदेरी, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जिंजी या १२ किल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत झाला. ही आपल्या सर्वांसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे.

जागतिक पातळीवर शिवरायांच्या किल्ल्यांचा सन्मान होणे हे आपल्या सर्वांसाठी प्रचंड अभिमानास्पद आहे. त्यांच्या शौर्याची गाथा, लोकाभिमुख व दूरदृष्टी दर्शविणाऱ्या प्रशासनाचे धडे, स्वराज्य स्थापित करणारी युद्धनीती, त्यांनी दूरदृष्टीने उभारलेले गडकिल्ले या साऱ्या बाबी आजही आपल्या सर्वांना प्रेरणा देतात. या पार्श्वभूमीवर शिवरायांच्या १२ किल्ल्यांचा आंतरराष्ट्रीय पातळीवर युनेस्कोच्या माध्यमातून झालेला सन्मान कायमस्वरूपी टिकवून ठेवण्यासाठी त्यांचे शाश्वत संवर्धन व जतन करणे हीदेखील आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. महाराष्ट्राचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जगाच्या नकाशावर ठळकपणे उठून दिसावा, यासाठी केंद्र सरकारच्या मदतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयदेखील महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

शिवरायांची गौरवगाथा सांगणाऱ्या किल्ल्यांचा जागतिक पातळीवर सन्मान ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याने शासनाचे मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य' मासिकाच्या या अंकातदेखील या सुवर्णक्षणाच्या अनुषंगाने अधिकाधिक माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

राज्य शासन प्रत्येक क्षेत्रात आवश्यक त्या सुधारणा करून लोकाभिमुख योजनांची सर्वसामान्य जनतेसाठी प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यावर भर देत आहे. यानुसारच लोकाभिमुख असलेला महसूल विभाग, राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमाल विक्रीव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पणन विभागाच्या माध्यमातून आधुनिक संसाधनयुक्त उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधा; तसेच गडचिरोलीसारख्या अतिदुर्गम भागातील जिल्ह्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासाची किनार लाभत आहे. धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यातील रोहिणी ग्रामपंचायतीची ई-गव्हर्नन्समध्ये राष्ट्रीय पातळीवर घेतलेली भरारी यांसारख्या लेखांसोबतच महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले न्यायमूर्ती भूषण गवई यांची न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च पदावर नियुक्ती झाल्यानंतर राज्याच्या विधानमंडळाने केलेला त्यांचा सन्मान आणि मानवी मूल्यांना नवसंजीवनी देणाऱ्या श्री चक्रधर स्वामींच्या तत्त्वज्ञानाची माहिती देणारा लेख अशा विविध विषयांवरील माहितीपूर्ण लेखांचा समावेश 'लोकराज्य'च्या या अंकात करण्यात आला आहे. नेहमीप्रमाणेच हा अंकदेखील वाचनीय ठरेल, अशी आशा आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**मराठा मिलिटरी लँडस्केप संकल्पनेंतर्गत १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा नामांकन दिले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा, कर्तृत्वाचा आणि सैन्यशास्त्रावर आधारित नीतीचा जागतिक स्तरावर गौरव झाला आहे. शिवछत्रपतींचा एक मावळा आणि राज्यातील १४ कोटी जनतेचा प्रतिनिधी म्हणून माझ्यासाठी हा अतिशय अभिमानाचा क्षण आहे.**

# अभिमानाचा क्षण!

**देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

काही क्षण असे असतात की, ज्या वेळी आपली छाती अभिमानाने भरून येते. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात जेव्हा मी 'मराठा मिलिटरी लँडस्केप' संकल्पनेंतर्गत १२ किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा नामांकन दिल्याची घोषणा केली, त्या क्षणी एक मराठी माणूस म्हणून, छत्रपतींचा एक मावळा म्हणून, राज्यातील १४ कोटी जनतेचा प्रतिनिधी म्हणून माझ्यासाठी अभिमानाचा क्षण होता.

छत्रपती शिवाजी महाराज केवळ राज्यकर्ते नव्हते, ते भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अध्वर्यू होते. भारताचा आत्मगौरव पुन्हा मिळवून देणारे, गुलामगिरीच्या विळख्यात अडकलेल्या भारतीय समाजमनात विजिगीषुवृत्तीची पुनर्स्थापना करणारे युगपुरुष होते. त्यांच्या कार्य, कर्तृत्वाचा आणि सैन्यशास्त्रावर आधारित नीतीचा जागतिक स्तरावर गौरव झाला आहे. या १२ किल्ल्यांपैकी ११ किल्ले आपल्या महाराष्ट्रात असून, एक किल्ला तामिळनाडूमध्ये आहे. जरी तो तामिळनाडूत असला, तरी मराठ्यांच्या पराक्रमाचा तोही साक्षीदार आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच वेळी १२ किल्ल्यांना जागतिक वारसा नामांकन मिळालं, हा क्षण ऐतिहासिक आहे.

हा यशस्वी प्रयत्न साकारण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प, त्यांचं मार्गदर्शन आणि पाठिंबा फार मोलाचा ठरला. मुख्यमंत्री कार्यालयातील अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे आणि पुरातत्त्व विभागातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मी खास अभिनंदन करतो.



छत्रपती शिवाजी महाराज केवळ पराक्रमी लढवय्ये नव्हते, त्यांनी लष्करी गरजेनुसार भूगोलाचा सखोल अभ्यास करून गडकोटांचं सुव्यवस्थित जाळं उभारलं. डोंगरांच्या माथ्यांवर गिरीदुर्ग, किनाऱ्यांवर सागरीदुर्ग, तर समुद्रात बेटांवर जलदुर्ग उभारले, हे केवळ स्थापत्याचं कौशल्य नव्हतं, तर स्वराज्यरक्षणाची अजोड यंत्रणा होती.

युनेस्कोने नामांकन दिलेले १२ किल्ले म्हणजे इतिहासाचे बोलके पुरावे आहेत. या दगडांमध्ये शिवकालीन पराक्रमाची साक्ष आहे. आजही या गडांवर उभं राहून कान दिल्यास 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष ऐकू येईल, इतकी ही ठिकाणं प्रेरणादायी आहेत.

खांदेरी किल्ल्याचं उदाहरण घ्या. इंग्रज आरमाराशी समुद्रात झुंज देत असताना मराठ्यांनी बेटावर गड उभारला. एकीकडे आरमार लढत होतं, तर दुसरीकडे गवंडी किल्ला बांधत होते. ही केवळ बांधकामाची कथा नाही, ही शौर्य, संकल्पशक्ती आणि दूरदृष्टी यांची गाथा आहे.

सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, लोहगड, प्रतापगड, साल्हेर, राजगड या गडांनी स्वराज्याचं रक्षण करत ते फुलवलं. या गडांभोवती घडलेल्या अनेक लढाया, मुत्सद्देगिरीचे निर्णय आणि मावळ्यांच्या बलिदानांनी इतिहास घडवला. शिवनेरी, रायगड, पन्हाळा, प्रतापगड यांसारख्या गडांनी सर्व जाती-धर्मातील माणसांना एकत्र आणून स्वराज्याची प्रेरणा दिली.

प्रतापगडाच्या पायथ्याशी अफझलखानाचा पराभव शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचं आणि मुत्सद्देगिरीचं अजरामर उदाहरण आहे. हे गड केवळ ऐतिहासिक वास्तू नाहीत, तर आपली राष्ट्रीय अस्मिता आहेत.

तामिळनाडूतील जिंजी किल्ल्यालाही यादीत स्थान मिळणं हे विशेष आहे. महाराजांच्या पश्चात काळात छत्रपती राजाराम महाराज यांनी याच किल्ल्यावरून स्वराज्याचे सूत्र हाती घेतले आणि मोगलांच्या वेढ्यातून सावरलेल्या स्वराज्याला पुनरूज्जीवित केले.

गड केवळ ऐतिहासिक ठिकाणं नाहीत. ते स्वतंत्रतेचे, समतेचे आणि राष्ट्राभिमानाचे शिक्षक आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी निसर्ग, भूगोल आणि स्थापत्य यांचा यथायोग्य वापर करून लष्कर उभं केलं. हे गड त्या विज्ञानाचे मूर्तस्वरूप आहेत.

युनेस्कोच्या नामांकनामुळे आता आपण सर्व मराठी माणसांची जबाबदारीही वाढली आहे. हे किल्ले पाहण्यासाठी जगभरातील इतिहाससंशोधक, पर्यटक आणि अभ्यासक येणार आहेत. त्यांना या परिसरातील लोकांच्या जगण्यातून गडांचं महत्त्व दिसायला हवं.

राज्य शासन या गडांवर आवश्यक ती पायाभूत सुविधा, माहिती केंद्रे, स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था उभारेलच; पण या गडांवरील वातावरण केवळ शासनाच्याच नव्हे, तर आपल्यासारख्या प्रत्येक मावळ्याच्या वागणुकीवरही अवलंबून असेल. आपण तिथे जाताना ही ठिकाणं ऐतिहासिक स्मारक आहेत, याची जाणीव ठेवली पाहिजे.

गडांवरील ट्रेक केवळ साहसयात्रा नसते, ती आपल्या पूर्वजांशी केलेली एक संवादयात्रा असते. प्रत्येक गडावरचा अनुभव ही आपल्या इतिहासाला अर्पण केलेली भावांजली असते. यामुळे या घडीला फक्त अभिनंदनाचेच नव्हे, तर जबाबदारीचेही भान ठेवायला हवे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभारलेले हे गड आजही आपल्याला सांगत आहेत - स्वराज्य फक्त जिंकायचं नाही, तर जपायचंही असतं.

**शब्दांकन : प्रवीण कुलकर्णी,**
माहिती अधिकारी, जनसंपर्क कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकामुळे प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयात विशेष स्थान प्राप्त झालेल्या रायगडासह राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच महाराष्ट्राबाहेरही मराठ्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारा तामिळनाडूतील 'जिंजी' किल्लाही यात आहे. या किल्ल्यांच्या कणाकणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाच्या गाथा गुंजत आहेत.**

# शिवरायांच्या गडकिल्ल्यांना जागतिक गौरवाचे कोंदण!

**एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

*शिवरायांचे आठवावे रूप*
*शिवरायांचा आठवावा प्रताप...*

छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या काळात झालेली गडकिल्ल्यांची निर्मिती ही महाराजांच्या दूरदृष्टीची आणि मावळ्यांच्या पराक्रमाची साक्ष देते. त्यापैकी महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील एक अशा १२ किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाले, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे.

संपूर्ण देशवासियांचे आराध्यदैवत, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे किल्लेवैभव असलेले हे १२ किल्ले ही युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याने 'अद्वितीय वैश्विक मूल्य' म्हणून त्यांचा आता समावेश करण्यात आला आहे. स्वराज्यनिर्मिती सोबतच ती टिकविण्यासाठी महाराजांनी हे किल्लेवैभव उभारले. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांचे माची स्थापत्य हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग आहेत. माची स्थापत्य हे जगातील कोणत्याही किल्ल्यात दिसून येत नाही. माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेचा आणि युद्धकौशल्याचा मुत्सद्दीनीतीने रचलेला भाग आहे. हेच 'अद्वितीय वैश्विक मूल्य' आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील संरक्षण सिद्धता, बांधकाम आणि मजबुती यांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने हे किल्ले आजही अत्यंत महत्त्वाचे आहेत, असे युनेस्कोने नमूद केले आहे. मी मुख्यमंत्री असताना युनेस्को या जागतिक संघटनेकडे याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता आणि आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात तो मान्य झाला आहे. 'विकास आणि विरासत' अशी घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली आहे. त्यानुसार शासनाने विकासात आघाडी घेतली आहेच, शिवाय 'विरासत' म्हणजेच आपला समृद्ध मराठी वारसा जागतिक पातळीवर पोहोचवण्यातही या निमित्ताने मोठे यश मिळवले आहे. हा क्षण माझ्या दृष्टीने सार्थकतेची आणि समाधानाची भावना निर्माण करणारा आहे.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकामुळे प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयात विशेष स्थान प्राप्त झालेल्या 'रायगडा'सह राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच महाराष्ट्राबाहेरही मराठ्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारा तमिळनाडूतील 'जिंजी' किल्लाही यात आहे. या किल्ल्यांच्या कणाकणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाच्या गाथा गुंजत आहेत.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत दर्जा मिळाल्यामुळे छत्रपती शिवरायांच्या या १२ किल्ल्यांचे महत्त्व जगापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत या किल्ल्यांची नोंद झाल्यामुळे संपूर्ण जगाला शिवरायांचे इतिहासातील महत्त्व कळेल. तसेच जगभरातले पर्यटक या किल्ल्यांना भेट देतील. त्याचप्रमाणे युनेस्को शास्त्रशुद्ध पद्धतीने या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी मदत करू शकेल. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळात समाविष्ट झाल्यामुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील, पर्यटकांच्या संख्येत वाढ झाल्याने देशाच्या अर्थव्यवस्थेलाही फायदा होण्यास मदत होईल.

मी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचेदेखील आभार मानतो. त्यांनी दिलेला पाठिंबा आणि केंद्र सरकारकडून सक्रिय सहभाग ही अत्यंत मोलाची बाब ठरली. भारतीय पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, आणि सांस्कृतिक कार्य मंत्रालयाने यात मोठी मदत केली. हा टप्पा गाठण्यासाठी अनेकांचे हातभार लाभले त्यांचेही मी आभार मानतो.

मी मुख्यमंत्री असताना आग्रा येथील लाल किल्ल्यात शिवजयंती साजरी करण्यासाठी पुरातत्त्व खात्याची परवानगी मिळवून दिली होती. आता जागतिक वारसा म्हणून १२ किल्ल्यांना मान्यता मिळाली आहे. या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांची गौरवगाथा जगासमोर येणार आहे, याचा मला विशेष आनंद आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, तत्कालीन सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि प्रधान सचिव विकास खारगे यांनी केलेला पाठपुरावा कौतुकास्पद आहे. त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

**शब्दांकन : अजय जाधव,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्य उभारणीच्या संघर्षाचे साक्षीदार असलेल्या महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, लोहगड, शिवनेरी, पन्हाळा, साल्हेर, खांदेरी, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि तामिळनाडूतील जिंजी या १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाला, ही महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.**

# गडकोटांना युनेस्कोचा मुजरा!

**अजित पवार,** उपमुख्यमंत्री

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक गडकिल्ल्यांनी केवळ महाराष्ट्राच्या नव्हे, तर संपूर्ण भारतीय इतिहासाच्या जडण-घडणीत मोलाचे योगदान दिले आहे. हे गडकोट म्हणजे केवळ दगडधोंड्यांचे बांधकाम नव्हे, तर मराठी अस्मितेचे, आत्मबळाचे आणि स्वातंत्र्य संकल्पनेचे भक्कम बुरूज आहेत. जागतिक वारसा यादीत समावेश झाल्यामुळे स्वराज्याच्या इतिहासाला जागतिक पातळीवर ओळख मिळाली असून, हा महाराष्ट्राच्या मातीला मिळालेला सन्मान आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे दूरदृष्टीचे अध्वर्यू होते. त्यांनी केवळ सामरिक दृष्टिकोनातून किल्ल्यांची उभारणी केली नाही, तर त्यामागे एक ठोस धोरण, समाजघटकांचे एकत्रीकरण आणि स्थापत्यशास्त्राचा सखोल अभ्यास होता. हिरोजी इंदुलकर यांच्यासारखे स्थापत्यकार महाराजांनी घडवले, ज्यांनी स्वराज्याची राजधानी दुर्गदुर्गेश्वर रायगडाची उभारणी केली. रायगडावर प्रासाद, बारा महाल, गजशाळा, नरेंद्रसदन, स्तंभ, उद्याने, वापी-कूप अशा अनेक रचनांची उभारणी केली. रायगडाच्या पायऱ्यांवर कोरलेली सेवेचे ठायी तत्पर हिरोजी इंदुलकर... ही अक्षरे आजही त्या सेवाभावाची, स्वराज्य निष्ठेची आणि महाराजांच्या न्यायप्रियतेची साक्ष देतात. ही पायरी म्हणजे स्थापत्य आणि श्रद्धेची संगमस्थळी उभी असलेली शौर्यगाथा आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरापगड जाती, बारा बलुतेदार, मावळे यांना एकत्रित करून स्वराज्याची उभारणी केली. स्वराज्य म्हणजे रयतेचं राज्य, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केलं. त्या काळात जेव्हा इतर राजांनी, सम्राटांनी आपल्या वैभवासाठी महाल उभारले, तेव्हा छत्रपती शिवरायांनी भक्कम गडकिल्ल्यांची उभारणी करून लोकांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची व्यवस्था उभी केली. शिवछत्रपतींच्या या गडकिल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत समावेश होणे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य, विचार आणि मावळ्यांचा पराक्रम यांचे जागतिक स्तरावर पुनःप्रस्थापन होणे होय. आता जगभरातून या गडकिल्ल्यांचा अभ्यास सुरु होईल, भेटी दिल्या जातील. गडकिल्ले उभारणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या चरित्राचा अभ्यास या निमित्ताने घडेल. छत्रपती शिवरायांचे स्वराज्य ही केवळ लढायांची कहाणी नव्हती, तर ती सांस्कृतिक, स्थापत्य, लोककल्याणकारी राज्याची आणि सामाजिक समतेची चळवळ होती, ही बाब या निमित्ताने जगासमोर येईल.



युनेस्कोच्या मान्यतेमुळे या दुर्गांभोवती पर्यटनाच्या नव्या संधी उभ्या राहतील. स्थानिकांसाठी रोजगाराच्या शक्यता वाढतील. नवी अर्थव्यवस्था उदयाला येईल. या निमित्ताने जगभरातील अभ्यासक, संशोधक, इतिहासप्रेमी यांच्यासाठी नवी दारे उघडली आहेत. गडकिल्ल्यांना मिळालेली ही जागतिक मान्यता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दूरदृष्टीचा जागतिक स्वीकार आहे.

या यशासाठी राज्य सरकारने शास्त्रीय, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक बाबींचा सखोल अभ्यास करून मराठा लष्करी स्थापत्य या संकल्पनेवर आधारित प्रस्ताव तयार केला होता. प्रधानमंत्री कार्यालयाने या प्रस्तावाची निवड करून युनेस्कोकडे सुपुर्द केली. केंद्र शासनाच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आणि महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने अथक परिश्रम करून हे यश मिळवले. ही मान्यता म्हणजे फक्त इतिहासाचा गौरव नव्हे, तर ही नव्या पिढीला आपल्या परंपरेची ओळख करून देणारी, त्यात अभिमान वाटावा अशी प्रेरणा देणारी गोष्ट आहे. येत्या काळात या गडकिल्ल्यांचे संवर्धन, संरक्षण आणि माहितीपट, संग्रहालये, अभ्यासक्रम यांच्यामार्फत त्यांच्या कथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

शिवकालीन दुर्गसंपत्तीला मिळालेली ही जागतिक मान्यता म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक तेजस्वी पर्व आहे. यामुळे स्वराज्य, स्वाभिमान आणि मराठी अस्मिता या संकल्पनांना नवसंजीवनी मिळाली आहे. यासाठी मी, महाराष्ट्र राज्याचा उपमुख्यमंत्री तसेच शिवप्रेमी म्हणून, देशाचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे, सांस्कृतिक कार्य विभागाचे व सर्व संबंधितांचे मनःपूर्वक आभार मानतो. याचबरोबर सर्व महाराष्ट्रवासीयांचे, शिवप्रेमींचे आणि मराठी बांधवांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. शिवछत्रपतींचा हा वारसा पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या साथीने आम्ही कटिबद्ध आहोत.

राज्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या किल्ल्यांच्या जपणूक व संरक्षणासाठी ४०३ कोटी रुपये, रायगड किल्ला व परिसर विकास आराखड्यांतर्गत ५० कोटी रुपयांची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात केली आहे.

शिवछत्रपतींनी उभारलेल्या या गडकिल्ल्यांची जपणूक, संवर्धन आणि त्यांचा वारसा भविष्यातल्या पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा दृढसंकल्प करू या..

**शब्दांकन : संग्राम इंगळे,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांना जागतिक वारसा नामांकन मिळणे ही अत्यंत गौरवाची बाब आहे. तसेच या नामांकनामुळे आपल्या महाराष्ट्रातील पर्यटन वाढीस लागणार आहे. जागतिक पर्यटक हे देशातील युनेस्को नामांकित स्थळांना अवश्य भेट देतात. त्यामुळे आपल्या पर्यटन अर्थव्यवस्थेला निश्चितच चालना मिळेल. जगात भारी असलेल्या आपल्या सांस्कृतिक ठेव्याला जगाच्या नकाशावर अधिकृतपणे महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याचा हा प्रयत्न आहे.**

# छत्रपतींच्या कर्तृत्वाला जगाचा सलाम!

**ॲड. आशिष शेलार,**
मंत्री, सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान



अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असताना स्वभाषा, स्वधर्म आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ घालून जगाला हेवा वाटेल, असे रयतेचे राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे कर्तृत्व म्हणजे एक जाज्वल्य इतिहास, संघर्ष, तेजाची धगधगती प्रेरणा. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, त्यांच्या अचंबित करून टाकणाऱ्या युद्धनीतीची, वास्तुकलेची साक्ष आजही देतात. त्यामुळेच अटकेपार झेंडा फडकवणाऱ्या मराठा साम्राज्य आणि मराठा साम्राज्याचा इतिहास जगासमोर यायला हवा. म्हणून महाराष्ट्र शासनाने केलेल्या प्रयत्नांना मोठे यश आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरणी नतमस्तक होण्याची ही संधी आम्हाला मिळाली यापेक्षा भाग्य ते काय?

महाराष्ट्र राज्याला गडकोटांच्या रूपाने बहुमूल्य असा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. सह्याद्रीच्या रूपाने लाभलेले नैसर्गिक संरक्षण त्याच्या अंगाखांद्यावरील अनेक किल्ल्यांनी अभेद्यच केले आहे. या भौगोलिक स्थितीचा पुरेपूर वापर करून छत्रपती शिवाजी महाराज यांनीदेखील स्वराज्य रक्षणासाठी अनेक किल्ल्यांची उभारणी केली व पूर्वी बांधलेल्या किल्ल्यांची पुनर्बांधणी करून स्वराज्य निर्मितीसाठी त्याचा खुबीने वापर केला आहे. संशोधकांनी महाराष्ट्रात आजमितीस जवळजवळ ४५० किल्ल्यांची नोंद केली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील किल्ले उभ्या आशियाच्या इतिहासात सर्वाधिक घनतेने अस्तित्वात असलेले दिसून येतात. स्वराज्याचे रक्षण करणाऱ्या या किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळावा, म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुढाकार घेऊन भारतातील मराठा लष्करी भूप्रदेश (Maratha Military Landscape of India) या नावाने युनेस्को जागतिक वारसा नामांकन प्राप्त करण्यासाठीचा प्रस्ताव युनेस्कोकडे सादर करण्यात आला होता.

महाराष्ट्रात मुंबई शहर परिसरातील घारापुरी लेणी, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, व्हिक्टोरिया व गोथिक आर्ट डेको इमारतींचा समुच्चय ही तीन आणि उर्वरित महाराष्ट्रात केवळ अजिंठा व वेरूळ लेणी ही सांस्कृतिक, तर पश्चिम घाट हे नैसर्गिक वारसा स्थळ म्हणून युनेस्कोने मानांकित केलेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने राज्यातील अधिकाधिक वारशांच्या नामांकनासाठी विडा उचलला आहे.

महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी किल्ला हे ११ व तामिळनाडूतील एक जिंजी किल्ला या युनेस्कोच्या निकषांमध्ये येतील, अशा उत्कृष्ट सार्वत्रिक मूल्यांवर आधारित किल्ल्यांची अर्थात उत्कृष्ट वैश्विक मूल्य (Outstanding Universal Value) असलेल्या किल्ल्यांची संचालनालयाने निवड केली होती. या १२ किल्ल्यांमध्ये साल्हेर, खांदेरी, राजगड आणि प्रतापगड किल्ला हे राज्य संरक्षित स्मारके असून हे किल्ले पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणात आहेत. शिवनेरी किल्ला, लोहगड, रायगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व जिंजी किल्ला (तामिळनाडू) हे आठ किल्ले राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित असून केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या नियंत्रणात आहेत. या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत २०२२ मध्ये समावेश करण्यात आला आहे. २०२४-२५ या वर्षाकरिता हा प्रस्ताव 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून घोषित करण्याकरिता केंद्र शासनाकडून युनेस्कोकडे नामांकनासाठी पाठविण्यात आले होते.

जागतिक वारसा समितीचे ४६वे अधिवेशन जुलै २०२४ मध्ये भारतात प्रथमच नवी दिल्ली येथे संपन्न झाले. या अधिवेशनादरम्यान उपरोक्त १२ किल्ले जागतिक स्तरावर अधोरेखित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाद्वारे या किल्ल्यांच्या प्रतिकृती (स्केल मॉडेल) आणि माहितीफलक प्रदर्शित करण्यात आले. येथे आशियातील लष्करी भूप्रदेश या विषयावर झालेल्या चर्चासत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांसोबतच पुरातत्त्व संचालनालयाचे अधिकारी, डेक्कन विद्यापीठ, भारतीय विज्ञान एवं अनुसंधान संस्था, पुणे येथील तज्ज्ञांनी महाराष्ट्र शासनच्या वतीने सहभाग नोंदवून मराठा लष्करी स्थापत्याचे महत्त्व जगासमोर अधोरेखित केले.

जागतिक वारसा समितीच्या ४६व्या अधिवेशनाचे अध्यक्ष विशाल शर्मा व

भारताचे स्थायी प्रतिनिधी, युनेस्को पॅरिस यांना ऑगस्ट २०२४ मध्ये भारतातील या नामांकन प्रक्रियेचे ठोस समर्थन व्हावे व मार्गदर्शन करण्याकरिता आमंत्रित करून सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल मुंबई येथे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पहिली बैठक झाली आणि या विषयाचे काम सुरू झाले.

या प्रस्तावाची तांत्रिक पडताळणी करण्याकरिता ICOMOS तज्ज्ञ श्री. ह्वाजोंग ली (कोरिया) यांनी सप्टेंबर-ऑक्टोबर २०२४ मध्ये महाराष्ट्र व तामिळनाडू राज्यांतील किल्ल्यांना भेट दिली. त्यानंतर या प्रस्तावाबाबत ICOMOS व महाराष्ट्र शासनाचे शिष्टमंडळ यांच्यात बैठक होणे आवश्यक आहे, असे लक्षात आले. त्या अनुषंगाने माझ्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाच्या शिष्टमंडळाने फेब्रुवारी २०२५ मध्ये युनेस्को, पॅरिस, फ्रान्स येथे दौरा करून ICOMOS व युनेस्कोच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. जागतिक वारसा नामांकनाचा निर्णय हे युनेस्कोचे सदस्य देश मतदानाद्वारे घेतात. त्यामुळे या देशांशी संपर्क साधून पॅरिस येथे होणाऱ्या आमसभेत हा विषय मांडून मतदानाद्वारे हे नामांकन मिळविण्यासाठी भारत सरकारतर्फे राजनैतिक स्तरावर हालचाली सुरू झाल्या. विदेश मंत्रालयातर्फे सदर देशांच्या राजदूत कार्यालयाशी संपर्क करून नवी दिल्ली येथे २७ जून २०२५ रोजी सचिव, संस्कृती मंत्रालय, भारत सरकार व अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या उपस्थितीत बैठक घेतली. या व्यतिरिक्त सर्व सदस्य देशातील तज्ज्ञांशी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी एकत्रितरीत्या तांत्रिक सादरीकरण करून भारताची बाजू सदस्य देशांसमोर विस्तृतपणे मांडली.

या सर्व प्रक्रियेमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे पाठबळ आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही मोलाचे मार्गदर्शन होते. यांच्यासह आमच्या विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पुरातत्त्व विभागाचे संचालक तेजस गर्गे आणि आम्ही सगळ्यांनी परिश्रमपूर्वक एकत्र काम करून हे यश मिळवले. तसेच गजेंद्र सिंह शेखावत, मंत्री, संस्कृती मंत्रालय, भारत सरकार, विवेक अग्रवाल, सचिव, संस्कृती मंत्रालय, भारत सरकार व तन्मय लाल, सचिव (पश्चिम), विदेश मंत्रालय, भारत सरकार यांनी हे मानांकन मिळावे, यासाठी



वेळोवेळी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील बैठका घेतल्या. या प्रक्रियेमध्ये राजदूत व युनेस्कोतील भारताचे स्थायी प्रतिनिधी, विदेश मंत्रालय भारत सरकार व संस्कृती मंत्रालय भारत सरकार यांनी अतिशय महत्त्वाची भूमिका निभावली. यदुवीरसिंग रावत, महानिदेशक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण जान्हविज शर्मा, अतिरिक्त महानिदेशक, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण यांनी युनेस्कोकडे हा प्रस्ताव पाठविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले. राजस्थानमधील किल्ल्यांना याच प्रकारे युनेस्कोचे नामांकन मिळविण्याचे अनुभव असणाऱ्या डॉ. शिखा जैन, वास्तुविशारद यांची संचालनालयाच्या वतीने सल्लागार म्हणून निवड करण्यात आली होती. त्यांचा या क्षेत्रातील दीर्घ अनुभव येथे उपयोगी आला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्यांना जागतिक वारसा नामांकन मिळणे ही अत्यंत गौरवाची बाब आहे. तसेच या नामांकनामुळे आपल्या महाराष्ट्रातील पर्यटन वाढीस लागणार आहे. जागतिक पर्यटक हे देशातील युनेस्को नामांकित स्थळांना अवश्य भेट देतात. त्यामुळे आपल्या पर्यटन अर्थव्यवस्थेला निश्चितच चालना मिळेल. जगात भारी असलेल्या आपल्या सांस्कृतिक ठेव्याला जगाच्या नकाशावर अधिकृतपणे महत्त्वाचे स्थान मिळवून देण्याचा हा प्रयत्न आहे. आपले किल्ले जागतिक पातळीवर नेण्यासाठी सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणून सहभागी होता आले ही श्रींची इच्छा होती.

आपल्या सर्वांसाठी ही आनंदाची अभिमानाची गोष्ट आहे. यापुढे मानांकन टिकवण्यासाठी ज्या-ज्या बाबींची आवश्यकता असेल ते सर्व उपलब्ध करून देण्यासाठी सर्व ताकदीनिशी महाराष्ट्र शासन प्रयत्न करेल. सांस्कृतिक मंत्री म्हणून मला जबाबदारी दिल्यानंतर या काळात शूर मराठा सरदार मुधोजी राजे भोसले यांची तलवार परत आणण्यासाठी प्रयत्न केले ते यशस्वी झाले. छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावे पहिला राज्य प्रेरणा गीत पुरस्कार, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अनादी मी अनंत मी ... या गीताला मार्शेलीस बंदरात उभे राहून जाहीर करता आले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांना हे मानांकन मिळणे हे तीनही ऐतिहासिक निर्णय माझ्या कालखंडात व्हावे, हा माझ्या गुरुंचा आशीर्वाद आहे. आयुष्यभर पुरून उरेल असा हा ठेवा आहे. मला त्याचा अत्यंत आनंद आणि अभिमान आहे. हे यश अत्यंत नम्रपणे मी महाराष्ट्रातील जनतेच्या चरणी अर्पण करतो.

**शब्दांकन : मीनल जोगळेकर,**
संचालक, सांस्कृतिक कार्य विभाग

**जागतिक वारसा मानांकन ही बाब गौरवशाली असण्याबरोबरच जबाबदारीही वाढवणारी आहे. आपल्या किल्ल्यांचा इतिहास, स्थापत्य, युद्धनीती, संस्कृती आणि समाजव्यवस्था या सर्व घटकांची माहिती जगापर्यंत पोहोचविण्याचे हे एक माध्यम आहे. स्थानिकांना प्रशिक्षित करून रोजगार निर्मिती करताना जैवविविधतेचे संवर्धन व सांस्कृतिक वारशाची जपणूक करणे ही प्रशासनाबरोबर आपलीही जबाबदारी आहे, याची प्रत्येक सुजाण नागरिकाला जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे. मानांकनप्राप्त गडांसाठी दीर्घकालीन व्यवस्थापन योजना प्रभावीपणे अमलात आणून दुर्लक्षित दुर्गांनाही संरक्षित वारशाच्या दृष्टीने शासन योजना तयार करेल.**

# समृद्ध संस्कृतीचा ठेवा!

**विकास खारगे**, अपर मुख्य सचिव

आयुष्यात काही-काही घटना, प्रसंग हे कल्पनेच्या पलीकडचे असतात. प्रशासकीय सेवेत असताना असे क्षण लाभणं हे खूपच भाग्याचं... छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांना युनेस्कोचे मानांकन मिळतानाचा क्षण प्रत्यक्ष अनुभवणं हा, अशा भाग्याच्या क्षणांपैकी एक...

छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्येक मराठी माणसाप्रमाणे माझेही आराध्यदैवत... प्रशासकीय सेवेत येताना त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा, प्रशासन व्यवस्थेचा, व्यक्तिमत्त्वाचा आदर्श माझ्यापुढेही होताच. सांस्कृतिक कार्य विभागाचा अपर मुख्य सचिव म्हणून जबाबदारी सांभाळताना छत्रपतींच्या कार्यकर्तृत्वाला विविध माध्यमांतून मानाचा मुजरा करण्याची संधी मला मिळाली.

सर्वप्रथम शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्षाचे औचित्य साधून राज्य शासनातर्फे वर्षभर विविध कार्यक्रमांची, उपक्रमांची आखणी करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांच्या दांडपट्टा या शस्त्राला राज्य शस्त्राचा दर्जा देण्याचा निर्णय, त्यांची वाघनखे भारतात प्रदर्शनासाठी आणण्याचा निर्णय आणि ती प्रत्यक्ष आणून महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये त्यांचे प्रदर्शन करणे या मालिकेतील सर्वोच्च आनंदाचा क्षण म्हणजे शिवछत्रपतींच्या लष्करी सामर्थ्याचं प्रतीक असलेल्या १२ गडकिल्ल्यांना युनेस्कोचे मानांकन मिळवून देण्याच्या मोहिमेतील माझा सहभाग...




महाराष्ट्रावर १७व्या शतकात मुघल सत्ता, आदिलशाही, निजामशाही या परकीय सत्तांचे राज्य होते. या कठीण परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य निर्माण केले. हे स्वराज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी गडकिल्ल्यांचा मोठ्या प्रमाणामध्ये आधार घेतलेला आहे. स्वराज्य टिकवून ते वाढविण्यासाठी त्यांनी नवीन गडांची निर्मिती केली व काही जुन्या गडकिल्ल्यांची पुनर्बांधणी केली. या गडकिल्ल्यांची उभारणी करताना छत्रपतींच्या दूरदृष्टीचा आपल्याला प्रत्यय येतो.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या मराठा लष्कराचे हे सामर्थ्य संपूर्ण जगात अद्वितीय असेच आहे. युनेस्कोचे मानांकन या गडकिल्ल्यांना मिळणं, हे या लष्करी सामर्थ्याचं महत्त्व जागतिक स्तरावरून अधोरेखित करण्यासाठीचं एक माध्यम होऊ शकतं, या विचारातून युनेस्को मानांकनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

कोकण किनारपट्टी, सह्याद्रीची पर्वतरांग व भारताच्या दक्षिण-पूर्व या भागांमध्ये महाराजांच्या किल्ल्यांचे संरक्षण जाळे पसरलेले दिसते. या भागातील महत्त्वाच्या व युनेस्कोच्या जागतिक वारसा संकल्पनेच्या निकषांमध्ये बसणाऱ्या १२ किल्ल्यांची या मानांकनासाठी निवड करून पुरातत्त्व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने प्रस्ताव तयार केला. यामध्ये महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी हे ११ किल्ले व तामिळनाडूतील जिंजी किल्ला या १२ किल्ल्यांचा समावेश होता.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे किल्ले, त्यांच्या भव्य स्थापत्यकलेसाठी ओळखले जातात. हे किल्ले राजकीय, लष्करी व सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे होते. नैसर्गिक दुर्गमतेचा अतिशय उत्तम वापर या किल्ल्यांच्या उभारणीमध्ये केलेला दिसून येतो. सह्याद्रीचा अत्यंत कुशलतेने आणि रणनीतीपूर्वक वापर करून किल्ल्यांची उभारणी केली. राजकीय आणि लष्करी नियंत्रण प्रस्थापित ठेवण्यासाठी किल्ल्यांचे मजबूत संरक्षण जाळे तयार केले. हे किल्ले उंचावरील दुर्गम स्थानी असल्यामुळे शत्रूला सहज गाठता येत नसत. सह्याद्रीतील दाट अरण्ये, दऱ्या आणि घाटांचा उपयोग करून

गनिमीकावा युद्धतंत्र वापरले. सह्याद्रीची उंची आणि गुंतागुंतीच्या भौगोलिक रचनेमुळे शत्रू सैन्याला या भागात चढाई करणे अवघड जाई. शत्रूला थेट न दिसणाऱ्या दरवाज्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना व किल्ल्यांचे माची स्थापत्य (Machis or Machi Architecture) हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे. स्वराज्याचे रक्षण करणाऱ्या या किल्ल्यांवर आढळणारे माची स्थापत्य जगभरातील कोणत्याही किल्ल्याच्या रचनेत दिसून येत नाही. माची स्थापत्य म्हणजे गडाच्या सुरक्षिततेचा आणि युद्धकौशल्याचा मुत्सद्दीनीतीने रचलेला भाग आहे. तसेच या गडकिल्ल्यांमध्ये धान्य कोठारे, दारूगोळा कोठारे, पाणी व्यवस्थापन, बाजारपेठ, रयतेच्या निवासाची व्यवस्था इ. ची अत्यंत कौशल्यपूर्ण रचना केलेली आढळते. युनेस्कोद्वारा जागतिक वारसास्थळ म्हणून घोषित करताना अद्वितीय वैश्विक मूल्य (Outstanding Universal Value) हा निकष अतिशय महत्वाचा ठरतो. स्थळाच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांच्या अद्वितीयतेसाठी हे मानांकन मिळते. छत्रपतींच्या गडकिल्ल्यांना मिळालेले मानांकन, त्यांच्या अद्वितीय वैश्विक मूल्यावर जागतिक मान्यतेची मोहर उमटवणारे ठरले.

युनेस्कोचे जागतिक वारसास्थळ मानांकन मिळवण्यासाठी एक ठोस प्रस्ताव, त्यामागचे ऐतिहासिक, स्थापत्यशास्त्रीय, सांस्कृतिक आणि संरक्षणात्मक पुरावे; तसेच भविष्यातील व्यवस्थापन आराखडे यांसारख्या अनेक बाबींची पूर्तता करणे आवश्यकता असते. युनेस्कोच्या कार्यपद्धतीला अनुसरून, सर्वप्रथम या किल्लांशी संबंधित सर्व कागदोपत्री पुराव्यांचा संच तयार करून सांस्कृतिक कार्य विभागामार्फत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, भारत सरकार यांना सादर करण्यात आले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री यांच्या शिफारशीने या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानांकन मिळविण्यासाठी हा प्रस्ताव युनेस्कोला सादर केला आणि मानांकनाची ही रोमहर्षक मोहीम सुरू झाली.

युनेस्कोच्या मार्गदर्शक कार्यपद्धतीनुसार ICOMOS या सल्लागार समितीच्या तज्ज्ञांनी ऑक्टोबर २०२४ मध्ये या प्रस्तावित १२ किल्ल्यांची पाहणी करून ICOMOS या संस्थेस अहवाल सादर केला. या अहवालाच्या तपासणीनंतर या समितीने काही प्रश्न उपस्थित केले. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासह मी, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचे उपसंचालक हेमंत दळवी यांनी युनेस्को मुख्यालय, पॅरिस येथे तांत्रिक सादरीकरण करून त्या सर्व शंकांचे निरसन केले.


जागतिक वारसा मानांकनाचा निर्णय हे युनेस्कोचे सदस्य देश मतदानाद्वारे घेतात. त्यामुळे या देशांचे मत आपल्या प्रस्तावाला मिळावे, यासाठी केंद्र सरकारतर्फे राजनैतिक स्तरावर हालचाली सुरू झाल्या. जागतिक वारसा मानांकनासाठी युनेस्कोचे जे सदस्य देश मतदान करून जागतिक वारसा स्थळ घोषित करण्याबाबत अंतिम निर्णय घेतात, त्या देशांच्या या क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत बैठका घेण्यात आल्या. पुरातत्त्व संचालक डॉ. तेजस गर्गे, उपसंचालक हेमंत दळवी व वास्तुविशारद शिखा जैन यांनी त्या-त्या देशांतील तज्ज्ञांना आपली बाजू समजावून सांगितली. यामध्ये झांबिया, ग्रीस, जमैका, कझाकस्तान, जपान, मेक्सिको, बेल्जियम, बल्गेरिया, इटली, कोरिया, प्रजासत्ताक, रवांडा, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, लेबनॉन, व्हिएतनाम, केनिया, कतार या देशांचा समावेश होता. देशाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने या देशांच्या भारतातील राजदूतांसमवेत संयुक्त बैठक घेऊन या प्रस्तावाचे ऐतिहासिक, स्थापत्यशास्त्रीय व सांस्कृतिक महत्त्व पटवून दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैयक्तिक लक्ष घालून उपरोल्लेखित देशांच्या राजदूतांशी संपर्क साधून पॅरिस येथे होणाऱ्या आमसभेत मतदानाद्वारे या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा मानांकन देण्यासाठी आवाहन केले. राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या आधिपत्याखालील या मोहिमेत ASI, परराष्ट्र मंत्रालय, केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय, संबंधित किल्ले ज्या जिल्ह्यांमध्ये आहेत त्या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी, शिवप्रेमी नागरिक, इतिहास तज्ज्ञ, गिर्यारोहक, गडकिल्ल्यांचे अभ्यासक, स्वयंसेवी संस्था इत्यादी सर्व घटक मावळ्यांच्या निष्ठेने अगदी मनापासून सहभागी झाले होते.

अखेर तो सोनेरी क्षण, पॅरिस येथील युनेस्को मुख्यालयात ११ जुलैला उगवला. छत्रपती शिवाजी महाराज यांनी निर्मिलेल्या, रयतेच्या राज्याचे प्रतीक म्हणून आजही उभ्या असलेल्या महाराष्ट्रातील ११ व तामिळनाडूतील एक अशा १२ किल्ल्यांना बहुमताने सांस्कृतिक वारसा या श्रेणीत जागतिक वारसा हे मानांकन मिळाल्याची घोषणा करण्यात आली. भारताचे युनेस्कोतील राजदूत विशाल शर्मा यांच्या समवेत प्रत्यक्ष उपस्थित राहून तो क्षण अनुभवताना, आमचे डोळे आनंदाश्रूंनी डबडबले होते आणि छाती अभिमानाने फुलली होती. जागतिक वारसा मानांकन ही बाब गौरवशाली असण्याबरोबरच जबाबदारीही वाढवणारी आहे. आपल्या किल्ल्यांचा इतिहास, स्थापत्य, युद्धनीती, संस्कृती आणि समाजव्यवस्था या सर्व घटकांची माहिती जगापर्यंत पोहोचविण्याचे हे एक माध्यम आहे. स्थानिकांना प्रशिक्षित करून रोजगार निर्मिती करताना जैवविविधतेचे संवर्धन व सांस्कृतिक वारशाची जपणूक करणे ही प्रशासनाबरोबर आपलीही जबाबदारी आहे, याची प्रत्येक सुजाण नागरिकाला जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे. मानांकनप्राप्त गडांसाठी दीर्घकालीन व्यवस्थापन योजना प्रभावीपणे अंमलात आणून दुर्लक्षित दुर्गांनाही संरक्षित वारशाच्या दृष्टीने शासन योजना तयार करेल. छत्रपती शिवरायांच्या या जागतिक वारशाबद्दल नागरिकांमध्ये व पिढ्यांना लहान वयापासूनच अभिमान आणि प्रेम निर्माण होण्यासाठी तसेच त्यांच्या रक्षणाबद्दल जाणीव-जागृती निर्माण होण्यासाठ गडकिल्ले रेखाटण्याची चित्रकला स्पर्धा, किल्ले स्पर्धा इत्यादी अनेक उपक्रम शाळांमधून आयोजित करण्यात येऊन किल्ल्यांच्या देखभालीसाठी जनसहभागातून प्रयत्न करण्यात येतील. या अनेक उपक्रमांमुळे स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवलेले गडकिल्ले शाश्वत, लोकाभिमुख आणि सांस्कृतिकदृष्ट्या सुदृढ समाजरचनेची प्रेरणा ठरतील, यात शंका नाही.

**शब्दांकन : मीनल जोगळेकर,**
संचालक, सांस्कृतिक कार्य विभाग



# छत्रपतींच्या दुर्गवैभवाला वैश्विक मानवंदना!



# शिवनेरी



सह्याद्रीच्या हिरव्यागार परिसरात वसलेला शिवनेरी हा किल्ला जुन्नर शहराचा संरक्षक म्हणून उभा आहे. हा केवळ संरक्षणासाठी बांधलेला किल्ला नाही, तर येथील भूगोल जाणून असलेल्या आणि राजकीय दूरदृष्टी असलेल्या जाणत्याने निवडलेले सामरिकदृष्ट्या मोक्याचे असे स्थळ आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांजवळ असल्याने शिवनेरी हा व्यापारावर आणि भूप्रदेशावर नियंत्रण ठेवणारा महत्त्वाचा किल्ला होता. पहिल्या शतकातील सातवाहनांच्या काळापासून या घाटखिंडींनी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाशी जोडले होते. कालांतराने या भूमीवर राज्य करणाऱ्या प्रत्येक राजवंशाने शिवनेरीवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्व ओळखले.

शिवनेरी किल्ला १५९५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात आला आणि शिवनेरीचा मराठ्यांशी संबंध सुरू झाला. १६३० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला.

डोंगरकड्याचे नैसर्गिक संरक्षण आणि चिरेबंदी तटबंदीमुळे शिवनेरी जवळपास अभेद्यच बनला. सुमारे साडे तीन हजार फूट उंच डोंगरावर वसलेल्या या किल्ल्याला भव्य आणि मजबूत



# शिवजन्माची पावनभूमी!





तटबंदी आहे. किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाज्यांमधून जावे लागते. उतार आणि वळणाचे गणित साधून शत्रूला गोंधळात टाकून त्याची गती कमी करण्यासाठी ते या प्रकारे बांधले आहेत. त्यामुळे इथवर आलेल्या शत्रूवर दोन्ही बाजूंनी हल्ला चढवता येतो.

आत गेल्यावर, किल्ल्यात एक विस्तीर्ण पठार आहे. कड्यांच्या पोटात आणि प्रस्तरात खोदलेली पाण्याची अनेक टाकी आहेत. यामुळे कडक उन्हाळ्यात किंवा वेढ्यातही पाणी मुबलक टिकून राहते. किल्ल्याच्या उत्तरेकडील कड्यावर कडेलोट आहे.

किल्ल्यात निवासस्थाने, धान्याची कोठारे, किल्ला आणि शिवाई देवीचे मंदिर आहे. हा किल्ला शिवाई देवीच्या नावावरूनच ओळखला जातो आणि या देवीच्या नावावरूनच छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव ठेवण्यात आले होते, अशी लोकमान्यता आहे. शिवनेरी किल्ल्याच्या रचनेत केवळ संरक्षणालाच नव्हे, तर स्वायत्ततेला प्राधान्य देण्यात आले आहे. साठवण क्षमता, पाणीसाठ्याची व्यवस्था आणि नैसर्गिक संरक्षणामुळे या किल्ल्याची एक स्वतंत्र गड म्हणून लढत राहण्याची आणि दीर्घकाळ वेढा सहन करण्याची ताकद होती.

छत्रपती शिवाजी महाराज यांची दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी जयंती साजरी करण्यासाठी हा किल्ला सज्ज असतो. शिवप्रेमी, शाळकरी मुले, इतिहास अभ्यासक आणि पर्यटक हजारोंच्या संख्येने येथे येतात. अशा प्रकारे शिवनेरी हा महाराष्ट्राचा प्रेरणास्रोत आहे. केवळ तोफांची मारकता आणि विजयाच्या चौघड्यांनी नव्हे, तर धैर्याने, चारित्र्याने आणि सातत्याने शिवनेरी एक ऊर्जास्रोत बनला आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून शिवनेरी किल्ल्यास विश्व पातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# रायगड



शिवछत्रपतींनी राजगडावर पाहिलेले हिंदवी स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्ष साकार होताना पाहिले, ते दुर्गराज रायगडाने! सह्याद्रीच्या कातीव कड्यांमध्ये ताठ मानेने उभा असलेला हा उज्ज्वल इतिहासाचा मूक साक्षीदार, पिढ्यानपिढ्या स्वाभिमानी भारतीय मनाला स्वातंत्र्याची आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देत आला आहे. याच उत्तुंग वास्तूने एकेकाळी शिवराज्याभिषेकाचा अतिभव्य सोहळा अनुभवला आहे.

रायगड हे केवळ दगडात कोरलेले वैभव आणि डावपेचांचा अद्‍भुत नमुना नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासाचा केंद्रबिंदू आहे. याच गडावर छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची पायाभरणी केली आणि धैर्य, दूरदृष्टी आणि स्वातंत्र्याची ऊर्मी या आधारावर साम्राज्य उभारले.

समुद्रसपाटीपासून सुमारे ८२० मीटर उंचीवर वसलेला हा किल्ला एका विशाल पठारावर पसरलेला आहे. रायगडाचा नैसर्गिक भूभाग खोल दऱ्या आणि उंच कड्यांनी वेढलेला असल्यामुळे तो जिंकणे जवळजवळ अशक्य होते. मुख्य पठाराभोवती आणि राजप्रासाद, अर्थात बालेकिल्ल्याभोवती चिलखती तटबंदी होती. ज्यामुळे हा गड अत्यंत सुरक्षित बनला होता. गडावर प्रवेश करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे महादरवाजा. त्याच्या दोन्ही बाजूंना असलेले उंच बुरूज, तसेच हिरकणी आणि भवानी बुरूज, पहारेकऱ्यांचे मनोरे शत्रूच्या हालचाली ओळखण्यासाठी उपयोगी होते.





हिरकणी बुरुजाचे नाव तर हिरकणी नावाच्या एका धाडसी स्त्रीवरून ठेवले गेले असावे, जी रात्रीच्या अंधारात या बुरुजाच्या ठिकाणी असलेल्या कड्यावरून खाली उतरली अशी लोककथा आजही प्रचलित आहे. गडावरील वाघ दरवाजाची रचना त्याच्या नागमोडी वळणांमुळे शत्रूला चकवा देत होती.

रायगड हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साम्राज्याचे केंद्र होता. इथेच त्यांचा राजदरबार होता. जवळच असलेला नगारखाना



# शिवराज्याभिषेकाचा साक्षीदार!



विशेष प्रसंगी झडणाऱ्या नगाऱ्यांनी दुमदुमून जात असे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अष्टप्रधानांची, म्हणजेच आठही मंत्र्यांची निवासस्थाने गडावर होती. आज त्यांचे उरलेले वाडे आणि अवशेष त्या काळातील प्रशासकीय जीवनशैलीची ओळख करून देतात. लोकमान्यतेनुसार, गडावरील सुनियोजित बाजारपेठ एका सरळ रेषेत वसलेली असून दोन्ही बाजूंना उंचवट्यावर उभारलेली दुकाने होती. समोरील ओटा आणि मागील दोन खोल्यांची रचना असलेल्या या दुकानदारांच्या घरांचे लाकडी बांधकाम काळाच्या ओघात नष्ट झाले; पण मजबूत काळ्या दगडांचा पाया आणि भिंती अजूनही टिकून आहेत.

जगदीश्वराचे मंदिर हे गडावरील पवित्र स्थळ होते. या मंदिराजवळील शिलालेखामध्ये, विशेषतः मोडी लिपीत लिहिलेल्या एका लेखात, छत्रपती शिवाजी महाराज यांचे वास्तुविशारद हिरोजी इंदुलकर यांचे योगदान नमूद केले आहे.


दीर्घकालीन लढ्याची शक्यता लक्षात घेऊन रायगडाची उभारणी केली होती. आजही येथे सुरू असलेल्या पुरातत्त्वीय उत्खननांमुळे गडाच्या प्रदीर्घ इतिहासाचे नवे पैलू समोर येत आहेत आणि या ठिकाणच्या समाजजीवनाची जडणघडण अधिक स्पष्ट होत आहे.

पण दगडी बांधकामांपलीकडेही रायगड लोकांच्या हृदयात जिवंत आहे. देशप्रेमी भारतीयांसाठी हे केवळ ऐतिहासिक स्मारक नाही, तर एक सांस्कृतिक स्मृतिकेंद्र आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बारा किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून रायगड किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# राजगड



सह्याद्रीच्या कुशीत, मोक्याच्या ठिकाणी उभा असलेला व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याच्या उदयोन्मुख स्वप्नाचा पाया असलेला हा राजगड! अनेक लढाया, ऐतिहासिक निर्णय आणि मराठ्यांच्या असामान्य पराक्रमाची साक्ष देणारा हा किल्ला तब्बल २५ वर्षे स्वराज्याची राजधानी होता. सभोवतालच्या दऱ्याखोऱ्या व व्यापारी मार्गांवर नजर ठेवणारा राजगड संरक्षण व प्रशासनाचेही एक महत्त्वाचे केंद्र होता. या किल्ल्याच्या तीन प्रमुख माच्या- पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा माची - या तीन दिशांना पसरलेल्या असून त्या राजगडावरील सर्वात महत्त्वाचे व सर्वोच्च स्थान असलेल्या बालेकिल्ल्यावर एकत्र येतात.



मराठ्यांच्या पूर्वी दख्खनच्या या पहारेकऱ्याचे नाव होते मुरुंबदेव! स्वराज्यात येण्याआधी विविध सुलतानांच्या हातात असताना इथे केवळ बालेकिल्ला अस्तित्वात होता. १६४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांनी गड ताब्यात घेऊन त्याचे नाव राजगड (गडांचा राजा) असे ठेवले व तेथे राजधानी घोषित केली. नैसर्गिक पर्वतरांगा व दुर्गम डोंगरकडे यामुळे गड जिंकणे अत्यंत कठीण होतेच; पण या किल्ल्याची सैनिकीदृष्ट्या केलेली अद्वितीय रचना हे त्याचे वैशिष्ट्य आहे. इतर अनेक किल्ल्यांप्रमाणे एकाच तटबंदीऐवजी राजगडाची संरक्षक रचना तीन दिशांना पसरलेल्या तीन माच्यांवर आधारित होती. प्रत्येक माची डोंगराच्या नैसर्गिक उतारावर आहे. त्यामुळे किल्ल्याला बहुस्तरीय संरक्षण मिळाले आहे.

पद्मावती माची हा किल्ल्याचा मध्यवर्ती भाग, नागरी आणि निवासी केंद्र होता. येथे राजसदर, मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज यांचे निवासस्थान आणि पाण्याची टाकी होती. राणीवसा, मंत्र्यांचे निवास आणि पद्मावती देवीचे मंदिर येथेच आहे. पश्चिमेकडे पसरलेली संजीवनी माची आणि त्यावरील सुसज्ज बुरूज हे संरक्षणासाठी, तसेच आक्रमणासाठी सोयीस्कर अशा भक्कम तटबंदीसह सज्ज होते. पूर्वेला सुवेळा माची अरुंद कड्यांवर पसरलेली असून, तेथे पहारेकऱ्यांची ठाणी, पाण्याची टाकी आणि अरुंद; पण संरक्षणासाठी महत्त्वाचे प्रवेशद्वार होते. या सर्वांवर डौलात उभा होता तो उंच भिंती, मनोरे असलेला



# स्वराज्याच्या उभारणीचा पाया!

आणि विस्तीर्ण प्रदेशावर लक्ष ठेवणारा बालेकिल्ला. हा गडाच्या सुरक्षा व्यवस्थेतील अंतिम टप्पा होता.

किल्ल्याच्या संरक्षण योजनेत पाली, गुंजवणे आणि अळू दरवाजा या प्रवेशद्वारांच्या मालिकेचा समावेश आहे. पद्मावती टाकी आणि खडकात कोरलेल्या असंख्य पाण्याच्या टाक्यांमुळे राजगडावर वर्षभर पाण्याचा मुबलक साठा असे.







धान्य गोदामे, टेहळणीच्या चौक्या आणि वळणावळणाच्या पायवाटा या साऱ्याचा किल्ल्याच्या घडणीत कुशलतेने समावेश करण्यात आला आहे. राजगडाच्या बांधणीत फक्त संरक्षणापुरताच विचार केलेला नाही, तर दूरदृष्टीने, सर्व अंगांनी विचार करून हा राजधानीचा गड घडवण्यात आला आहे.

आजचा राजगड केवळ मराठ्यांची धीरोदात्तता आणि शौर्याचे स्मारक नाही, तर एक सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आणि जिवंत वारसा आहे. याच्या मध्यभागी असलेले पद्मावती मंदिर आजही ट्रेकर्स आणि भक्तांसाठी पूजेचे स्थान आहे. दिवाळीच्या वेळी होणारा दीपोत्सव हा गडावरील एक भव्य सोहळा असतो. या वेळी फुलांनी आणि मातीच्या दिव्यांनी सारा किल्ला सजवला जातो. शिवजयंतीच्या दिवशी, किल्ल्याचे भव्य उत्सव स्थानात रूपांतर होते. येथे असंख्य लोक एकत्र येतात, पारंपरिक संगीत, भाषणे आणि ऐतिहासिक प्रसंगांवर नाटिका सादर करतात.

युनेस्कोच्या ‘जागतिक वारसा’ श्रृंखलेत राजगड किल्ल्यास विश्व पातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# पन्हाळा




दख्खनचे पठार आणि कोकण किनारा यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या व्यापारी आणि लष्करी मार्गांवर नियंत्रण ठेवणारा पन्हाळा हा सह्याद्रीतील महत्त्वाचा किल्ला आहे. समुद्रसपाटीपासून ८४५ मीटर उंचीवर वसलेला आणि तब्बल ७ चौरस किलोमीटरमध्ये विस्तारलेला हा किल्ला महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक मानला जातो. खोल दरीने जोडलेले पन्हाळा आणि पावनगड हे जोडकिल्ले मिळून शिवकाळात एक भक्कम संरक्षण यंत्रणाच उभी करण्यात आली होती.

पन्हाळा हा तसा प्राचीन किल्ला आहे. या परिसरात प्राचीन बौद्ध लेणींचे अवशेषही आहेत. १६५९ साली छत्रपती शिवाजी महाराज यांनी हा किल्ला आदिलशाहीकडून जिंकला आणि स्वराज्यात सामील केला. पुढे महाराणी ताराबाईंनी पन्हाळ्यालाच मुख्यालय बनवले-मराठा साम्राज्याच्या अत्यंत कठीण काळात त्यांनी इथे आपलं सैन्य बांधलं.

पन्हाळा हा केवळ किल्ला नव्हता; तो मराठ्यांच्या जिद्दीचे प्रतीक होता, जिथून धैर्यशील, धोरणी आणि ध्येयवादी मराठ्यांनी बलाढ्य आक्रमक सत्तांना आव्हान दिले.

पन्हाळ्याच्या मध्यभागी असलेला बालेकिल्ला हा एकेकाळी किल्ल्याचा मुख्य केंद्रबिंदू होता आणि





# झुंज आणि शौर्याचे प्रतीक!



आजही मजबूत दगडी तटबंदी अभिमानाने मिरवत आहे. या बालेकिल्ल्याच्या आवारात तीन ऐतिहासिक धान्य कोठारे आहेत. त्यापैकी दोन बहामनी काळात बांधली गेली, तर तिसरे काळ्या पाषाणात बांधलेले, मराठा कालखंडातील आहे.

संपूर्ण डोंगराला वेढा घालणाऱ्या पन्हाळ्याच्या भव्य तटबंद्या, डोंगरशिखरांवर दगडी नागमोडी वळणे घेत जातात. यामध्ये काही गुप्त मार्ग आणि दरवाजे आहेत. तटबंदीवर ठिकठिकाणी चाळीसहून अधिक बुरुज आहेत; प्रत्येकावर एकेकाळी पहारेकरी उभे राहून परिसरावर लक्ष ठेवत. त्यातील काळा बुरूज आणि पुसाटी बुरूज हे विशेष उल्लेखनीय आहेत. मराठ्यांनी त्यांचा विस्तारही केला आणि मजबूतही बनवले.

मराठ्यांनी किल्ला ताब्यात घेतल्यानंतर मोठ्या प्रमाणावर दुरुस्त्या आणि सुधारणा करण्यात आल्या. तटबंदी पुन्हा बांधली गेली, बुरुज बांधण्यात आले आणि तोफांसाठी उंच दमदमे उभारण्यात आले.

मराठ्यांची दूरदृष्टी पन्हाळ्यापुरतीच मर्यादित नव्हती; त्यांनी पावनगडालाही तितकेच मजबूत केले. इथेही त्यांनी बुरूज, तटबंदी आणि पूरक इमारती बांधून हा डोंगर एक महत्त्वाचा सैन्यतळ बनवला.

दगडी तटबंदी आणि बुरुजांपलीकडेही पन्हाळ्यावर राजवाडा, मंदिरे, प्रशासकीय इमारती आहेत. मराठ्यांच्या वास्तुकलेची साक्ष देणाऱ्या अंबारखाना, राजमाता ताराराणींचा राजवाडा आणि विशाल धान्य कोठारेदेखील आहेत. याच इमारतींमधून किल्ल्याचे प्रशासन चालत असे. पन्हाळा-पावनगड परिसरातील वाडे, विहिरी आणि इतर बांधकामांतून या किल्ल्यात कधीकाळी घडलेल्या इतिहासजीवनाची आणि वारशाची एक सुंदर झलक पाहायला मिळते.

पन्हाळ्याच्या भव्य तटबंद्या, सुस्थितीत असलेली धान्य कोठारे आणि नीटस बांधलेला जोडकिल्ला पावनगड, हे लष्करी वास्तुकलेची उत्कृष्ट उदाहरणे म्हणून उभे आहेत. स्थानिकांसाठी पन्हाळा हा अभिमानाचे प्रतीक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी सिद्दी जौहरच्या वेढ्यातून धाडसीपणाने सुटका करून घेतली. त्या घटनेचे स्मरण म्हणून दरवर्षी येथे पन्हाळा विजय दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावेळी पन्हाळा किल्ल्यापासून विशाळगडापर्यंत, ऐतिहासिक पावनखिंडीच्या मार्गाने मिरवणुका काढल्या जातात. या परंपरेमुळे मराठ्यांचा जाज्वल्य इतिहास लोकांच्या स्मरणात आजही ताजा राहतो.



उत्सवांमधून साजरा केला जाणारा, आठवणींमधून जपला जाणारा आणि स्थानिक समाजाकडून पूजला जाणारा पन्हाळा किल्ला, मराठ्यांच्या शौर्य आणि वारशाचे भव्य प्रतीक म्हणून आजही अढळपणे उभा आहे. ■■




# प्रतापगड



किल्ल्याची तटबंदी काही ठिकाणी तब्बल ४० फूट उंच आहे. ही सर्व बांधकामे याच ठिकाणी सहजगत्या मिळणाऱ्या काळ्या पाषाणात केली आहेत. इथल्या उंच बुरुजांवरून जावळीच्या खोऱ्यातल्या डोंगरदऱ्यांवर दूरवर नजर ठेवता येत असे, त्यामुळे शत्रूच्या हालचाली लवकर ओळखता येत. अरुंद आणि नागमोडी वाटा; तसेच भक्कम दरवाजे यामुळे कुणालाही किल्ल्यात सहजरीत्या प्रवेश मिळणे शक्य नव्हते. प्रतापगडाचा महादरवाजा हा संरक्षणदृष्ट्या उत्कृष्ट नमुना आहे. गोमुखी शैलीत बांधलेला हा दरवाजा, अरुंद वाट आणि दोन्ही बाजूंच्या बुरुजांतून निघालेल्या जंग्यांमुळे शत्रू किल्ल्याच्या माऱ्याच्या टप्प्यात येत असे.

सह्याद्रीच्या नागमोडी घाटांमध्ये दडलेला प्रतापगड महाबळेश्वरच्या पश्चिमेला आहे. या किल्ल्याचे सामरिक महत्त्व केवळ त्याच्या उंचीमुळे नव्हे, तर आजूबाजूंच्या दऱ्याखोऱ्यांवर त्याने ठेवलेल्या नियंत्रणामुळेही होते.

प्रतापगडाची वास्तुरचना म्हणजे नैसर्गिक दुर्गमता आणि मानवी स्थापत्यकलेचा सुंदर संगम आहे. किल्ला दोन भागांत विभागलेला आहे. डोंगराच्या शिखरावर असलेल्या बालेकिल्ल्यात मुख्य राजवाडा, मंदिरे, पाण्याची टाकी आणि साठवणीची कोठारे अशी महत्त्वाची बांधकामे होती. दक्षिण आणि पूर्व उतारावर बांधलेल्या खालच्या भागात पहिली मुख्य तटबंदी आणि भव्य, मजबूत बुरूज शत्रूला खालीच थोपवून धरत.



# श्रेष्ठ रणनीतीचा आविष्कार!





प्रतापगडाची एक अत्यंत उल्लेखनीय बाब म्हणजे त्याची प्रगत जलव्यवस्था. किल्ल्यात पाण्याची चार मुख्य टाकी आहेत. दोन खालच्या बाजूला आणि दोन बालेकिल्ल्यात. पावसाचे पाणी साठवून किल्ल्यातील लोकांना पुरेसा पाणीपुरवठा त्यातून केला गेला. पावसाचे पाणी या टाक्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नैसर्गिक उतारांचा केलेला उपयोग हा मराठ्यांनी आपले किल्ले टिकवून ठेवण्यासाठी वापरलेले अभियांत्रिकी कौशल्य दाखवतो.

प्रतापगडावर इतिहास घडला तो १० नोव्हेंबर १६५९ रोजी आदिलशाहीचा बलाढ्य सरदार अफझलखान याने छत्रपती शिवाजी महाराज यांना दगाफटका करण्याचा प्रयत्न केला; पण महाराजांनी मुठीत लपवलेल्या वाघनखांनी खानाचा वध केला. मराठ्यांच्या काळातील एक खास शस्त्र असलेली ही वाघनखं, अनेक वर्षे लंडनच्या व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट संग्रहालयात ठेवली होती; आता ती महाराष्ट्रातील विविध ठिकाणी फिरत्या प्रदर्शनासाठी भारतात आणली आहेत. ही वाघनखं शौर्य आणि युद्धनीतीचे प्रभावी प्रतीक बनले आहे. त्या ऐतिहासिक क्षणाशी नातं जोडण्यासाठी असंख्य लोक प्रतापगडाला भेट देतात.

प्रतापगड हा केवळ भूतकाळाचा एक अवशेष नाही, तर मराठ्यांच्या शौर्य आणि रणनीतीचा साक्षीदार आहे. हा किल्ला आजही त्या लढाईची आठवण करून देतो. ज्या लढाईमुळे छत्रपती शिवाजी महाराज यांनी भारताच्या इतिहासाचा प्रवाहच बदलून टाकला. बलाढ्य साम्राज्यांना आव्हान दिले, पराभूत केले आणि स्वराज्याचा पाया भक्कम केला. या किल्ल्यावर दरवर्षी शिवजयंती उत्सव साजरा केला जातो. अफझलखान भेटीच्या नाट्यरूप सादरीकरणांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रभरातून मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होतात, त्यामुळे प्रतापगड हा प्रादेशिक अस्मिता आणि सांस्कृतिक अभिमानाचे केंद्रबिंदू ठरतो.

हा किल्ला आजही भूतकाळ आणि वर्तमान यांना जोडणारा दुवा म्हणून उभा आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत ‘जागतिक वारसा स्थळ’ म्हणून प्रतापगड किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# लोहगड

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात सह्याद्रीच्या लोणावळा उपरांगेत दोन बेलाग डोंगरांवर भक्कमपणे उभे असलेले लोहगड आणि विसापूर हे जोडकिल्ले. कोकण किनारपट्टी व दख्खनच्या पठाराला प्राचीन व्यापारी मार्गांचे जागरूक पहारेकरी असल्याचे पायथ्याला असणाऱ्या सातवाहनकालीन भाजा लेण्यांवरून सिद्ध होते. ऐतिहासिक बोरघाटावरील मोक्याच्या स्थानामुळे मराठ्यांच्या लष्करी सिद्धतेत टेहळणी आणि बंदोबस्तासाठी किल्ले लोहगड महत्त्वाचा ठरला.

प्राचीन सातवाहन काळापासून अस्तित्वात असलेल्या लोहगड किल्ल्याने मध्ययुगीन काळापर्यंत बहमनी, अहमदनगरच्या निजामशाही; तसेच मुघलांपर्यंत अनेक राजवटी पहिल्या. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य विस्ताराच्या सुरुवातीच्या मोहिमांमध्ये १६४८ मध्ये पहिल्यांदा हा किल्ला जिंकला. १६६५ च्या पुरंदरच्या तहांतर्गत मुघलांना द्याव्या लागलेल्या किल्ल्यांमध्ये लोहगडचा समावेश होता. १६७० मध्ये सिंहगडच्या लगोलग लोहगडही मराठ्यांनी परत मिळवण्यात यश संपादन केले. भौगोलिक स्थान व सामरिक स्थापत्यरचनेमुळे किल्ला मराठी राज्याचा खजिना ठेवण्यासाठी वापरला गेला. सुरतहून आणलेली लूटही इथे ठेवल्याचे ऐतिहासिक दाखले आहेत. विरळे उदाहरण असलेल्या लोहगड व विसापूर या जोडकिल्ल्यांनी महाराजांच्या निधनानंतरदेखील मराठ्यांच्या संरक्षण व्यवस्थेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. त्याचे सामरिक महत्त्व पुढच्या शतकांतही टिकून राहिले.

लोहगड हा मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे प्रदेशाच्या संरक्षणाबरोबरच युद्धसज्जतेच्या दृष्टिकोनातूनही बांधला गेला. आजही किल्ल्याचे भव्य दरवाजे, मजबूत तटबंदी आणि नागमोडी वाटा पाहताना बांधणाऱ्यांच्या प्रतिभेची प्रचिती येते.

लोहगडाचा सर्वात लक्षवेधी भाग म्हणजे विंचू काटा-विंचवाच्या नांगीसारखा दिसणारा हा सुळका आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी या भागाला तटबंदी आणि बुरुजांनी अधिक मजबूत केले. त्यामुळे हा केवळ अतिरिक्त संरक्षणाचा भाग ठरला नाही, तर आजूबाजूच्या परिसरावर नजर





# युद्धसज्जतेत अतुलनीय!



ठेवण्यासाठीचे अद्वितीय ठिकाण बनले. विंचूकाटा ही लोहगडाच्या संरक्षणाची एक खास ओळख बनली आहे.


किल्ल्याला बळकटी देण्यासाठी गणेश दरवाजा, नारायण, हनुमान आणि महादरवाजा असे चार भव्य दरवाजे बांधण्यात आले. चढाई करून येणाऱ्या शत्रूला अडकवून दमवता येईल, अशा पद्धतीने ते बांधले आहेत. उत्तर मराठा कालखंडात ही बहुपदरी प्रवेश व्यवस्था विकसित करण्यात आली. वळणावळणाचे चढ आणि उंच तटबंदी यामुळे शत्रूला किल्ल्यात शिरणे जवळजवळ अशक्य होते.

किल्ल्याच्या माथ्यावर विस्तीर्ण पठार आहे. तिथे धान्यकोठारे, पाण्याची टाकी आणि इतर इमारतींचे अवशेष विखुरलेले आहेत. मोठ्या वेढ्यातही टिकून राहण्याची दीर्घकालीन तयारी असलेला हा किल्ला होता.

विसापूर किल्ला हा इतर गोष्टींपेक्षा लष्करी ठाणे म्हणूनच उपयोगात आणला गेला असावा. तो लोहगडापेक्षा काहीसा उंच असून, त्याची तटबंदी अधिक जाडीची, भरपूर बुरूज असलेली आहे. किल्ल्यावर दारूकोठारे, दगडात कोरलेली पाण्याची टाकी आणि तोफांचे फलाट आजही येथे पाहायला मिळतात. मराठ्यांची युद्धशैली कशी होती, हे सांगणारी काही उदाहरणे द्यायची असली, तर त्यामध्ये लोहगड अतिशय महत्त्वाचा आहे.

दर पावसाळ्यात हे किल्ले हिरवाईने नटतात आणि हजारो ट्रेकर्स व इतिहासप्रेमींना आकर्षित करतात. त्यामुळे ही केवळ स्मारके नसून, मराठ्यांच्या अखंड वारशाचा जिवंत साक्षीदार म्हणून हे गड उभे आहेत.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत ‘जागतिक वारसा स्थळ’ म्हणून लोहगड किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# खांदेरी



अथांग अरबी समुद्राच्या लाटांचे तडाखे ज्या खडकाळ किनाऱ्यावर धडकतात आणि जिथे वाहणाऱ्या खाऱ्या वाऱ्यात इतिहासाच्या आठवणी दरवळतात, तिथे खांदेरी किल्ला मराठ्यांच्या सागरी सामर्थ्याची साक्ष देत उभा आहे.

मराठ्यांच्या सागरी रणनीतीचे प्रतीक असलेला हा केवळ एका बेटावरील किल्ला नव्हता, तर ते एक अत्यंत महत्त्वाचे आरमारी केंद्र होते, ज्याने वसाहतवादी आणि प्रादेशिक शक्तींविरुद्ध मराठ्यांच्या संरक्षणात निर्णायक भूमिका बजावली.

रायगड जिल्ह्यातील राज्य संरक्षित स्मारक खांदेरी मोक्याच्या जागी असल्यामुळेच या किल्ल्याला एक अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. थळ आणि चौल बंदरांशी जवळीक, भू-राजकारणाशी आणि व्यापाराशी ऐतिहासिक संबंध असल्याने, किल्ला बांधणीसाठी त्याची निवड प्रभावित झाली. मुंबई बंदराच्या तोंडावर वसलेला हा किल्ला, समुद्रमार्गांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि आरमारी आक्रमणांना तोंड देण्यासाठी अगदी महत्त्वाच्या जागी होता.

हा किल्ला सागरी मार्गाचे प्रवेशद्वार होता. मुंबई किंवा जंजिऱ्याकडे जाणारी जहाजे येथे थांबवता येत होती. त्यांच्यावर लक्ष ठेवता येत होते किंवा वेळप्रसंगी त्यांना थेट आव्हानही देता येत होते. त्यामुळे खांदेरी हे मराठ्यांच्या आरमारी डावपेचातील हुकमी पान होते.

## मराठ्यांचा समुद्री बुरूज



# आरमारी डावपेचातील हुकमी पान!

ही कहाणी सुरू होते १६७२ साली, जेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांनी खांदेरीला वसाहतवादी आणि प्रादेशिक शत्रूंना तोंड देण्यासाठी एक महत्त्वाचे आरमारी तळ म्हणून उभारण्याचा संकल्प केला. या किल्ल्याच्या बांधकामामुळे इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी आणि जंजिऱ्याचे सिद्दी, या दोघांकडून वारंवार विरोध होऊनही मराठ्यांनी खांदेरीला भक्कम तटबंदी, अवजड तोफा, टेहळणीचे मनोरे आणि संरक्षण व्यवस्था यांनी सज्ज केले.

प्रथमदर्शनी खांदेरी हे एक साधे खडकाळ बेट वाटू शकते; पण मराठ्यांच्या दूरदृष्टीने या बेटाला एक भक्कम जलदुर्ग बनवले. या किल्ल्याची रचना म्हणजे बदलत्या सागरी परिस्थितीला साजेशा वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे. जिथे





बेटावरील नैसर्गिक खडकांचा योग्य वापर करून कृत्रिम तटबंदी आणखी मजबूत करण्यात आली आहे. खांदेरी बेटावर स्थित किल्ल्यात भिंती, बुरूज आणि सामरिक सोयीची ठिकाणे यासह मजबूत संरक्षणात्मक संरचना होत्या.

बेसॉल्ट खडकात बांधलेली किल्ल्याची भव्य तटबंदी थेट समुद्रापासून उभी राहिली आहे. त्यामुळे त्यावर थेट हल्ला करणे जवळजवळ अशक्य होते. किनाऱ्याच्या दिशेने योग्य जागी बांधलेले तोफांचे बुरूज, मराठ्यांच्या सागरी सीमेवर घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शत्रूच्या जहाजांवर सहज गोळीबार करू शकत. बेट लहान असले, तरी किल्ल्यात अशा जागोजागी तोफा मांडलेल्या होत्या, की जवळ येणाऱ्या जहाजांवर जबरदस्त हल्ला चढवता येत असे. खांदेरी किल्ल्याची रचना अशी होती की, मोहीम दीर्घकालीन असली, तरी तेथील सैन्याला कोणतीही अडचण येऊ नये. गोड्या पाण्याची विहीर, छुपी गोदामे आणि गुप्त मार्ग यामुळे शत्रूच्या नाकेबंदीला तोंड देत किल्ला कायम मजबूत आणि प्रतिकार करत राहू शकला.

आजतागायत खांदेरी किल्ला अरबी समुद्राच्या लाटांमध्ये स्थितप्रज्ञपणे उभा आहे. स्थानिक नागरिकही या किल्ल्याच्या वारशाचा मोठा आदर करतात. कोकण किनाऱ्यावरील पारंपरिक कोळी मच्छीमार आजही या समुद्रात झालेल्या आरमारी लढायांच्या आणि या जलधीवर राज्य केलेल्या शूरवीरांच्या कथा पुढच्या पिढ्यांना सांगत असतात. खांदेरी किल्ला ही केवळ किनारपट्टीच्या संरक्षणासाठी बांधलेली गढी नाही, तर मराठ्यांच्या सागरी सामर्थ्याचे आणि दूरदृष्टीचे अजरामर प्रतीक आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून खांदेरी किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# सिंधुदुर्ग



सिंधुदुर्गाचे काम त्या काळातील सर्वात कुशल वास्तुविशारदांपैकी एक अशा हिरोजी इंदुलकर यांच्या देखरेखीत १६६४ मध्ये पूर्ण झाले. लोकमान्यतेनुसार,किल्ला अभेद्य करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी गोव्यातील १०० पोर्तुगीज अभियंते आणि तीन हजार कुशल कामगार या कामी लावले होते. तीन वर्षांच्या कालावधीत, या कामगारांनी अहोरात्र कष्ट उपसले, प्रचंड शिळा रचून, जोडावर लोखंडाचा उपयोग करून मजबूत तटबंदी उभारली. मजबुती वाढवण्यासाठी पायाच्या दगडात वितळलेले शिसे ओतण्यात आले. यामुळे सिंधुदुर्ग त्याच्या काळातील सर्वात उत्तम किल्ल्यांपैकी एक बनला.

मालवणच्या किनाऱ्याजवळ अरबी समुद्रातील एका मोठ्या बेटावर उभा असलेला सिंधुदुर्ग हा मराठ्यांच्या सागरी दूरदृष्टी आणि लष्करी कौशल्याचा एक उत्तम पुरावा आहे. किनारपट्टीचे आणि आरमाराचे संरक्षण करण्यासाठी बांधलेला हा सागरी किल्ला मराठ्यांच्या धाडसाचे प्रतीक आहे. परदेशी जहाजांना रोखून बंदरांचे रक्षण करण्यास आणि सागरी सार्वभौमत्वाचा दावा करण्यास सिंधुदुर्ग सक्षम होता.

सुमारे ५० एकरांवर पसरलेला चार किलोमीटर लांबीची तटबंदी असलेला सिंधुदुर्ग हा कोकण किनाऱ्यावरील सर्वात मोठा बेटावरील किल्ला आहे. किल्ल्याची उंची नऊ मीटर आणि रुंदी तीन मीटर असलेल्या तटबंदी तोफांच्या जोरदार माऱ्याला तोंड देण्यासाठी बांधली होती. सिंधुदुर्गच्या तटबंदीला अद्वितीय रचना केलेले ३२ बुरूज आहेत. या बुरूजांच्या कठड्यांवर समुद्राच्या दिशेने तोंड केलेल्या काही वैशिष्ट्यपूर्ण कोठड्याही आहेत.



# सागरी सामरिक दूरदृष्टीचा आविष्कार!

किल्ल्याचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे बुरुजांच्या आड लपलेले मुख्य प्रवेशद्वार. समुद्रातून किल्ल्याकडे पाहिल्यास नागमोडी वळणाच्या भिंतींमध्ये बाजूच्या बुरुजांमुळे ते जवळजवळ अदृश्यच राहते. या तंत्रामुळे शत्रूची जहाजे प्रवेशद्वाराला सहजपणे भिडू शकत नव्हती आणि घुसखोरांचीही दिशाभूल होत होती. यामुळे किल्ल्याचे संरक्षण करणे सोपे झाले.

सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन घडवतात.

शिमगा, होळीसारख्या सणांमध्ये जवळच्या गावांमध्ये लोक उत्साहाने रंग, लोकनृत्य, संगीत यांचा आनंद लुटतात. प्राचीन मंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. दिवाळीच्या दिवशी या भागातील कुटुंबे सिंधुदुर्गाच्या छोट्या प्रतिकृती तयार करतात. मराठा इतिहासातील सिंधुदुर्गाचे स्थान इथले लोक आजही जपतात.



किल्ल्याच्या आत संरक्षणाच्या विविध रचना आहेत. तटबंदीच्या बाजूने दारूची कोठारे आहेत. या व्यतिरिक्त, तटबंदीच्या वरच्या बाजूला जाण्यासाठी अनेक बाजूंनी पायऱ्या आहेत. या पायऱ्यांमुळे सैन्याची तटावर जलद हालचाल होऊ शकत असे. किल्ल्यावर पाण्याची अनेक टाकी होती. ज्यामुळे तेथील वस्तीला सतत पाणीपुरवठा होत असे.

सामरिक उद्देशाव्यतिरिक्त, सिंधुदुर्गाला प्रचंड सांस्कृतिक आणि धार्मिक महत्त्व आहे. या किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचे मंदिर हे एक महत्त्वाचे तीर्थस्थळ आहे. किल्ल्यात इतर अनेक मंदिरे आहेत. ही मंदिरे, मराठा वस्त्यांचे अवशेष, किल्ल्याच्या

अशा प्रकारे सिंधुदुर्ग आज केवळ भूतकाळाचा अवशेष म्हणून उभा नाही, तर मराठ्यांच्या दूरदृष्टीचा आणि कल्पकतेचा जिवंत पुरावा म्हणून उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये मानांकन झालेल्या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून सिंधुदुर्ग किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# सुवर्णदुर्ग

महाराष्ट्रातील हर्णेच्या समुद्रकिनाऱ्यावरील एका खडकाळ बेटावर वसलेला सुवर्णदुर्ग हा एक मोठा वैशिष्ट्यपूर्ण किल्ला आहे. विशाल अरबी समुद्राने सर्व बाजूंनी वेढलेला हा किल्ला टेहळणी आणि किनारपट्टीच्या संरक्षणासाठीच बांधण्यात आला होता. जमिनीवरून होणाऱ्या हल्ल्यांपासून तो अजिंक्य होताच, त्याचबरोबर अरबी समुद्रातून होणाऱ्या जहाजांच्या मालवाहतुकीवर लक्ष ठेवणारा मराठा आरमाराचा समुद्रातील पहारेकरीही होता.

सोळाव्या शतकात विजापूरच्या आदिलशाहीने बांधलेल्या या सुवर्णदुर्गाचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराज यांनी ओळखले आणि ते अनेक पटींनी वाढवलेही. सुरुवातीच्या काळात हा किल्ला केवळ एक आरमारी तळ होता. त्याची भव्य तटबंदी आणि दरवाजांची मजबूती आणि स्थानमाहात्म्यामुळे तो सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या नेतृत्वात मराठा आरमाराचा मुख्य नाविक तळ बनला. याच किल्ल्याच्या बळावर आंग्र्यांनी परकीय सत्तांवर वचक बसवला.

सुवर्णदुर्गाचे खडकाळ बेटावर असलेले स्थान ही संरक्षणाच्या दृष्टीने जमेची बाजू ठरली. बेसॉल्ट खडकाने तयार झालेले, मजबूत बेटामुळे आणि त्यावरील टेकडीमुळे किल्ल्याच्या जाड भिंती आणि बुरुजांना एक मजबूत आधार मिळाला. चोहोबाजूंनी पसरलेले पाणी नैसर्गिक खंदकासारखे काम करत होते. पाण्यातून वर डोकावणाऱ्या बेटाच्या खडकाळ भागामुळे शत्रूच्या जहाजांनाही थेट किल्ल्यापर्यंत येण्यात अडथळे होते. कोणत्याही दिशेने येणाऱ्या शत्रूला ठरावीक कोनातूनच किल्ल्याजवळ येता येत होते. प्रवेशद्वाराला तटाबुरुजांनी चातुर्याने लपवण्यात आले होते. इथल्या भव्य प्रवेशद्वाराच्या झिजलेल्या कमानीवरील हनुमंताचे शतकानुशतके





# मराठा आरमाराचे शक्तिशाली प्रतीक!

जुने शिल्प जणू किल्ल्याच्या रक्षणकर्त्यासारखे भासते. स्थानिक काळा पाषाण आणि जांभ्या दगडांनी बांधलेल्या १५ मीटर उंच, भव्य तटबंदीचे वैशिष्ट्य मोठे खास आहे. फार जाडीच्या भिंती नसल्या, तरी त्या चिलखती पद्धतीने दुहेरी बांधलेल्या होत्या. त्यामुळे तोफांच्या माऱ्यापुढे त्या चांगला तग धरत. ठरावीक अंतरावर आणि विशिष्ट कोनात असलेल्या बुरुजांवरून शत्रूवर गोळीबार आणि तोफांचा मारा करता येत असे. यामुळे आतल्या सर्व वास्तू सुरक्षित राहत. किल्ल्यात अनेक इमारतींचे अवशेष आहेत. यात शस्त्रागार, धान्य कोठारे आणि पाण्याची टाकी लष्कराच्या सोयीसाठी बांधण्यात आली. यामुळे शत्रूचा वेढा पडला, तरी किल्ला दीर्घकाळ लढवणे शक्य होते.



सुवर्णदुर्ग हा मराठा आरमाराचे एक शक्तिशाली प्रतीक म्हणून आज उभा आहे. सुवर्णदुर्ग हा केवळ कोकणातले एक ऐतिहासिक स्मारक नाही, तर स्वदेशी अभियांत्रिकी आणि स्वराज्याच्या अभिमानाचे प्रतीक आहे. स्थानिक पातळीवर हा किल्ला जनमानसात, स्थानिक संस्कृतीत रुजलेला आहे. दिवाळीत आजही महाराष्ट्रात घरोघर किल्ले बनवण्याची परंपरा आहे. यात आबालवृद्ध उत्साहाने किल्ल्याच्या प्रतिकृती तयार करतात. यामध्ये सुवर्णदुर्गही मानाचे स्थान टिकवून आहे. तो महाराष्ट्राचा सागरी वारसा आणि सांस्कृतिक अभिमानाचे जिवंत प्रतीक आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झालेल्या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून सुवर्णदुर्ग किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.




# विजयदुर्ग



अरबी समुद्राचे पाणी जिथे सह्याद्रीच्या पर्वतरांगांना भेटायला येते, त्या खाडीच्या मुखावर मराठ्यांच्या एकेकाळच्या असीम सागरी सामर्थ्याचा मानबिंदू असणारा विजयदुर्ग मोठ्या दिमाखात उभा आहे. हा किल्ला व्यापारी जलमार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि आक्रमकांना रोखण्यासाठी बांधण्यात आला होता. सह्याद्री आणि अरबी समुद्र जिथे एक होतात, तिथे वसलेल्या विजयदुर्गाचा इतिहास शिलाहार राजवंशापर्यंत मागे जातो. १६५३ साली छत्रपती शिवाजी महाराज यांनी हा किल्ला जिंकल्यानंतर पुढील काही वर्षांतच, त्यांच्या अभियंत्यांनी त्याचे रूपांतर एका अत्युत्कृष्ट समुद्री किल्ल्यात केले.

या किल्ल्याची एक बाजू समुद्रात, तर दुसरी बाजू जमिनीवर आहे. जमिनीच्या बाजूला मूळ कोटाभोवती आणखी दोन तटांची बांधणी करून विजयदुर्गाला तिहेरी तटबंदीसह २० नवीन बुरूज आणि मनोऱ्यांसह सज्ज करण्यात आले. जमीन आणि समुद्रावरून येणाऱ्या शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवता येईल, इतक्या उंचीवर हे बुरूज आहेत. बाहेरच्या तटाच्या भिंती अचूक कोनात बांधण्यात आल्याने तोफगोळ्यांचा मारा निष्प्रभ होत असे. शत्रूला जमिनीवरून तटापर्यंत पोहोचता येऊ नये, यासाठी भरतीचे पाणी आणीबाणीच्या प्रसंगी किल्ल्याभोवती सोडण्यासाठी विशेष दरवाज्याची योजना करण्यात आली आहे. वेढा पडल्यास वर्षानुवर्षे किल्ल्यातील लोकांना पुरेल इतक्या पाण्याची सोय आणि धान्यकोठारं किल्ल्यात आहेत. विशेष म्हणजे किल्ल्याची संरक्षणात्मक रचना आधुनिक गणिती व शास्त्रीय तत्त्वांवर आधारित होती. शत्रू जहाजांच्या वर्मी आघात करू शकतील, अशा बेताने केलेली तटावरील जंग्यांची रचना हे त्याचे एक बोलके उदाहरण आहे. या जंग्यांमुळे किल्ल्याच्या आतील सैनिकाला किमान धोका पत्करून शत्रूचा अचूक वेध घेता येत असे. मराठा आरमारामध्ये नौकाबांधणी आणि दुरुस्ती या दृष्टीनेही विजयदुर्गाचे मोठे महत्त्व होते. मराठ्यांना चपळ हालचालींच्या लढायांसाठी उपयुक्त असलेली गुराब, गलबतं, पालं अशा जहाजांच्या बांधणीसाठी विजयदुर्गाच्या नाविकतळाचा उपयोग होत असे, परंतु या किल्ल्याचे सर्वात अनोखे वैशिष्ट्य म्हणजे भरतीच्या वेळी पाण्याखाली जाणारी





# सागरी सामर्थ्याचा मानबिंदू!



शिमगा-होळी हा एक उत्साही वासंतिक सण. दिवाळीच्या वेळी महाराष्ट्रभरातील कुटुंबं प्रेमाने विजयदुर्गाच्या प्रतिकृती तयार करतात. ही जणू किल्ल्याच्या तेजस्वी वारशाला आणि जनमानसातील स्थानाला दिलेली आदरांजलीच असते.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून विजयदुर्ग किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.

दगडी तटबंदी! यामुळे एकही गोळी न झाडता शत्रूच्या नौकांना जलसमाधी देता येत असे.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या नेतृत्वाखाली १६९८ साली मराठा आरमाराचे प्रमुख कान्होजी आंग्रेंनी विजयदुर्गाला आरमाराची राजधानी म्हणून निवडले. त्यांच्या नेतृत्वाखाली हा किल्ला सामर्थ्याच्या शिखरावर पोहोचला आणि सुमारे ३०० मैल लांबीच्या किनारपट्टीचे सत्ताकेंद्र बनला. आज विजयदुर्ग हा फक्त मराठा आरमाराच्या शक्तीचे प्रतीक नाही, तर कोकण किनारपट्टीच्या सांस्कृतिक जीवनाचे एक सचेतन अंग म्हणून उभा आहे. दरवर्षी किल्ल्याभोवतीची गावं शिमगा-होळी उत्साहात साजरी करतात. रंग, पारंपरिक नृत्य, संगीत आणि मंदिरांच्या सोहळ्यांनी उजळून निघणारा



# साल्हेर

स्वराज्याच्या उत्तर सीमेवरील सर्वात उत्तुंग आणि बलदंड पहारेकरी म्हणजे किल्ले साल्हेर! उत्तरेतून स्वराज्यावर चालून येणाऱ्या शत्रूला सीमेवरच रोखून धरण्याच्या कर्तव्यात डोलबारी पर्वतरांगेतील शिपायाने कधीही कुचराई केलेली नाही. नाशिकमधील बागलाण प्रांतात उभ्या ठाकलेल्या साल्हेरची शिवकाळात आणि त्यानंतरही मराठ्यांचा प्रमुख सैनिकी तळ म्हणून महत्त्वाची भूमिका होती. तसेच नैसर्गिकरीत्या उंचावर असल्याने तेथून महाराष्ट्र-गुजरातला जोडणाऱ्या व्यापारी मार्गावर नियंत्रण ठेवणे सोपे जात होते.




साल्हेर आणि त्याचा जोड-किल्ला सालोटा ही संरक्षणाची अभेद्य फळी आहे. सामरिकदृष्ट्या मोक्याच्या ठिकाणी, एकमेकांच्या दृष्टिक्षेपात असल्यामुळे बागलाण प्रदेशाचे संरक्षण करण्यात या किल्ल्यांचा खूपच उपयोग झाला.

बागुल राजवंशाच्या आधिपत्याखाली येण्यापूर्वी साल्हेर किल्ला गवळी राजांच्या ताब्यात होता. नंतर तो मराठ्यांसाठी उत्तरेकडील एक महत्त्वाचा लष्करी तळ ठरला. १६७२ साली मराठ्यांनी साल्हेरच्या लढाईत मिळवलेला विजय ही येथील महत्त्वाची घटना आहे.

तिन्ही बाजूंनी उभे कडे असलेल्या एका विस्तीर्ण पठारावर वसलेला हा किल्ला जवळजवळ अजिंक्य होता. त्याच्या सर्वात उंच टोकावरून खाली संपूर्ण ३६० अंशात पाहता येते. त्यामुळे शत्रूच्या हालचाली आधी टिपता येत होत्या. किल्ल्यावर पोहोचण्याचा एकमेव मार्गही अनेक नागमोडी वळणे घेत जाणारा आहे. स्वाभाविकच तिथून चढून येणाऱ्या शत्रूचा वेग मंदावत असे. अवघड भू-भाग आणि त्याच्या जोडीला मजबूत तटबंदी यामुळे साल्हेर हा अचानक होणारे हल्ले आणि वेढे यांना दाद न देणारा दुर्गम आणि अभेद्य किल्ला बनला होता.

तोफा, बंदुका आणि बाणांचा मारा करण्यासाठी भरपूर जंग्या आणि खिडक्यांची सोय असलेले दहा भक्कम बुरूज बांधून मराठ्यांनी साल्हेरच्या संरक्षणात्मक स्थापत्यामध्ये लक्षणीय भर घातली. मराठ्यांच्या काळात रुंद तटावरील संरक्षणात्मक भिंत, माऱ्याच्या जागा यांचीही मजबुती करण्यात आली. त्यामुळे तटबंदी आणि बुरुजांना बळकटी मिळाली. साल्हेरच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावणारा सालोटा किल्लादेखील मराठ्यांनी मजबूत केला होता.



# उत्तर सीमेवरील बलदंड पहारेकरी!



ज्यामुळे एकंदरीतच हा संपूर्ण भागच सुरक्षित झाला.


साल्हेर किल्ल्यामध्ये प्रगत जलव्यवस्थापन देखील करण्यात आले आहे. गंगासागर तलाव आणि गंगा-यमुना टाके यांसारख्या जलाशयांमुळे पाणी पुरवठ्याची चांगली सोय होती. मोठ्या धान्य कोठारांमुळे वेढ्याच्या काळात किल्ला साठवण करून तग धरू शकत होता. किल्ल्यावर धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वाच्याही जागा आहेत. यापैकी एक म्हणजे स्थानिकांचे श्रद्धास्थान असलेले रेणुका देवी मंदिर; तसेच परशुराम आणि रेणुका देवीच्या मंदिराला जोडणाऱ्या मार्गावर



असलेल्या प्राचीन लेणीदेखील पर्यटकांसाठी आकर्षणाचा विषय आहेत.

साल्हेरवर राजवाडा आणि प्रशासकीय इमारतींचे चौथरेही पाहायला मिळतात. डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या उत्खननात मराठा काळातील निवासी संकुले सापडली. ज्यामुळे किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि रचनेवर अधिक प्रकाश पडला. विजय दिन या वार्षिक उत्सवाद्वारे साल्हेरचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व अजूनही टिकवून ठेवण्याचे प्रयत्न होत आहेत. साल्हेरच्या ऐतिहासिक लढाईतील मराठ्यांच्या विजयाचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी फेब्रुवारीमध्ये हा उत्सव साजरा केला जातो.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून साल्हेर किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



# जिंजी



हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडापासून शेकडो मैल दूर असूनही महाराष्ट्राशी ज्याची अतूट नाळ जोडली गेली आहे, असा बेलाग गिरीदुर्ग म्हणजे जिंजी! सध्याच्या तामिळनाडू राज्यातील तीन टेकड्यांवर वसलेल्या या दुर्गाने मोगली आक्रमण आपल्या छातीवर झेलून स्वराज्याची राजधानी आणि छत्रपती राजाराम महाराज यांना संरक्षण दिले. हा दुर्ग म्हणजे शिवरायांची दूरदृष्टी, रणनीती आणि भारतीय स्थापत्यकलेचे एक भव्य प्रतीक आहे. चोळमंडळ किनाऱ्यावर वसलेला जिंजी किल्ला, किनारी व्यापारी केंद्रांना देशांतर्गत राज्यांशी जोडणाऱ्या महत्त्वाच्या व्यापारी मार्गाचे रक्षण करत असे, ज्यामुळे त्याला जागतिक पातळीवर एक विशेष महत्त्व प्राप्त झाले.



दोन ऐतिहासिक व्यापारी मार्ग जिथे जोडले जातात अशा मोक्याच्या ठिकाणी वसलेला जिंजी (सेंजी) किल्ला, खडकाळ टेकड्यांच्या रांगेवर सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी वसलेला आहे, ज्यात तीन स्वतंत्र टेकड्यांवर किल्ले बांधलेले आहेत. मराठ्यांच्या दक्षिणेकडील साम्राज्य विस्तारातील मैलाचा दगड ठरलेल्या या दुर्गाची रचना राजगिरी, कृष्णगिरी आणि चंद्रयानदुर्गम या टेकड्यांभोवती स्वतंत्र कोट आणि या तिन्ही कोटांना पोटात घेणारा भक्कम असा बाह्य कोट अशी आहे.



या किल्ल्याचे स्थान भौगोलिकदृष्ट्या अतिशय मोक्याचे आहे. हा किल्ला ज्याच्या ताब्यात असे त्याला भारताच्या पूर्व

# स्वराज्याचा रक्षणकर्ता!

किनारपट्टीच्या भागातून दख्खनच्या पठाराकडे जाणाऱ्या व्यापार मार्गांवर नियंत्रण ठेवणे सोपे होते. म्हणूनच या किल्ल्यावर आपली पताका फडकत ठेवण्यासाठी स्थानिक होयसळ, नायक, मराठे, मुघल, फ्रेंच आणि शेवटी ब्रिटिश या राज्यकर्त्यांनी आपापली शक्ती पणाला लावली.

या किल्ल्याचे मूळ बांधकाम १३ व्या शतकात झाले असले, तरीही बुलंद राजधानीच्या किल्ल्यात त्याचे रूपांतर केले ते छत्रपती शिवाजी महाराज यांनी! १६७७ साली हा किल्ला आपल्या दक्षिण दिग्विजयात शिवरायांनी विजापूरच्या आदिलशहाकडून जिंकून घेतला आणि त्याचे सामरिक डावपेचांच्या दृष्टिकोनातून महत्त्व ओळखून त्यावर संरक्षणात्मक बदल केले. मोगलांच्या सैन्याला तब्बल नऊ वर्षे म्हणजेच मराठ्यांच्या इतिहासातील सर्वात जास्त काळ चाललेला वेढा याच किल्ल्याने पाहिला आणि साहिला.





आधीच्या राज्यकर्त्यांनी तीन डोंगराच्या मालिकेवर उभारलेल्या तीन स्वतंत्र तटबंद्यांचे एका अभेद्य संरक्षक सैनिकी तळामध्ये रूपांतर करण्याचे काम मराठ्यांनी केले. त्यांनी तिन्ही किल्ल्यांना जोडणारी तटबंदी बांधली. तसेच तोफांच्या माऱ्यापुढे टिकाव धरावयात, यासाठी तटाच्या भिंती रुंद करून त्यात मातीचा भराव टाकला. तसेच मराठ्यांच्या शैलीतील तटबंदीचा वरील भाग, बंदुकांचा मारा करण्यासाठी जंग्या, मोक्याच्या ठिकाणी चौरस-आयताकृती अतिरिक्त बुरूज हेही मराठा स्थापत्यकलेचे पुरावे येथे पाहायला मिळतात. दीर्घकाळापर्यंत वेढा चालवता यावा, यासाठी अतिरिक्त पाण्याची ही सोय किल्ल्यावर करण्यात आली आहे.

किल्ल्यावर मराठ्यांनी केलेल्या सुधारणांचे युरोपीय अभियंत्यांनीही कौतुक केल्याचे उल्लेख त्यांच्या दस्तऐवजांमध्ये सापडतात. किल्ल्यातील राजवाडे, प्रशासकीय दालने, मंदिरे आणि मंडप अशा अनेक साहाय्यकारी रचना किल्ला एक स्वयंपूर्ण प्रशासकीय आणि सैनिकी केंद्र असल्याचे दर्शवतात.

शतकानुशतके चाललेल्या लढाया, डावपेच आणि राजवटींचा मूक साक्षीदार असलेला जिंजी असंख्य अस्मानी आणि सुल्तानी संकटे झेलून आजही तितक्याच ताठपणे उभा आहे. स्थानिक संस्कृतींचा मानबिंदू म्हणूनही त्याची ओळख आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ किल्ल्यांचे मानांकन झाले असून या श्रृंखलेत 'जागतिक वारसा स्थळ' म्हणून जिंजी किल्ल्यास विश्वपातळीवर विशेष ओळख मिळाली आहे.



**महाराष्ट्राच्या कणाकणात आजही शिवचरित्र घुमते. सह्याद्रीच्या रांगांमध्ये दिमाखाने उभे असलेले किल्ले केवळ दगड-मातीचे ढिगारे नाहीत, तर ते साक्ष आहेत त्या असामान्य इतिहासाची, ज्यात स्वराज्याची बीजे रुजली. छत्रपती शिवाजी महाराज यांनी केवळ एक साम्राज्य उभे केले नाही, तर राज्यकारभार, संरक्षण, जलनीती, न्याय आणि लोककल्याण याचे अत्युच्च आदर्श जगासमोर ठेवले. त्यांच्या गडकिल्ल्यांची असामान्य रचना, रणनीतीमूल्य व सांस्कृतिक महत्त्व आता युनेस्कोनेही मान्य केले आहे.**

# शिवछत्रपतींच्या गडकोटांचे वास्तुशास्त्रीय महत्त्व

**संजय डी. ओरके**

भारतासाठी, आपल्या महाराष्ट्रासाठी ११ जुलै २०२५ रोजी एक अभिमानाचा क्षण घडला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी निगडित १२ ऐतिहासिक किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ यादीत समावेश करण्यात आला. यामध्ये रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी हे ११ किल्ले महाराष्ट्रातील आहेत, तर एक तामिळनाडूमधील जिंजी किल्ला. ही घडामोड म्हणजे केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी ऐतिहासिक क्षण ठरली आहे.


शिवनेरी

## युनेस्को मानांकनाचे स्वरूप आणि गरज

युनेस्को म्हणजे United Nations Educational, Scientific and Cultural Organization ही जागतिक संस्था शिक्षण, विज्ञान व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी कार्यरत आहे. तिच्या 'World Heritage Sites' यादीत अशाच स्थळांचा समावेश होतो जे 'Outstanding Universal Value' (O.U.V.) म्हणजेच 'सर्वोत्कृष्ट जागतिक मूल्य' दर्शवतात. ही स्थळं केवळ त्यांच्या देशापुरतीच महत्त्वाची नसतात, तर मानवजातीच्या इतिहासातील त्यांचे स्थान विशिष्ट व अभिजात असते.

गडकोटांची ही यादी त्यांच्यातील ऐतिहासिक, स्थापत्य, सामरिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय गुणधर्मांवर आधारित तयार केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गड हे केवळ संरक्षणाचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्याच्या शासन व्यवस्थेचा गाभा होते. प्रत्येक किल्ल्याचा इतिहास, स्थापत्य व भौगोलिक स्थान यामुळे त्याचे एक विशिष्ट स्थान होते. या सगळ्या घटकांमुळे शिवकालीन किल्ले जागतिक वारशाच्या निकषांवर उतरले.

## शासनाचा प्रयत्न आणि शिस्तबद्ध प्रक्रिया

युनोस्कोच्या मान्यतेसाठी प्रयत्नांची सुरुवात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व पुरातत्त्व संचालनालयामार्फत केली. प्रस्ताव तयार करताना इतिहासकार, पुरातत्त्व, संवर्धन तज्ज्ञ, गडप्रेमी, शासकीय अधिकारी यांचे मोलाचे योगदान राहिले.

ज्येष्ठ पुरातत्त्ववेत्ता व इतिहास अभ्यासकांच्या मदतीने सखोल अहवाल तयार करण्यात आला. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालय, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) व युनेस्कोमधील भारतीय प्रतिनिधी यांचे नेतृत्व लाभले. ऑक्टोबर २०२४ मध्ये युनेस्कोच्या ICOMOS या संस्थेचे तज्ज्ञ ह्वाजोंग ली यांनी महाराष्ट्रात येऊन प्रत्यक्ष गडांची पाहणी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्लीत पाठपुरावा केला. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी युनेस्को मुख्यालयात भेटी देऊन प्रस्तावाचे महत्त्व अधोरेखित केले. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे अखेर ११ जुलै २०२५ मध्ये या १२ किल्ल्यांना जागतिक दर्जाची मान्यता प्राप्त झाली. यात नामांकनाचा प्रस्ताव हा संचालक डॉ. तेजस गर्गे आणि वास्तुविशारद डॉ. शिखा जैन यांनी संचालनालयाच्या स्तरावर एकत्रितरीत्या तयार केला.

## स्वराज्याच्या दौलतीचा परिचय...

### शिवनेरी

पुणे जिल्ह्यातील जुन्नरजवळ हा किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म याच गडावर झाला. आजही इथे त्यांच्या बालपणाच्या आठवणी जपल्या जातात. शिवनेरी किल्ल्याची वास्तुकला ही त्याच्या सुरक्षात्मक बांधणी, स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि ऐतिहासिक गरजांनुसार विकसित झालेली आहे. ही वास्तुशैली मुख्यतः मध्ययुगीन दख्खन पद्धतीची असून त्यात मराठा स्थापत्यकलेचे प्राथमिक संकेत दिसून येतात. शिवनेरी हा त्रिकोणी आकाराचा किल्ला असून तो एका उंच

टेकाडावर वसलेला आहे. याच्या चहूकडून दुर्गम दरी आणि नैसर्गिक उतार असल्याने सहज शत्रूच्या हल्ल्यात सापडत नाही. तसेच किल्ल्यावर जाण्यासाठी एकाच बाजूने मुख्य चढाईमार्ग आहे, ज्यामुळे सुरक्षा वाढते. किल्ल्यातून प्रवेशासाठी सात प्रमुख दरवाजे लागतात. त्यात महाद्वार, पीर दरवाजा, परमाणू दरवाजा, छिकडी दरवाजा इत्यादींचा समावेश आहे. दरवाजांवर लोखंडी खिळे, कोरीव काम व दगडी कमानी आढळतात. बुरुजांवर तोफा ठेवण्यासाठी दमदमे तयार केलेले दिसतात. शिवनेरीवर पाण्याची साठवणूक व्यवस्था फार शिस्तबद्ध होती. शिवनेरी किल्ल्यात 'गंगाजळ' नावाचे मोठे पाण्याचे टाके असून वर्षभर पाणी टिकते. किल्ल्यावर अनेक लहान-मोठ्या टाक्या, विहिरी आणि कातळात खोदलेल्या जलवाहिन्या आढळतात. या जलव्यवस्थेचे नियोजन उच्च दर्जाचे होते. शिवनेरी किल्ल्यात काही गुप्त बोगदे व खासगी वापरासाठी छोटे कक्षही आहेत, जे संरक्षक व सुरक्षित उद्देशाने बनवले गेले. किल्ल्यावर निसर्ग रक्षण आणि मानवनिर्मित संरक्षण यांचा मिलाफ दिसतो. काही भागात मोठ्या दगडांच्या तटबंदी आहेत, तर काही ठिकाणी कातळ नैसर्गिक तट म्हणून वापरण्यात आले आहे.



राजगड

## राजगड

राजगड किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रथम राजधानीचा किल्ला होता आणि त्याची वास्तुकला मराठा सैनिकी बुद्धिमत्तेचा उत्कृष्ट नमुना आहे. राजगड हा भौगोलिक, सामरिक आणि स्थापत्यदृष्ट्या एक अतिशय प्रभावी आणि दुर्गम किल्ला आहे. त्याची रचना पाहता, त्यात रक्षण, प्रशासकीय केंद्र, राहणी व्यवस्था आणि पाणी साठवणूक या सर्व गोष्टींची उत्कृष्ट सांगड घातलेली आहे. राजगड किल्ला सह्याद्री पर्वतरांगेत, पुणे जिल्ह्यात वलवंड गावाजवळ आहे. किल्ल्याची रचना बालेकिल्ला आणि तीन मोठ्या माची (पठारसदृश विभाग) यांच्या आधारावर उभी आहे. राजगड ४,५१७ फूट उंचीवर वसलेला असून तो चहूबाजूंनी खोल दऱ्यांनी वेढलेला आहे. राजगडचा बालेकिल्ला हा सर्वात उंच व दुर्गम भाग असून तो कातळावर कोरलेला, मजबूत तटबंदीने वेढलेला आहे. याचा दरवाजा खास मराठा वास्तुशैलीचा प्रकार असणाऱ्या गोमुख पद्धतीचा आहे. यामध्ये राजदरबार, राहणी व्यवस्था व सुरक्षिततेसाठी गुप्त दरवाजे व जिने आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी येथे २५ वर्षे वास्तव केले. किल्ल्यावर संजीवनी माची, सुवेळा आणि पद्मावती माची अशा तीन माची आहेत. किल्ल्याच्या अलंकार दरवाजा, गुप्त दरवाजे, चोर वाटा इत्यादीमध्ये युद्धनीती स्पष्ट दिसते. तसेच बुरुजांवर तोफा ठेवण्यासाठी मचाण, दगड फेकण्यासाठी झरोक्यांतील छिद्र अशी रचना आहे. जलव्यवस्थेसंदर्भात तलाव, टाक्या आणि झरे भरपूर प्रमाणात आढळून येतात. तसेच पाण्याच्या साठवणुकीसाठी कातळात कोरलेल्या टाक्या अनेक ठिकाणी आहेत. राजगड हा लढाऊ, प्रशासनिक आणि धार्मिक गरजांची पूर्तता करणारा बहुपरिमिती किल्ला होता. त्याची वास्तुकला आणि भूस्थान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दूरदृष्टीचा पुरावा आहे. मराठा साम्राज्याचा प्रारंभ येथेच घडला, म्हणून राजगड म्हणजे मराठा सामर्थ्याचा पायाचा दगड मानला जातो.

## रायगड

रायगड किल्ल्याची वास्तुकला ही मराठा साम्राज्याच्या सामर्थ्य, शिस्त आणि दूरदृष्टीचा अत्युच्च नमुना मानली जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी रायगडाला १६७४ साली आपली राजधानी घोषित केली आणि याच ठिकाणी त्यांचा राज्याभिषेक झाला. यामुळे रायगडाची वास्तुकला केवळ सैनिकी किंवा संरक्षणासाठीच नव्हे, तर राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक दृष्टिकोनातून देखील अत्यंत महत्त्वाची आहे.

रायगड किल्ला कोकण व घाटमाथ्याच्या मध्ये वसलेला आहे. किल्ला उंच सुळक्यांवर वसलेला असून, एकमेव प्रवेशद्वार असलेला सुरक्षित किल्ला आहे. किल्ल्याच्या मध्यभागी मोठा राजप्रासाद (राजवाडा) होता. सध्या केवळ त्याचे दगडी पाया व खांबांचे अवशेष दिसतात. राजप्रासादात दरबार हॉल, महाराजांचे खासखुर्चीची खोली, बैठक व्यवस्था, अशा प्रशासकीय रचना होत्या. दरबारात राज्याभिषेक सोहळा पार पडलेले सिंहासन खास वैशिष्ट्य होते. सिंहासनासमोरून कोणताही आक्रमक थेट वार करू शकणार नाही, असा कोन राखण्यात आला होता (सैनिकी डिझाइन). किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार म्हणजे महादरवाजा हा अत्यंत भक्कम आणि उंच दरवाजा असून त्यावर बुरूज व कोरीव काम केलेले आढळते. किल्ल्याभोवतीच्या मजबूत दगडी तटबंदी रचनेमुळे शत्रूची घुसखोरी अशक्य अशी होती. किल्ल्यावरील जलव्यवस्थेतसाठी गंगासागर तलाव हा अत्यंत मोठा पाण्याचा साठा करण्यात आला. त्याचबरोबर इतर लहान टाक्या, पाणवठे, विहिरी अशी वर्षभरासाठी पुरेशी जलसाठा व्यवस्था आहे. त्याचबरोबर नैसर्गिक उताराचा उपयोग करून पाणी वाहते ठेवले गेले. रायगडची



रायगड

वास्तुकला राजधानीसाठी योग्य जसे संरक्षण, प्रशासन, रहिवास, जलसंपत्ती, आणि धार्मिक आयाम, अशा सर्व अंगांनी युक्त होती. येथे लष्करी आणि राजकीय व्यवस्थेचे परिपूर्ण संतुलन आढळते. ही स्वराज्याची दुसरी राजधानी होय.


प्रतापगड

## प्रतापगड

प्रतापगड किल्ल्याची वास्तुकला आणि स्थापत्य रचना मराठा शौर्याचा आणि सुव्यवस्थित युक्तिबुद्धीचा उत्कृष्ट नमुना आहे. उच्च पायरीचा 'गिरीदुर्ग' प्रकारचा हा किल्ला असून किल्ला दोन प्रमुख विभागांत वाटलेला आहे. प्रत्येक भागावर भारी आणि विविध उंचीची तटबंदी आणि बुरुजांच्या साहाय्याने सुरक्षा सुसज्ज आहे. उत्तर-पश्चिम दिशेच्या भागाची पहिली बांधणी घट्ट आहे आणि उंचीने बाजूच्या भागापेक्षा जास्त आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी इ.स. १६६१ मध्ये स्थापिलेले तुळजा भवानी मंदिर मुख्य किल्ल्याच्या भागात असून दगडी पायऱ्या आणि दलदल नसलेला मार्ग, जमिनीच्या स्थलरचनेनुसार पायऱ्या व चढता मार्ग आखण्यात आले आहेत. स्वतंत्र तलाव, पूर्वीचा प्राचीन सुपीचा वापर; तसेच तटबंदीच्या संरचनेमध्ये नदी आणि संकरे घाट लक्षात ठेवून बनवली गेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी मोरोपंत त्र्यंबक पिंगळे यांच्या देखरेखीखाली आणि गिरजोजी यादव यांच्या वास्तुविशारद मदतीने हा किल्ला बांधला, ज्याचा हेतू नीर आणि कोयना नदी किनाऱ्यांचे; तसेच पारघाटपासचे संरक्षण करणे हा होता. या स्थापत्य युक्तीमुळे हा किल्ला केवळ दुर्गपट्टी नाही, तर रणनीती आणि भूगोलाचे संयोजन आहे. परिसरातील दऱ्या आणि पठार पाहता किल्ला एकदृष्ट्या आक्रमणासाठी दुर्गम आणि संरक्षणासाठी उत्कृष्ट पुरावा आहे. अफझलखान वधाची ऐतिहासिक घटना याच किल्ल्याच्या पायथ्याशी घडली. घाटमाथ्यावरील सामरिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असा प्रतापगड किल्ला आहे.

## पन्हाळा

पन्हाळा किल्ला एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक व स्थापत्यदृष्ट्या समृद्ध वास्तू आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासात याला विशेष महत्त्व आहे. हा किल्ला कोल्हापूर जिल्ह्यात वसलेला असून तो महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. पावन व पन्हाळा असा जोड किल्ला असून पावन गडामुळे पन्हाळ्याला आजही मजबुती प्राप्त झाली आहे. त्याची वास्तुकला प्रामुख्याने शिलाहार, यादव, बहमनी, आदिलशाही आणि मराठा काळातील स्थापत्यशैलींचा संगम दर्शवते. किल्ल्याला सुमारे ७.२५ किमी लांब आणि १५ फूट जाडीच्या तटबंदीने वेढले आहे. त्यात दराजी बुरूज, अंबरखाना बुरूज, संध्यानंद (प्रसारी) बुरूज, अनदर बुरूज अशा अनेक बुरुजांचा समावेश आहे. हे बुरूज शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी, गोळाबारूद साठवून संरक्षणासाठी उपयोगी होते. किल्ल्यात अनेक दरवाजे असून त्यामध्ये आंदान दरवाजा, चिंताकरी आणि संध्यानंद दरवाजा हे प्रमुख आहेत. दरवाज्यांवर मजबूत लोखंडी किल व कलाकृतीयुक्त सजावट आढळते. किल्ल्यात अंधारबाव (गुप्त पाण्याचा साठा), धरणी पाणीटाक्या आणि अनेक विहिरी आहेत. विशेष म्हणजे किल्ल्यावर काही पाण्याच्या टाक्या खडकात कोरलेल्या आहेत, ज्या वर्षभर पुरेसे पाणी पुरवतात. अंबरखाना म्हणजे अन्नधान्य साठवण्यासाठी बांधलेली गोदामे असून ती अर्धगोलाकार छताची आणि दगडात बांधलेली असून ही वास्तू स्थापत्यदृष्ट्या खूप मजबूत आणि शीतल ठेवणारी आहे. एकमेव सुस्थितीत असलेली तुपाची विहीर ही येथे पाहावयास मिळते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी येथे अन्नसाठा ठेवून दीर्घकाळ लढाईची तयारी ठेवली होती. पन्हाळा किल्ला हा केवळ लढायांसाठी बांधलेला किल्ला नसून तो स्थापत्यशास्त्र, जलव्यवस्थापन, सैन्यरणनीती आणि कलात्मकतेचे उत्तम उदाहरण आहे. त्यामुळेच त्याला संरक्षण वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना मानले जाते.


पन्हाळा

## साल्हेर

साल्हेर किल्ला नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुक्यात, सटाणा शहराजवळ सह्याद्री पर्वतरांगेतील एक अत्युच्च (सुमारे ५,१५६ फूट उंच) आणि प्राचीन दुर्ग आहे. साल्हेर व मुल्हेर हे जुळे किल्ले असून साल्हेर हा जास्त उंचीचा आहे. तो छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साम्राज्याचा सर्वात उंच किल्ला मानला जातो. साल्हेर हा गिरीदुर्ग (डोंगरावर वसलेला किल्ला) असून तो पठारसदृश विस्तृत भागावर पसरलेला आहे.

किल्ल्याचा टोकदार माथा व सपाट परिसर यामुळे त्यावर बरेच बांधकाम करता आले आहे. किल्ला भक्कम दगडी तटबंदीने वेढलेला आहे. बुरुज फारसे दिसत नाहीत; पण तटबंदी मजबूत आहे. किल्ल्यावर मुख्य प्रवेशद्वार खडकात खोदलेले आहे. काही ठिकाणी सुरक्षा दृष्टिकोनातून दुमजली दरवाज्यांची व्यवस्था आहे. साल्हेरवर ४ ते ५ मोठ्या नैसर्गिक पाण्याच्या टाक्या आहेत, काही टाक्या वर्षभर पाणी साठवून ठेवू

शकतात. या टाक्यांवर कोरीव काम कमी आहे, परंतु त्यांची रचना खडकात खोदून केलेली असून अर्धवर्तुळाकार किंवा चौकोनी स्वरूपाची आहे. काही टाक्यांतून पाण्याचा नैसर्गिक झरा आजही चालू आहे. किल्ल्याच्या काही भागांतून गुप्त मार्गांचे अस्तित्व आजही दिसते. ही वास्तुकला म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सामर्थ्यशाली सैनिकी दूरदृष्टीचे प्रतीक आहे.


साल्हेर

## लोहगड

लोहगड किल्ला हा महाराष्ट्रातील एक अत्यंत भक्कम आणि सौंदर्यपूर्ण गड आहे. कोकणचे प्रवेशद्वार म्हणून ओळखला जाणारा हा किल्ला पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यात, लोणावळा येथून काही किलोमीटर अंतरावर वसलेला आहे. लोहगड म्हणजे लोखंडासारखा मजबूत गड आणि त्याच्या वास्तुकलेतही भक्कमपणा स्पष्ट दिसतो. लोहगड हा गिरीदुर्ग असून डोंगराचा माथा प्लॅटू (plateau) स्वरूपाचा असून त्याच्या चारही बाजूंनी खोल दऱ्या आहेत. लोहगडवर चार प्रमुख दरवाजे आहेत. यात गणेश दरवाजा, नारायण, हनुमान व माचीकाव दरवाजा आहे. सर्व दरवाजे खडकात खोदलेले आणि अर्धवर्तुळाकार कमानी असलेले आहेत. दरवाजांवर लोखंडी किल, जलमार्ग अडवणारे झरे आणि थेट प्रवेश थांबवणारे वळणदार रस्ते आहेत. यालाच गोमुख पद्धतीचा दरवाजा असे म्हणतात. किल्ला भव्य दगडी तटबंदीने वेढलेला आहे. तटबंदी आणि दरवाजे अत्यंत मजबूत असल्याने पावसाळ्यातसुद्धा टिकून राहतात. किल्ल्यावर खडकात खोदलेल्या १० हून अधिक पाण्याच्या टाक्या आहेत. या टाक्यांमध्ये वर्षभर पाणी टिकून राहते. पाणी वाहून नेण्यासाठी चाळी, गटारे यांची पद्धतसुद्धा किल्ल्यात पाहायला मिळते. लोहगडचे सर्वात प्रसिद्ध वास्तुवैशिष्ट्य म्हणजे विंध्य माची, जी शेपटीप्रमाणे लांब व अरुंद आहे. ही माची विंचवाच्या नांगीप्रमाणे डोंगरातून पुढे आली आहे, जी सामरिक दृष्टिकोनातून शत्रूपासून लक्ष ठेवण्यास अतिशय उपयुक्त होती. माचीच्या टोकापाशी बसून दूरवर नजर ठेवता येते, हे उत्कृष्ट स्थापत्य नियोजनाचे उदाहरण आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी १६७० मध्ये लोहगड पुन्हा जिंकून, येथे कोष ठेवण्यासाठी वापर केला होता.

## सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग किल्ला हा महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील एक अत्यंत प्रसिद्ध सागरदुर्ग आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी १६६४ मध्ये अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर बांधलेला हा किल्ला म्हणजे मराठा नौदलाच्या सामर्थ्याचे जिवंत प्रतीक आहे. किल्ल्याचे बांधकाम काळ्या बेसॉल्ट दगडांनी केलेले आहे. या किल्ल्याच्या बांधकामासाठी किल्ल्यावरच उपलब्ध दगडाचा वापर केला आहे. तटबंदीवरून समुद्राच्या लाटा आपटताना भक्कम रचना अजिबात ढळलेली दिसत नाही, हे वास्तुवैशिष्ट्य अद्वितीय आहे. किल्ल्याचा मुख्य दरवाजा (प्रवेशद्वार) असा बनवलेला आहे की, तो दुरून अदृश्य वाटतो. हा दरवाजा भिंतीत विलीन होऊन गुप्त वाटेप्रमाणे दिसतो, ज्यामुळे शत्रू भ्रमित होतो. हे गुप्त दरवाजाचे तंत्र म्हणजे वास्तुकलेतील चातुर्याचे प्रतीक आहे.

किल्ल्यात राजवाड्याचे अवशेष, गुप्त मार्ग, पाण्याच्या टाक्या, अन्नधान्य साठवण्यासाठी खोल्या आणि हातगोळे व तोफांचे गोदाम होते. किल्ला समुद्रात असूनही त्यात गोड्या पाण्याच्या ३-४ नैसर्गिक टाक्या आहेत. या टाक्यांची खोदाई अशी आहे की, समुद्राचे पाणी त्यात मिसळत नाही, हे भौगोलिक आणि स्थापत्यशास्त्राचे अद्वितीय उदाहरण आहे. सिंधुदुर्ग हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे नौदल सामर्थ्य आणि स्थापत्यशास्त्रातील दूरदृष्टी याचे मूर्तस्वरूप आहे. समुद्रसपाटी, उंच सागरतट, गुप्त दरवाजे आणि समुद्रासोबत तडजोड न करता टिकणारी तटबंदी हे सर्व त्या युगातील अद्वितीय अभियांत्रिकी कौशल्य दर्शवतात.

## सुवर्णदुर्ग

सुवर्णदुर्ग किल्ला हा महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील हर्णे गावाजवळ असलेला एक ऐतिहासिक सागरदुर्ग (समुद्रकिल्ला) आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी याला सागरी संरक्षणासाठी विकसित केले होते. सुवर्णदुर्गची वास्तुकला ही सैनिकी रणनीती, सागरी सुरक्षा आणि कठीण भौगोलिक परिस्थितीला अनुसरून निर्माण झालेली प्रभावशाली संरचना आहे. सुवर्णदुर्ग हा सागरदुर्ग असून तो थेट अरबी समुद्रात एका बेटावर बांधलेला आहे. किनाऱ्यापासून सुमारे १.५ कि.मी. अंतरावर असलेला हा किल्ला पूर्णपणे समुद्राच्या लाटांमध्ये स्थित आहे. किल्ल्याभोवती भक्कम दगडी तटबंदी आहे. किल्ला काळसर बेसॉल्ट दगड वापरून बांधला आहे. समुद्रसपाटीवर असल्यामुळे चुन्याऐवजी शंख, सागरी शिंपले, दही व गूळ मिसळून बनवलेला मसाला वापरण्यात आला होता, हे खास कोकणातील समुद्रदुर्ग स्थापत्यशास्त्राचे वैशिष्ट्य आहे. किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार मजबूत दगडांचे असून, समुद्राच्या


विजयदुर्ग

बाजूनेच आहे. समुद्रात असूनही किल्ल्यावर २-३ गोड्या पाण्याच्या टाक्या आहेत. या टाक्या खडकात खोदलेल्या असून पावसाचे पाणी साठवले जात असे. काही टाक्यांतून अजूनही गोडे पाणी मिळते. सुवर्णदुर्ग हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सागरी साम्राज्याचे प्रमुख नौदल केंद्र होते. येथे मराठा आरमाराचे जहाजांचे लंगर, दुरुस्ती केंद्र व नौदल प्रशिक्षण केंद्र होते. सुवर्णदुर्ग किल्ला म्हणजे एक अभेद्य सागरकिल्ला, जो समुद्राच्या कोपऱ्यात उभा राहून मराठ्यांच्या सामुद्रिक शक्तीचे प्रतिनिधित्व करतो.


सिंधुदुर्ग

## विजयदुर्ग

विजयदुर्ग हा महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला एक अत्यंत भव्य सागरदुर्ग आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी याचे सशक्तीकरण करून मराठा नौदलाचा मुख्य बालेकिल्ला बनवला होता. विजयदुर्ग हा सागरदुर्ग असून तो तीन बाजूंनी समुद्राने वेढलेला असून तो किल्ला काळ्या खडकाळ टेकडीवर वसलेला आहे. किल्ल्याभोवती भक्कम, तीन मीटर जाड आणि १२ मीटर उंच तटबंदी आहे. या किल्ल्यापासून समुद्राच्या दिशेने आत थोड्या अंतरावर पाण्याखाली एक १०० ते १५० मीटर लांब भिंत बांधण्यात आली आहे. यामुळे या किल्ल्यावर आक्रमण करणे शक्य होत नाही. विजयदुर्गमधील अत्यंत विशेष वैशिष्ट्य म्हणजे तीन किमी लांबीचा गुप्त बोगदा, जो किल्ला आणि मुख्यभूमीला जोडतो. हा दगडात खोदलेला भूमिगत मार्ग कोणत्याही वेळी सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी वापरला जात असे. किल्ल्यात गोड्या पाण्याच्या टाक्या, विहिरी व जलवाहिनींचे अवशेष आहेत. काही टाक्या सागरी लाटांपासून सुरक्षित ठिकाणी बांधलेल्या आहेत, जेणेकरून त्यात गोडं पाणी टिकवता येईल. किल्ल्यात पोलाद दरवाजा, महादरवाजा, गुप्त द्वार असे प्रमुख तीन प्रवेशद्वारे आहेत. किल्ल्यात राजसदर, तोफखाना, अन्नधान्य कोठारे, सैनिकांचे निवास आणि नौदल यंत्रणांचे व्यवस्थापन केंद्र होते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी येथे नौदल प्रशिक्षण केंद्र स्थापन केले होते. किल्ल्याची तटबंदी आणि दरवाजे इतके मजबूत की इंग्रज आणि पोर्तुगीजांचेसुद्धा हल्ले निष्फळ ठरले. समुद्रावर लक्ष ठेवणाऱ्या बुरुजांचे स्थान अत्यंत नीट नियोजन केलेले आहे. विजयदुर्ग किल्ला म्हणजे मराठ्यांच्या सागरी सामर्थ्याचे दिमाखदार स्थापत्यदर्शक उदाहरण आहे.


पन्हाळा

## खांदेरी

खांदेरी किल्ला हा महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबागजवळील अरबी समुद्रात असलेला एक लहान; पण अत्यंत महत्त्वाचा सागरदुर्ग आहे. तो छत्रपती शिवाजी महाराज यांनी १६७९ साली बांधायला सुरुवात केलेला जलदुर्ग असून, याच्या स्थापत्यात रणनीती, नौदलाची सुरक्षितता आणि समुद्रावरील नियंत्रण यांचा सुंदर समन्वय आढळतो. मुंबई व आसपासच्या बंदरांवरील सागरी वाहतूक व नौदलावर नियंत्रण ठेवणे आणि ब्रिटिशांवर वचक ठेवणे हा खांदेरी किल्ल्याचा मुख्य उद्देश होता. त्याचबरोबर हा किल्ला शत्रूच्या आरमारी हालचाली रोखण्यासाठी अतिशय महत्त्वाचा होता. किल्ल्याभोवती मजबूत व २० फूट उंचीची दगडी तटबंदी आहे. खांदेरी किल्ला काळ्या बेसॉल्ट दगडांनी बांधला गेला आहे. शिवकाळात येथे तोफा, शिपायांचे निवासस्थान, पाण्याची टाकी, शस्त्रसाठा व गुप्त गोदामे होती. किल्ल्यात एक मंदिर व पाण्याच्या टाक्या अजूनही दिसतात. समुद्रात असूनही खांदेरीवर २-३ गोड्या पाण्याच्या टाक्या आहेत. पाणी साठवण्याची ही प्रणाली खडकात खोदून नैसर्गिकरीत्या रेन वॉटर हार्वेस्टिंगसारखी होती. किल्ल्याचा आकार आणि तटबंदी नौदलाच्या लढाया व संरक्षणासाठी नेमकेपणाने डिझाइन केलेली होती. खांदेरी किल्ला केवळ एक जलदुर्ग नाही, तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सागरी स्वराज्य धोरणातील एक तंत्रशुद्ध आरमारी किल्ला आहे. त्याची वास्तुकला रणनीती, सुरक्षा आणि जलव्यवस्थापन या तिन्ही अंगांनी प्रभावी आहे.


लोहगड

## जिंजी (तामिळनाडू)

जिंजी किल्ला हा भारताच्या तामिळनाडू राज्यातील विलुपुरम जिल्ह्यातील एक दुर्गम, विस्तृत आणि अभेद्य किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दक्षिण दिग्विजयामध्ये हा किल्ला जिंकून घेतला होता. मराठा इतिहासात याचे महत्त्व वाढते कारण छत्रपती राजाराम महाराज यांनी औरंगजेबाच्या आक्रमणापासून वाचण्यासाठी येथे आठ वर्षे वास्तव्य केले (१६८९-१६९८). म्हणूनच जिंजी किल्ला मराठा स्वराज्याचा दक्षिणेकडील बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.

जिंजी हा एक त्रिकुट दुर्ग असून तीन वेगवेगळ्या टेकड्यांवर राजगिरी, कृष्णगिरी आणि चंद्रयान दुर्ग असे तीन स्वतंत्र किल्ले आहेत. या तिन्ही किल्ल्यांमध्ये खोल खिंडी, खड्डे आणि संरक्षणाची विशेष रचना आहे. तसेच विशिष्ट प्रकरच्या भौगोलिक रचनेमुळे हा किल्ला अजिंक्य मानला जातो. यामुळे शत्रूसाठी एकाच वेळी सर्व किल्ल्यांवर हल्ला करणे अशक्य होत असे. दगडी तटबंदी एकूण १३ कि.मी. लांबीची, तर उंची २५ फुटांपर्यंत आहे. किल्ल्याभोवती खोल खंदक व तटबंदीने वेढलेले संरक्षण आहे. किल्ल्यावर अनेक पाण्याच्या टाक्या, नैसर्गिक झरे आणि वर्षा साठवणूक व्यवस्था आहे. जिंजी किल्ल्यावर द्रविड स्थापत्यशैली आणि दुर्गम स्फटिक टेकड्यांच्या साहाय्याने केलेली संरचना आहे. प्रवेशद्वारांवर आणि काही इमारतींवर दगडी शिल्पे, स्तंभ, कमानी व कोरीव काम आढळते. नैसर्गिक अंतर व खिंडींमुळे एकाच वेळी सर्व तिन्ही किल्ल्यांवर हल्ला करणे कठीण आहे. तसेच गुप्त मार्ग, दरवाजांवरील फटी व दृष्टिकोन हे शत्रूच्या हालचाली रोखण्यासाठी उपयोगी ठरतात.


सुवर्णदुर्ग


खांदेरी


जिंजी

### शिवकालीन किल्ल्यांचे वैशिष्ट्ये

छत्रपती शिवाजी महाराज यांनी बांधलेले गडकिल्ले हे केवळ संरक्षणात्मक नव्हते, तर ते शासन, न्याय, रक्षण, जलसंधारण आणि सामाजिक व्यवस्थेचे केंद्र होते. त्यांच्या गड स्थापत्यामध्ये 'माची', 'बालेकिल्ला', ''दरवाजे', 'तलाव', 'गुप्त वाटा', 'बुरूज' यांचा कुशल समन्वय दिसतो. त्यांची गनिमी कावा ही युद्धनीती या किल्ल्यांच्या रचनेतून स्पष्ट होते. शत्रूला अडकवणे, चढाई अवघड करणे आणि अंतर्गत संरक्षण मजबूत ठेवणे हे उद्देश प्रत्येक किल्ल्यात दिसतात. शिवकालीन किल्ल्यांतून मराठ्यांचे स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान, लोकशाहीचा पाया आणि युद्धकौशल्याचे अध्वर्यू तत्त्वज्ञान दिसून येते.

### युनेस्को मान्यतेचा दूरगामी परिणाम

- **पर्यटन आणि रोजगार :** आंतरराष्ट्रीय पातळीवर या किल्ल्यांची ओळख निर्माण झाल्यामुळे पर्यटन वाढेल. त्यामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील.
- **ऐतिहासिक जागरूकता :** तरुण पिढीमध्ये इतिहासाची ओढ निर्माण होईल. नव्या संशोधनाला चालना मिळेल.
- **संवर्धन आणि संरक्षण :** गडांवर स्वच्छता, सुरक्षा व माहिती सुविधा वाढतील. वारसास्थळ म्हणून त्यांचे दीर्घकालीन संवर्धन सुनिश्चित होईल.
- **जागतिक ओळख :** छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य आणि विचार जागतिक पातळीवर पोहोचतील. भारताच्या सांस्कृतिक समृद्धीची ग्वाही ही मान्यता देते.

### गडांचा आत्मा जागृत ठेवा...

छत्रपती शिवाजी महाराज यांनी गडांचे सामर्थ्य ओळखून त्यांना स्वराज्याचा कणा बनवले. आज हेच गड जागतिक स्तरावर मराठ्यांच्या वैभवाचे प्रतीक ठरले आहेत. ही मान्यता आपल्यासाठी आदर, कृतज्ञता आणि कर्तव्य यांचा त्रिवेणी संगम आहे. या गडांचा आत्मा जागृत ठेवण्याच्या जबाबदारीबरोबरच स्वच्छता, शिस्त, ज्ञानवृद्धी आणि संवर्धन या चार बाबींची जबाबदारी घेणे हे आता आपल्या हातात आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांना जगाने मान्यता दिली आहे, आता आपल्या 'स्वराज्यगडां'च्या पायथ्याशी आपणही नतमस्तक होऊ या!

(सहायक संचालक (माहिती))

**युनेस्कोने नामांकन दिलेले १२ किल्ले म्हणजे इतिहासाचे बोलके पुरावे आहेत. या दगडांमध्ये शिवकालीन पराक्रमाची साक्ष आहे. प्रत्येक गडावरचा अनुभव ही आपल्या इतिहासाला अर्पण केलेली भावांजली असते.**

# शिवकालीन पराक्रमाचे साक्षीदार!

**हेमंतकुमार चव्हाण**

मराठ्यांच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थान म्हणून **शिवनेरी** या किल्ल्याची ओळख सर्वांनाच आहे. हा किल्ला मूळ जुन्नरचा किल्ला म्हणून प्रसिद्ध होता. इसवीसन पूर्व काळापासून जुन्नरच्या परिसरास महत्त्व होते. शकांचा पराभव केल्यानंतर सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने हा संपूर्ण प्रदेश आपल्या ताब्यात आणला. सातवाहन काळात नाणेघाट हा प्रमुख व्यापारी मार्ग होता. या मार्गाच्या संरक्षणासाठी या परिसरात



किल्ल्यांची निर्मिती केली गेली. यामध्ये जुन्नर या ठिकाणी असलेला शिवनेरी याचाही समावेश आहे. सातवाहनांच्या नंतर बदामी चालुक्य, राष्ट्रकुट, कल्याणी चालुक्य यांच्या साम्राज्यामध्ये या किल्ल्याचा समावेश होता. सुरक्षित आणि बलदंड किल्ला अशी या किल्ल्याची ओळख. म्हणूनच शहाजी महाराज यांनी शिवनेरी किल्ल्याची निवड केली. या किल्ल्यावरील शिवाई देवीच्या नावावरून या किल्ल्याला शिवनेरी हे नाव पडले. १६३० मध्ये याच किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला.

## राजगड

रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्यस्थापनेची शपथ घेतल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रथम प्रचंडगड अर्थात तोरणा किल्ला जिंकला. त्यानंतर पुरंदर आणि पुणे परिसर ताब्यात घेतला. त्यावेळी आपल्या राज्यासाठी सुरक्षित आणि भक्कम किल्ला असण्याची आवश्यकता छत्रपती शिवाजी महाराज यांना वाटली. यासाठी त्यांनी निवड केली ती गुंजन मावळातील मुरुंबदेव डोंगराची. या डोंगरावर छत्रपती शिवाजी महाराज यांनी राजगड हा किल्ला उभारला. या ठिकाणी प्राचीन काळापासून गढीवजा किल्ला असल्याचे उल्लेख आहेत; पण त्याचे स्वरूप अत्यंत लहान होते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी या डोंगरावर



मोठा किल्ला आणि चार माच्या उभारल्याचा उल्लेख बखरींमध्ये आढळतो. त्यामध्ये शाहिस्तेखानावरील छापा, कोंढाण्याची लढाई, मिर्जाराजे जयसिंगची स्वारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आग्र्याहून सुटका या त्या घटना. मिर्जाराजे जयसिंगच्या स्वारीवेळी १६६५ मध्ये मोगलांनी राजगडावर केलेला हल्ला मराठ्यांनी परतवून लावला.

## रायगड

स्वराज्याची दुसरी राजधानी म्हणून ओळख असलेला हा किल्ला म्हणजे जावळी खोऱ्याचे उत्तर टोक. शिवपूर्व काळात या किल्ल्याचा उल्लेख रायरी या नावानेही येतो. जावळी ज्यावेळी शिर्के यांच्या



ताब्यात होती, त्यावेळी या किल्ल्याचा उल्लेख कागदपत्रांमध्ये आढळतो. म्हणूनच गडस्वामिनी ही शिर्केंचे कुलदैवत असलेले शिरकाई देवी मंदिर रायगडावर आहे. त्यावरून या ठिकाणाचे सामरिक महत्त्व दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी जावळी जिंकल्यानंतर लगेचच रायरी १६५६ मध्ये जिंकून घेतला. त्याचवेळी कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद विजापूरकडे जात असताना महाराजांनी मुल्ला अहमदकडचा खजिना लुटून तो रायगडावर आणला आणि त्याचा उपयोग किल्ला बांधण्यासाठी केला. वास्तुविशारद हिरोजी इंदलकर यांनी या नवीन किल्ल्याची बांधणी केली. १६७४ मध्ये महाराजांनी रायगडला आपली राजधानी बनवले. याच ठिकाणी ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा झाला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा मृत्यूही याच किल्ल्यावर झाला. त्यानंतर घडलेल्या घटनाक्रमामध्ये स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांचा १६ फेब्रुवारी १६८१ रोजी राज्याभिषेकही याच गडावर झाला.

## प्रतापगड

प्रतापगडाच्या पायथ्याशी स्वराज्यावर आलेले सर्वात मोठे संकट छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या युद्धकौशल्य आणि चातुर्याने परतवले. महाराजांनी जावळी जिंकल्यामुळे त्यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने आदिलशाहीचा सेनापती अफजलखान २५ हजारांचे सैन्य घेऊन वाई येथे मुक्कामी होता. अशा बलाढ्य शत्रूशी समोरासमोर



लढणे म्हणजे विनाश हे ओळखून महाराजांनी आपला मुक्काम जावळीच्या खोऱ्यातील दुर्गम अशा प्रतापगडावर हलवला. १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडच्या पायथ्याशी अफजलखानासोबतच्या भेटीत खानाने महाराजांना दग्याने मारण्याचा प्रयत्न फसला आणि महाराजांनी अत्यंत चपळतेने अफजलखानाला ठार केले. त्यानंतर मराठा सैन्याने अफजलखानाच्या फौजेवर हल्ला चढवून त्यांचा पूर्ण पराभव केला. या लढाईने मराठ्यांच्या युद्धकौशल्याची, शौर्याची, महत्त्वाचे म्हणजे चातुर्याची आणि राजकारणाची महती देशभर पसरली.

## पन्हाळगड

१६५९ मध्ये प्रतापगडच्या युद्धात अफजलखानाच्या मृत्यूनंतर आदिलशाहीत निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत छत्रपती शिवाजी महाराज यांनी कोकण आणि कोल्हापूरपर्यंतच्या प्रदेशासोबतच पन्हाळा किल्लाही जिंकला. पन्हाळा किल्ला पुन्हा



जिंकण्यासाठी आदिलशाहने सिद्दी जोहरला पाठवले. सिद्दीचा पन्हाळ्याला पडलेला हा वेढा ५ ते ६ महिने चालला. शेवटी या वेढ्यातून एका अंधाऱ्या रात्री महाराज २०० ते २५० मावळ्यांनिशी रायाजी बांदल आणि त्यांचे सैन्य, बाजीप्रभु देशपांडे, फुलाजी देशपांडे, शंभुसिंग जाधव अशा निवडक सरदारांसह पन्हाळ्यावरून निसटले. त्यांचे निसटणे सुलभ व्हावे, म्हणून शिवा काशिद नावाचा मावळा महाराजांच्या वेशात सिद्दी जौहरच्या भेटीला गेला. जेणेकरून शत्रू बेसावध राहील; पण शत्रूने बेत ओळखला. यावेळी रायाजी बांदल, बाजीप्रभु देशपांडे, शंभुसिंग जाधव अशा सरदारांनी घोडखिंडीत शत्रूसैन्याला अडवायचे आणि महाराजांनी विशाळगड गाठायचा असे ठरले. याप्रमाणे मराठा सैन्याने घोडखिंडीत हजारोंच्या संख्येने असलेल्या विजापुरी सैन्याला रोखून धरले आणि कडवी झुंज दिली. त्यानंतर १६७३ साली हिरोजी फर्जंद या सेनापतीने अवघ्या दीडशे मावळ्यांनिशी रात्रीचा छापा घालून पन्हाळा जिंकला. तेव्हापासून १६९० पर्यंत पन्हाळा मराठ्यांच्या ताब्यात होता.

## साल्हेर

स्वराज्याच्या उत्तर सीमेचा पहारेकरी अशी साल्हेर किल्ल्याची ओळख. छत्रपती शिवाजी महाराज यांनी १६७२ मध्ये हा किल्ला जिंकून घेतला. यावेळी किल्ला परत मिळवण्यासाठी मोगलांची मोठी फौज इख्लास खानाच्या नेतृत्वात चालून आली. मोगलांच्या फौजेचा



मुकाबला करण्यासाठी सूर्याजी काकडे, मोरोपंत पिंगळे, प्रतापराव गुजर हे चालून आले. यावेळी झालेल्या लढाईत जंबुऱ्याचा (छोटी तोफ) गोळा लागून सूर्याजी काकडे धारातीर्थी पडले. या लढाईत खासा इख्लासखान पकडला गेला. त्याशिवाय मोठी लूट मराठ्यांना मिळाली. किल्ल्याच्या पायथ्याच्या मैदानी भागात झालेल्या या लढाईत मराठ्यांनी मोठा विजय मिळवला.

## लोहगड

कोकणचा दरवाजा अशी ओळख असलेला आणि विंचु कड्यामुळे सर्वपरिचित असलेला किल्ला म्हणजे पुणे जिल्ह्यातील लोहगड. १६५७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांनी कल्याण, भिवंडीचा परिसर



जिंकला त्यावेळी लोहगड स्वराज्यात दाखल झाला. १६६५ सालच्या प्रदरच्या तहात हा किल्ला मोघलांकडे गेला. १३ मे १६७० रोजी मराठ्यांनी तो पुन्हा जिंकून घेतला. मराठ्यांचा खजिना याच किल्ल्यावर ठेवला जात होता. नेताजी पालकर यांनी सुरत लुटीचा खजिना याच किल्ल्यावर ठेवल्याचे उल्लेख आहेत.

## खांदेरी

सिद्धी आणि इंग्रज यांच्या ठाण्यांच्या दरम्यान एखादे भक्कम ठाणे उभारणे गरजेचे होते. यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी मुंबईजवळच्या खांदेरी या बेटाची निवड केली. खांदेरी बेटावर मराठ्यांचे ठाणे बसले तर आपल्याला कायमचे भय उत्पन्न होईल, शिवाय सिद्धीला मदत करण्यात अनंत अडचणी येतील, हे हेरून



इंग्रजांनी खांदेरीचा किल्ला बांधता येऊ नये, म्हणून आटोकाट प्रयत्न केले. दर्यासारंग मायनाक भंडारी यांच्या नेतृत्वात खांदेरी हा किल्ला बांधणीचे काम सुरू होते. या बांधकामावेळी लागणारे बांधकाम साहित्य हे किनाऱ्यावरून बेटावर पोहोचवण्यासाठी येणाऱ्या बोटींना अटकाव करण्यासाठी इंग्रजांनी काही गलबते बेट आणि किनारा यांच्यामध्ये ठेवून अडथळे निर्माण केले; पण दौलतखान आणि दर्यासारंग यांच्यासमोर इंग्रजांची मात्रा चालली नाही. खांदेरी किल्ल्याच्या बांधकामामध्ये अडथळे निर्माण करण्याचे त्यांचे प्रयत्न निरुपयोगी ठरले. जोपर्यंत मराठ्यांचे आरमार मजबूत होते, तोपर्यंत इंग्रजांना नेहमीच या किल्ल्याची धास्ती राहिली. तसेच या किल्ल्यामुळे जंजिऱ्याचा सिद्दी यालाही धाक निर्माण झाला.

## सुवर्णदुर्ग

मराठा आरमाराचे प्रमुख ठाणे अशी ओळख असलेला सुवर्णदुर्ग हा किल्ला १६६० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांनी उभारला. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान असलेला हा किल्ला नंतरच्या



काळात मराठा आरमाराची राजधानी बनला. मराठा आरमाराचे प्रमुख कान्होजी आंग्रे यांच्या ताब्यात १६९६ साली हा दुर्ग आला. त्यानंतर थोरले शाहू महाराज यांनी आंग्रेंना जे किल्ले बक्षीस दिले, त्यामध्ये सुवर्णदुर्गाचा समावेश होता.

## विजयदुर्ग

कोकणच्या शिलाहार घराण्यातील राजा भोज याने बांधलेला हा किल्ला घेरीयाचा किल्ला म्हणून ओळखला जात असे. ८०० वर्षांपूर्वी बांधलेला हा किल्ला आजही भक्कमपणे उभा आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी १६५३ मध्ये हा किल्ला जिंकून घेतला. महाराजांनी स्वतःच्या हाताने ज्या किल्ल्यांवर प्रथम भगवा फडकवला तो म्हणजे पहिला तोरणा आणि दुसरा विजयदुर्ग. ८ फेब्रुवारी १६६५ रोजी



महाराज याच विजयदुर्ग येथून ८५ गलबते, तीन मोठ्या महागिऱ्या आणि चार हजार सैनिक घेऊन बसनूरच्या स्वारीसाठी रवाना झाले. मराठा आरमाराचे हे एक प्रमुख केंद्र त्या काळापासूनच होते. नंतरच्या काळात हा किल्ला सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या ताब्यात राहिला. त्यांच्या काळात मराठा आरमाराची ताकद मोठ्या प्रमाणावर वाढली होती आणि संपूर्ण कोकण किनारपट्टीवर मराठा आरमाराचा दरारा निर्माण झाला होता. डच, पोर्तुगीज, इंग्रज अशा सर्वांनीच विजयदुर्ग जिंकण्याचा प्रयत्न केला; पण या किल्ल्यापासून ३०० फूट समुद्रात १२२ मीटर लांबीची सात मीटर रूंद आणि तीन मीटर उंचीची एक मजबूत भिंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात बांधण्यात आली. त्यामुळे या किल्ल्याजवळ कोणतेही मोठे लढाऊ गलबत येऊ शकत नव्हते.

## सिंधुदुर्ग


छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वहस्ते उभारलेला किल्ला म्हणजेच मालवणच्या किनाऱ्यावरील शिवलंका म्हणून ओळखला जाणारा सिंधुदुर्ग! या किल्ल्याचे बांधकाम २५ नोव्हेंबर १६६४ रोजी सुरू झाले आणि तीन वर्षांत पूर्ण करण्यात आले. तब्बल एक कोटी होण खर्चून हा किल्ला उभारण्यात आला. जंजिऱ्यापेक्षा भक्कम असा हा किल्ला उभारताना त्याच्या पायव्यामध्ये शिसे ओतून तटबंदी भक्कम



करण्यात आली आहे. या किल्ल्याला जोडून पडकोट म्हणून सर्जेकोट, राजकोट, पद्मदुर्ग या किल्ल्यांचीही उभारणी करण्यात आली आहे. महाराजांचे एकमेव मंदिर असलेल्या या किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हाताचे आणि पायाचे ठसे आहेत.

## जिंजी

स्वराज्याची दक्षिण राजधानी अशी ओळख असलेला हा किल्ला चोल राजा विक्रम याच्या काळात बांधल्याचे विविध उल्लेखांमध्ये आढळते. चोलांपासून नंतर विजयनगरपर्यंत हा किल्ला विविध शासकांच्या हाती राहिला. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दक्षिण दिग्विजयावेळी १६७७ मध्ये हा किल्ला जिंकला आणि त्याची मजबुती



केली. पुढे महाराष्ट्रात मोघली फौजांचा धुमाकुळ सुरू झाला. अशा प्रसंगी सुरक्षित असा सुदूर दक्षिणेतील जिंजी किल्लाही छत्रपती राजाराम महाराज यांच्या उपयोगी आला. पन्हाळ्यावरून सुखरूप निसटल्यावर १६८९ मध्ये छत्रपती राजाराम महाराज यांनी जिंजी येथे जाऊन त्यास राजधानीचा दर्जा दिला आणि तेथूनच स्वराज्याचा कारभार चालवला. छत्रपती राजाराम महाराज यांना पकडण्यासाठी मोघलांनी तब्बल सात वर्ष जिंजीला वेढा दिला. या सात वर्षांच्या काळात सरसेनापती संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी जिंजी किल्ल्याचा बचाव केला.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

**महाराष्ट्र शासन गतिमान आणि पारदर्शकतेने काम करीत आहे. सर्वच विभागांमध्ये याचा प्रत्यय येत असून राज्य शासनाचा क्षेत्रीय योजना राबविणाऱ्या विभागांत सर्वात प्रमुख विभाग असलेल्या महसूल विभागाने मागील ७-८ महिन्यांच्या कालावधीत लोकहिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. यामध्ये प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान, जिवंत सातबारा, नवीन वाळू निर्गती आणि कृत्रिम वाळू धोरण, दस्त नोंदणीसाठी सलोखा योजना, ड्रोनद्वारे गौणखनिज सर्वेक्षण, तुकडेबंदी कायद्यात सुधारणा आदींचा समावेश आहे.**

# लोकाभिमुख महसूल विभाग

**चंद्रशेखर बावनकुळे,** महसूल मंत्री

लोकाभिमुख असलेल्या महसूल विभागाचे काम गतिमान आणि पारदर्शक राहण्यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी; तसेच तहसीलदार यांच्यासह महसूल यंत्रणेतील अधिकारी-कर्मचारी यांना त्यांच्या क्षेत्रात नियतकालिक दौरे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कालावधीत त्यांनी नागरिकांशी सुसंवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्यांचे निराकरण करणे हा यामागील उद्देश आहे.

## वाळू निर्गती धोरण

विकासक व नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी, नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व आणि तुटवडा विचारात घेऊन कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने शासनाने सुधारित वाळू निर्गती धोरण जाहीर केले आहे. वाळू उत्खननासाठी परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकास कामांसाठी; तसेच नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी, असा प्रमुख उद्देश आहे.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मध्ये नाला, नदी व खाडीपात्रातील वाळू / रेतीच्या निर्गतीबाबत तरतुदी केल्या असून 'लिलाव, विनियोग इत्यादींच्या अटी व शर्ती या संबंधातील कार्यपद्धती शासनाकडून वेळोवेळी सूचनांच्याद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल.' अशी तरतूद केली आहे. यानुसार वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करून देण्यास क्षेत्रीय स्तरावर आलेल्या अडचणी, डेपोपद्धती व लिलावपद्धती यामधील गुण-दोष; तसेच विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या समितीने सादर केलेला अहवाल विचारात घेऊन वाळू निर्गती धोरणाच्या अनुषंगाने हरकती / सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन मंत्रिमंडळाच्या मान्यतेने वाळू / रेती निर्गती धोरण-२०२५ जाहीर करण्यात आले आहे.

स्थानिक वापर व घरकुलासाठी सहज व सुलभतेने वाळू उपलब्ध करणे, पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना हातपाटी-डुबी पद्धतीने विनालिलाव पद्धतीचा वापर करून वाळूगट उपलब्ध करुन देणे, खासगी शेतजमिनीमध्ये नैसर्गिक कारणामुळे अथवा इतर कारणामुळे जमा झालेली वाळू निष्कासन करून शेतजमीन लागवडीयोग्य करणे, नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुटवडा




| दिनांक | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|
| १ ऑगस्ट | "महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ" "महसूल संवर्गातील कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी / कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ" |
| २ ऑगस्ट | "शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम" |
| ३ ऑगस्ट | "पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे" |
| ४ ऑगस्ट | "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे" |
| ५ ऑगस्ट | "विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करणे" |
| ६ ऑगस्ट | "शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/ सरकारजमा करणे) निर्णय घेणे" |
| ७ ऑगस्ट | "M-Sand धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे (SOP प्रमाणे) धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ" |

## महाराजस्व अभियान

गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजनेंतर्गत महसुली क्षेत्रीय कार्यालयाकडून जनतेस सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २०२५-२६ या वर्षात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान मंडळ स्तरावर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंडळ स्तरावर वर्षातून किमान चार वेळा हे अभियान आयोजित करण्यात येऊन यामध्ये सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला यांना महसूल विभागाशी संबंधित विविध प्रमाणपत्रांचे वाटप करणे; तसेच नागरिकांच्या तक्रारी दूर करणे, हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न तातडीने निकाली काढणे व महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या दृष्टीने १ जून ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत महाराजस्व अभियान हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'माझी जमीन, माझा हक्क' या राज्यव्यापी अभियानासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि-अभिलेख यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती महसूल, मुद्रांक व नोंदणी विभाग आणि भूमि-अभिलेख विभागाशी निगडित निवडक कामांचा शोध घेऊन कामे निश्चित करणार आहे.

या बाबी विचारात घेऊन कोणत्याही काँक्रिटच्या बांधकामामध्ये कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त कृत्रिम वाळूचा वापर करणे, पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळूगटामधून खाडी व नदीपात्रातील वाळूगटांसाठी लिलाव प्रक्रियेचा अवलंब करून वाळू उत्खनन करणे व मोठ्या खाणींमधील ओव्हर बर्डनमधून निघणाऱ्या वाळूचा वापर करणे, यासाठी सध्याच्या वाळू धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

## कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणाला गती

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुटवडा या बाबी विचारात घेऊन काँक्रिटच्या बांधकामामध्ये कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. त्यासाठी जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या बांधकामांमध्ये लागणाऱ्या एकूण वाळूच्या किमान २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात येणार आहे. सुरुवातीला हे प्रमाण २० टक्के करण्यात येऊन पुढील तीन वर्षांपर्यंत १०० टक्के कृत्रिम वाळू बंधनकारक करण्यात येईल. राज्यात कृत्रिम वाळूच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात ५० नवीन क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. एम-सँडला उद्योगाचा दर्जा देण्यात आल्यामुळे उद्योगांना सर्व सुविधा उपलब्ध होतील.

## स्वामित्वधनाची आवश्यकता नाही...

केंद्र/ राज्य शासनाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोणत्याही योजनेतून गावतळी/ शेततळी/ शेतविहिरी/ पाझर तलाव/ गावनाले/ महसुली नाले/ बंधारे बांधकाम/ माजी मालगुजारी तलाव/ लघुसिंचन तलाव यांचे खोलीकरण; तसेच पूरहानी थांबविण्याकरिता करण्यात येणाऱ्या खोलीकरण योजनेंतर्गत निघणारी माती/ दगड/ मातीयुक्त रेती इत्यादी गौण खनिज मातोश्री ग्राम समृद्धी शेत/ पाणंद रस्ते, विविध घरकूल योजनेचे लाभार्थी (पाच ब्रास मर्यादा), शेतकऱ्यांना स्वत:ची विहीर बांधणे; तसेच ग्रामपंचायत, नगरपालिका व इतर शासकीय बांधकामांना उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे. या कारणांसाठी गौण खनिजाचा वापर केल्यास त्यास कोणतेही शुल्क अथवा स्वामित्वधन आकारण्यात येणार नाही.

## तुकडेबंदी कायदा रद्दचा निर्णय

राज्यातील वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर तुकडेबंदी कायद्यामुळे जवळपास ५० लक्ष कुटुंबांचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या दृष्टीने सरकार अतिशय महत्त्वाचा व क्रांतिकारी निर्णय घेत आहे. १ जानेवारी २०२५ पर्यंत नागरी क्षेत्रांमध्ये जे तुकडे झाले आहेत, त्यात एक गुंठा आकारापर्यंतच्या तुकड्यांना कायदेशीर दर्जा देण्यासाठी तुकडेबंदी कायदा शिथिल केला जाणार आहे. तसेच भविष्यात हा कायदा कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी योग्य कार्यपद्धती (एसओपी) ठरवली जाणार आहे.

## ड्रोनद्वारे खाणपट्ट्यांचे सर्वेक्षण

राज्यातील अवैध गौण खनिज उत्खननाला चाप लावण्यासाठी महसूल विभागाने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेण्याचा निर्णय घेतला आहे. ड्रोनद्वारे खाणपट्ट्यांचे सर्वेक्षण करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. लवकरच राज्यातील सर्व खाणपट्ट्यांची मोजणी पूर्ण करण्यात येणार असून, यामुळे अवैध उत्खननाला आळा घालण्याबरोबरच कृत्रिम वाळू निर्मिती प्रकल्पाला गती मिळणार आहे.

## ड्रोन सर्वेक्षणाचे फायदे

ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे सर्वेक्षण केल्यास खाणपट्ट्यांमधील पूर्वीचे खोदकाम, चालू खोदकाम, भविष्यातील खोदकामाची शक्यता आणि उपलब्ध दगड खाणींची सविस्तर माहिती मिळणार आहे. यामुळे अवैध वाळू उत्खननावर नियंत्रण ठेवणे सोपे होईलच, शिवाय कृत्रिम वाळू निर्मिती प्रकल्पासारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना मिळेल. या सर्वेक्षणातून मिळणारी माहिती प्रत्येक तीन महिन्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून ती तातडीने 'महाखनिज' संकेतस्थळावर अपलोड केली जाईल.

महसूल विभाग गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीवर कडक नियंत्रण ठेवण्यासाठी वचनबद्ध आहे. दगड, मुरूम आणि वाळू यांसारख्या गौण खनिजांचे उत्खनन आणि रॉयल्टी संकलनावर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर हे एक क्रांतिकारी पाऊल ठरणार आहे. यामुळे अवैध उत्खननाला आळा घालण्याबरोबरच खनिज व्यवस्थापनात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास आहे.

## जिवंत सातबारा

सर्व मृत खातेदारांच्या वारशांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करावयाच्या हेतूने राज्यात १ एप्रिल २०२५ पासून 'जिवंत सातबारा मोहीम' राबविण्यात येत आहे. यामध्ये अधिकार अभिलेखात अद्ययावतीकरणाची कार्यवाही करण्यात येत आहे. यात प्रामुख्याने अपाक शेरा कमी करणे, एकत्र कुटुंब मॅनेजर नोंद कमी करणे, तगाई कर्जाच्या नोंदी कमी करणे, कालबाह्य नोंदी कमी करणे यांचा समावेश आहे. यामुळे सातबारा अधिक स्पष्ट आणि सुटसुटीत होणार आहे. जमिनीच्या मालकी हक्कांसंबंधीचे वाद कमी होण्यास मदत होणार असून शासकीय योजना आणि विकासकामांसाठी जमिनीची अचूक आकडेवारी उपलब्ध होणार आहे.

## सलोखा योजना

शेतजमीन हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा व संवेदनशील विषय असल्यामुळे त्यातील वादांमुळे कौटुंबिक नात्यांमध्ये एकमेकांबद्दल असंतोषाची भावना व दुरावा निर्माण झाला आहे. या वादांमुळे अनेक पिढ्यांचे नुकसान झाले असून, आजच्या पिढीचाही खर्च व वेळेचा अपव्यय होत असून अशा प्रकारचे वाद संपुष्टात येण्यामध्ये म्हणावी अशी प्रगती झालेली दिसत नाही.




शासनाने शेतजमिनीचा ताबा व मालकीबाबत शेतकऱ्यांतील आपापसांतील वाद मिटविण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमधील सौख्य व सौहार्द वाढीस लागण्यासाठी एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनाचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीनधारकांचे अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र एक हजार रुपये व नोंदणी शुल्क नाममात्र एक हजार रुपये आकारून मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्कामध्ये सवलत देण्याची 'सलोखा योजना' राबविण्यास शासनाने जानेवारी २०२३ मध्ये दोन वर्षांसाठी मान्यता दिली होती. या योजनेची मुदत संपल्यानंतर शेतजमिनीचा ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांतील आपापसांतील वाद मिटविण्यासाठी व समाजामध्ये सलोखा निर्माण होऊन एकमेकांमधील सौख्य व सौहार्द वाढीस लागण्यासाठी सलोखा योजनेचा कालावधी आणखी दोन वर्षांनी म्हणजेच १ जानेवारी २०२७ पर्यंत वाढविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सलोखा योजनेमुळे शेतजमिनीबाबतची दस्त नोंदणी सवलतीमध्ये होत असल्याने या अनुषंगाने निर्माण होणारे वाद संपुष्टात येतील, असा विश्वास आहे.

## शेतरस्ता

प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना आणली जाणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल, ही योजना समग्र असण्यासाठी महसूल मंत्री म्हणून माझ्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनात विधानसभेत केली आहे. याबाबत लवकरच शासनाला उपाययोजनांचा अहवाल सादर केला जाईल. शेतरस्त्यांच्या प्रकरणांमध्ये अपील उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत संपवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. वाटपपत्रात शेतकऱ्यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. यापुढे शेतरस्ता किमान ३ ते ४ मीटर रुंदीचा करण्यात येईल. जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेत रस्त्यांना क्रमांक देण्याची कार्यवाहीदेखील करण्यात येईल. ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात शेतरस्त्याची नोंद झाल्यामुळे त्या रस्त्याची कायदेशीर वैधता स्थापित होईल व भविष्यात शेतरस्त्यांच्या वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

## आकारी पड जमीन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२० अन्वये आकारी पड म्हणून घोषित झालेल्या जमिनीच्या संदर्भात कसूरदार शेतकरी अथवा त्यांच्या वारसाने आकारी पड जमिनीच्या चालू वर्षाच्या प्रचलित बाजारमूल्याच्या ५ टक्के रक्कम शासनास जमा केल्यास, हस्तांतरणास निर्बंध या अटीवर संबंधित जमीन त्यांना परत करण्यात येईल, अशी सुधारणा करण्यात आली आहे. यानुसार महसूल विभागाच्या क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना सर्वंकष मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

## प्रतिज्ञापत्रांसाठीचे मुद्रांक शुल्क माफ

दहावी, बारावीच्या परीक्षांचा निकाल लागतो, तेव्हा सर्व विद्यार्थी व पालकांची प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी धावपळ सुरू होते. केवळ शैक्षणिकच नाही, तर इतर अनेक कारणांसाठी हे दाखले लागतात. सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात येत आहे. आता केवळ स्वसाक्षांकित अर्ज लिहून तहसील कार्यालयातून प्रमाणपत्रे मिळणार आहेत. त्यामुळे दरवेळी पालकांचा होणारा खर्च वाचून विशेषतः विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महसूल वाढीसाठी अशा दाखल्यांसाठीचे मुद्रांक शुल्क १०० रुपयांवरून ५०० रुपये करण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. या निर्णयाचा सर्वाधिक फटका हा विद्यार्थ्यांना बसल्याने हा निर्णय मागे घेत, सर्व प्रकारचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एकूणच राज्य शासनाच्या लोकहिताच्या विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून पारदर्शकतेकडून परिवर्तनाकडे जाणारा लोकाभिमुख महसूल विभाग भविष्यातही असाच कार्यात अग्रेसर राहील, हे निश्चित.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमाल विक्रीची व्यवस्था अधिक सक्षम करणे हे पणन विभागाचे प्रमुख कार्य आहे. जागतिक कृषी विपणन व्यवस्थेचा विचार करता राज्याची कृषी विपणन व्यवस्थासुद्धा बळकट होणे आवश्यक आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक भाव मिळून देण्यासाठी आधुनिक संसाधनयुक्त पणन सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असून, त्यानुसार धोरणात्मक बदलाची सुरुवात झाली आहे. या माध्यमातून पणन सुविधा बळकट होताहेत...**

# पणन सुविधांना बळकटी!

**जयकुमार रावल,** पणन मंत्री



पणन विभाग राज्यात उत्पादित होणारी फळे, फुले, भाजीपाला, मासे, सी फुड यांचे ग्रेडिंग, पॅकिंग आणि मार्केटिंगसाठी यंत्रणा विकसित करण्याचे नियोजन करत आहे. तसेच जागतिक बाजार व्यवस्थेशी सुसंगत होण्यासाठी प्रभावी उपाय केले जात आहेत. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राच्या शेतमालाचे मार्केटिंग वाढवण्यासाठी; तसेच राज्यातील वर्तमान शेतमाल विक्रीव्यवस्था व्यवस्थित असली, तरी जगाच्या कृषिमाल विक्रीव्यवस्थेशी स्पर्धा करण्यासाठी जागतिक स्तरावरील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यातील व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी विभागाचे धोरणात्मक नियोजन चालू आहे. राज्यात उत्पादित होणाऱ्या फळे आणि भाजीपाल्यांसाठी वेगवान पुरवठा साखळीने आंतरराष्ट्रीय बाजारपेठ जोडण्याचा प्रयत्न केला जात असून जागतिक स्तरावरील बाजारपेठेचा अभ्यास केला जात आहे.

## आंब्याच्या निर्यातीत दुपटीने वाढ

वाशी येथील विकीरण सुविधा केंद्रामधून २०२४ च्या १००३ मे.टन च्या तुलनेत २०२५ च्या हंगामात सुमारे दुप्पट म्हणजेच २०३५ मे. टन आंबा निर्यात झाला आहे. यामध्ये अमेरिकेत २०२४ च्या हंगामात ९६० च्या तुलनेत २०२५ मध्ये सर्वाधिक १९९५ मे. टन आंब्याची निर्यात झाली आहे. त्याचप्रमाणे ऑस्ट्रेलियामध्ये या वर्षी ३७, तर मलेशियामध्ये तीन मे. टन आंबा निर्यात करण्यात आला. सध्या अमेरिकेतील एका निरीक्षकाच्या उपस्थितीत हे सुविधा केंद्र १२ तास चालवले जात असून पुढील वर्षी दोन निरीक्षकांच्या उपस्थितीत २४ तास चालवण्याचे नियोजन आहे. यामुळे आंब्याची निर्यात मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.



प्रथम भूमिपूजन सिंधुदुर्ग बाजार समिती मार्केट यार्ड.

## आजची फळे दुसऱ्या दिवशी दुबईच्या डायनिंग टेबलवर

फ्रान्समधील पॅरिसजवळ रुंजिस हे सर्वात मोठे फळांचे मार्केट आहे. त्या धर्तीवर कोकण, मध्य आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी भिवंडी तालुक्यातील बापगाव येथे, तर नागपूर परिसरासाठी काळडोंगरी येथे फळ बाजार उभारण्यात येणार आहे. समृद्धी महामार्ग आणि वाढवण बंदर यांची त्याला जोड असेल.

राज्यात उत्पादित होणारी ताजी फळे किंवा भाजीपाला वेगवान पुरवठा साखळीच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कसे पोहोचतील, यासाठी जलद पुरवठा साखळीने राज्यातील काही कृषी उत्पन्न बाजार समिती जोडण्याचे पणन विभागाचे नियोजन आहे. राज्यात कोणत्याही भागात उत्पादित केलेली ताजी फळे किंवा भाजीपाला १२ ते १४ तासांच्या आत दुबईसह इतर बाजारपेठेतून आंतरराष्ट्रीय ग्राहकाच्या टेबलपर्यंत कसा पोहोचेल, यासाठी आमचे नियोजन सुरू आहे.

## उत्तर महाराष्ट्रातील उत्पादनांची बाजारपेठ विस्तारणार

उत्तर महाराष्ट्रात नाशिक बरोबरच धुळे, नंदुरबार, जळगाव या जिल्ह्यांमध्ये द्राक्ष, कांदा, कापूस, मिरची, केळी यांसारखी उत्पादने आहेत. या शेतमालावर प्रक्रिया करून दीर्घकाळ टिकतील अशी उत्पादने तयार करण्यासाठी प्रक्रिया उद्योग व त्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी पणन विभागातर्फे विविध प्रकल्पांवर काम सुरू आहे. ही सर्व कृषी उत्पादने तसेच बेदाणा, केळीचे वेफर्स यांसारखी उत्पादने देशभर विख्यात असून त्यांचे इतर राज्यात मार्केटिंग आणि मागणीनुसार पुरवठा साखळी विकसित करण्यावर भर देण्यात येत आहे.

## महामुंबई आंतरराष्ट्रीय कृषी बाजार

समृद्धी महामार्ग आणि वाढवण बंदर यांची कनेक्टिव्हिटी असलेला, आधुनिक सुविधांनी युक्त 'महामुंबई आंतरराष्ट्रीय कृषी बाजार' निर्माण करण्याचे नियोजन सुरू आहे. त्यासाठी जमीन उपलब्धतेबाबत जिल्हाधिकारी पालघर यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला असून, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांकडून जमीन उपलब्धतेबाबत प्राथमिक माहिती प्राप्त झाल्यानुसार डहाणू तालुक्यातील दापचरी येथे आंतरराष्ट्रीय बाजार उभारण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

## कांद्याचे मार्केटिंग आणि कांदा महाबँक

महाराष्ट्र हे देशातील प्रमुख कांदा उत्पादक राज्य आहे. कांदा निर्यातीत राज्याचा वाटा ४० टक्के आहे. 'नासिक कांदा' हा ब्रँड तयार करून त्याचे इतर राज्यात; तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मार्केटिंग करण्यात येणार आहे. समृद्धी महामार्गालगत पाच कांदा महाबँक स्थापन करण्याचे नियोजन सुरू असून एक कांदा महाबँकसाठी ८३६ कोटी रुपये असे एकूण ४,१८० कोटी रुपयांचा खर्च यासाठी अपेक्षित आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वर्गीकरण

राज्यात एकूण ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या; तसेच ६२५ उप बाजार आवार कार्यरत आहेत. राज्यातील कार्यरत बाजार समित्यांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने 'अ' वर्गीय कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपवर्गीकरण; तसेच 'ब', 'क' व 'ड' बाजार समित्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार उपलब्ध करून देण्यात आला आहे. 'ई-नाम' या डिजिटल प्लॅटफॉर्मवर बहुतांशी बाजार समित्यांची जोडणी झाली असून राज्यातील १८ बाजार समित्यांना नव्याने 'ई-नाम'शी जोडण्याबाबत प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी आपल्या शेतमालाचे भाव ऑनलाइन

### समृद्धी महामार्गालगत ॲग्रो लॉजिस्टिक हब



समृद्धी महामार्गालगत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या वैजापूर तालुक्यातील जांबरगाव येथील लॉजिस्टिक हब कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून विद्युत वाहिनी टाकण्याची कार्यवाही सुरू असून महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाकडून हा प्रकल्प लवकरच पूर्ण होणार आहे. याचबरोबर अमरावती जिल्ह्यातील धामणगाव, वाशिम जिल्ह्यात कारंजा आणि मंगरुळपीर, बुलढाणा जिल्ह्यात मेहकर आणि अहिल्यानगर जिल्ह्यात सावळी विहीर येथे ॲग्रो लॉजिस्टिक पार्क उभारण्यासाठी ८७ कोटींचा निधी उपलब्ध होण्याबाबतचा प्रस्ताव स्मार्ट प्रकल्प यांना नुकताच सादर करण्यात आला आहे.

राज्यात मुंबई, पुणे, नागपूर, सोलापूर आणि लातूर या 'अ' वर्ग पंचतारांकित पाच, 'अ' वर्ग चार तारांकित १५, 'अ' वर्ग तीन तारांकित २३, 'अ' वर्ग दोन तारांकित ६०, 'अ' वर्ग एक तारांकित ९१, 'ब' वर्ग ५४, 'क' वर्ग २७, 'ड' वर्ग ३० अशा राज्यातील ३०५ बाजार समित्यांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण करण्यात आले असून आस्थापना खर्च निश्चित करण्यात आला आहे.

## कृषी उत्पन्न बाजार 'ई-नाम'शी जोडणी

राज्यातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल विकण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म

पद्धतीने पाहू शकतील. तसेच राज्यातील व देशातील कोणत्याही कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्री करू शकतील. याचा लाभ शेतकऱ्यांबरोबरच खरेदीदारांनादेखील होणार आहे.

## मुख्यमंत्री बाजार समिती योजना

महाराष्ट्र हे कृषिप्रधान राज्य असून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतमाल ग्राहकापर्यंत पोहोचवण्यासाठी प्रत्येक तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती असणे आवश्यक आहे. राज्यात ३०५ कृषी उत्पन्न बाजार समित्या व ६२५ उप बाजार आवार कार्यरत आहेत. मात्र ३५६

तालुक्यांपैकी ६८ तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यरत नसल्याने प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती कार्यरत असावी म्हणून ‘मुख्यमंत्री बाजार समिती’ योजनेच्या माध्यमातून ६५ तालुक्यांत नव्याने कृषी उत्पन्न बाजार समित्या निर्माण केल्या आहेत. यासाठी प्रत्येकी ५ ते १० एकर जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी महसूल विभागाकडे करण्यात आली आहे. यामुळे प्रत्येक तालुक्यातील शेतकऱ्यांना आपली जवळची आणि हक्काची कृषी उत्पन्न बाजार समिती मिळणार आहे.

## सर्वाधिक सोयाबीन खरेदी महाराष्ट्रात

केंद्र सरकारच्या हमी योजनेंतर्गत (एमएसपी) ४,८९२ रुपये दराने राज्यातील ५ लाख ११ हजार ६५७ शेतकऱ्यांकडून



सरकारने मागील वर्षात ११.२१ लाख मेट्रिक टन इतकी सर्वाधिक सोयाबीन खरेदी केली आहे. ही खरेदी देशातील इतर राज्यांच्या तुलनेने सर्वाधिक आहे. शेतकऱ्यांची व लोकप्रतिनिधींची मागणी लक्षात घेता, वेळोवेळी केंद्र सरकारकडून सोयाबीन खरेदीस मुदत वाढ मागून घेतल्याने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. विभागाच्या उत्तम नियोजनामुळे सर्वाधिक खरेदी होऊ शकली, हेही नाकारता येणार नाही.

सोयाबीनचे २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षाचे सरासरी क्षेत्र ४७ लाख २१ हजार ४८८ हेक्टर होते. मागील वर्षी १० जुलै २०२४ पर्यंत पेरणीचे क्षेत्र ४४ लाख ८७ हजार ८४४ इतके होते, तर या वर्षी १० जुलै २०२५ अखेर ४३ लाख ८२ हजार ८०६ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनची प्रत्यक्ष पेरणी झाली आहे. सोयाबीनच्या एकूण अंदाजे पेरणी क्षेत्राच्या तुलनेत मागील वर्षाची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी ९५ टक्के होती, तर या वर्षी ही टक्केवारी ९३ टक्के इतकी आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमी भाव मिळवून देण्याबरोबरच स्पर्धात्मक दर मिळवून देण्यातसुद्धा लाभ होणार आहे.

## कापूस खरेदीप्रक्रिया पारदर्शक व कार्यक्षम

कापूस हे राज्यातील प्रमुख नगदी पीक आहे. त्यासाठी केंद्र सरकार दरवर्षी हमीभाव जाहीर करते. हमीभाव योजनेंतर्गत महाराष्ट्रामध्ये दरवर्षी खरेदी प्रक्रिया राबवली जाते. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा, यासाठी शासन कटिबद्ध असून, कापूस खरेदीप्रक्रिया पारदर्शक आणि अधिक कार्यक्षम करण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत.

## सुधीर कुमार गोयल समिती

राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला चांगला भाव मिळावा, सोबतच निर्यातवृद्धी करून राज्यातील सकल उत्पन्नात शेतीचा हिस्सा वाढावा, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करून राज्यातील विपणन व्यवस्था मजबूत करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. शेतमाल विपणनासाठी पुरेशी आस्थापना, अद्ययावत व डिजिटल यंत्रणा असावी म्हणून पणन विभागाची कालसुसंगत पुनर्रचना व सक्षमीकरण करण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव सुधीर कुमार गोयल यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती पणन विभागाची काल सुसंगत पुनर्रचना व सक्षमीकरण करण्यासाठी मंत्रालयीन व क्षेत्रीय स्तरावर स्वतंत्र यंत्रणा (विभाग) तयार करण्यासाठी अभ्यास करून शिफारस करणार असून आर्थिक भार न येता काही पदे स्वतंत्र करण्याबाबत ही समिती अभ्यास करत आहे. या पदांचे सेवा प्रवेश नियम व प्रतिनियुक्ती धोरण देखील ठरवले जात आहे. या समितीने आपला अंतरिम अहवाल सादर केला असून लवकरच ही समिती अंतिम अहवाल शासनास सादर करणार आहे.

## कांदा धोरण व उपाययोजनांसाठी पाशा पटेल समितीची स्थापना

भारतात कांदा उत्पादनात महाराष्ट्र अग्रेसर आहे. तथापि कांदा उत्पादकांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यामध्ये किमतीतील चढ-उतार, साठवणुकीसाठी पायाभूत सुविधांचा अभाव, निर्यातीवरील निर्बंध आणि पीक काढणीपश्चात होणारे नुकसान यांचा समावेश होतो. यास्तव आव्हानांना तोंड देण्यासाठी किंमत स्थिरीकरण, साठवणूक विस्तार, निर्यात प्रोत्साहन, बाजार सुधारणा आणि शेतकरी कल्याण उपायांवर लक्ष केंद्रित करणारे सर्वसमावेशक कांदा धोरण ठरवणे व त्या संदर्भात उपाययोजनांसाठी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.

एकूणच राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक भाव मिळून देण्यासाठी आधुनिक संसाधनयुक्त पणन सुविधा उपलब्ध करून देण्याला शासनाचे प्राधान्य असून त्या दिशेने सकारात्मक पावले टाकली जात आहेत.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
विभागीय संपर्क अधिकारी

**युवकांना खेळामध्ये करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन करणे, त्यांच्यातील अंगभूत कौशल्यांना दिशा देणे आणि ग्रामीण तसेच शहरी भागात खेळांसाठी आवश्यक सुविधा देऊन, शहरी व ग्रामीण तरुणांना समान संधी उपलब्ध करून देणे यावर शासन भर देत आहे.**

# युवाशक्तीला नवी दिशा!

**श्रद्धा मेश्राम**

भारतातील सर्वात जास्त तरुण लोकसंख्या असलेल्या राज्यांपैकी महाराष्ट्र अग्रगण्य राज्य आहे. तरुण हेच देशाचे भविष्य असल्याने तरुणांच्या ऊर्जेला योग्य दिशा आणि क्रीडा क्षेत्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर चालना देण्यासाठी राज्याने क्रीडा व युवक कल्याण विकास विभागाची स्थापना केली आहे.

युवकांना खेळामध्ये करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन करणे, त्यांच्यातील अंगभूत कौशल्यांना दिशा देणे आणि ग्रामीण तसेच शहरी भागात खेळांसाठी आवश्यक सुविधा देऊन, शहरी व ग्रामीण तरुणांना समान संधी उपलब्ध करून देणे, यावर शासन भर देत आहे. राज्यातून अधिकाधिक खेळाडू तयार व्हावेत, त्यांना व्यावसायिक संधी उपलब्ध व्हाव्यात, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्याचे नाव उज्ज्वल करण्यास सक्षम व सशक्त बनविण्यासाठी क्रीडा विभाग सातत्याने कार्यरत आहे.

महाराष्ट्र शासनाने खेळाडू घडविण्यासाठी विशेष धोरण तयार केले आहे. तसेच शालेय स्तरापासूनच खेळाची आवड निर्माण व्हावी व त्यांना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर खेळांचे प्रदर्शन करता यावे, यासाठी शालेय स्तरावर स्पर्धा घेण्यात येतात. राज्यस्तरीय उत्कृष्ट खेळाडूंना दिला जाणारा मानाचा मुजरा म्हणून शासनामार्फत 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' प्रदान करण्यात येतो. नवनवे खेळाडू निर्माण व्हावे, त्यांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळावे, यासाठी तालुका स्तरावर आधुनिक सुविधांसह क्रीडा संकुल उभारण्यात येत आहेत.

## क्रीडा विकास अनुदान

खेळाडूपर्यंत क्रीडा सुविधा व साहित्य उपलब्ध करून देण्याकरिता पात्र संस्थांना क्रीडांगण विकास अनुदान योजना, व्यायामशाळा साहित्य अनुदान योजना या जिल्हा वार्षिक योजना व क्रीडा सुविधा निर्मितीसाठी आर्थिक साहाय्य योजना या राज्य योजनांच्या माध्यमातून विहित अनुदान देण्यात येते. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरिता खेळाडूंना आर्थिक साहाय्य देण्यात येते.

राष्ट्रीय स्तर, राज्य स्तर, विभाग स्तर, जिल्हास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. शालेय क्रीडा स्पर्धांचे तालुका व जिल्हास्तरावर आयोजन करण्यात येते. त्याकरिता शासनाकडून अनुदान देण्यात येते. तसेच, खेलो इंडिया व राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आवश्यक साहाय्य, प्रशिक्षणाची सुविधा तसेच ट्रॅकसूट व अन्य साहित्य पुरविण्यात येते.

शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये १४ ते १७ आणि १९ वयोगटातील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळनिहाय कामगिरीनुसार गुण प्रदान करण्यात येतात. त्यानुसार प्रोत्साहन अनुदान शाळांना प्रदान करण्यात येते. अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पात्र खेळाडूंना आर्थिक साहाय्य देण्यात येते. राज्य, जिल्हा, क्रीडा परिषद यांना क्रीडा साहित्यासाठी अनुदान प्रदान करण्यात येऊन प्रावीण्य मिळविणाऱ्या शाळांना अनुदान देण्यात येते. याचबरोबर व्यावसायिक प्रशिक्षणाच्या पदवी/पदविका अभ्यासक्रमात राष्ट्रीय पदक विजेत्यांना थेट प्रवेश देण्यात येतो.

## क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्ती

खेळातील प्रावीण्यावर आधारित शालेय व इतर क्रीडा स्पर्धांतून राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंना रुपये ३,७५०/- व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना रुपये ११,२५०/- प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सांघिक, वैयक्तिक खेळाडूंना राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन केल्यास त्यांना अनुक्रमे वार्षिक रुपये ११,२५०/-, रुपये ८,९५०/- आणि रुपये ६,७५०/-; तसेच आंतरराष्ट्रीय वार्षिक स्पर्धेत रुपये ३० हजार, रुपये २२ हजार ५००, रुपये १५ हजार याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

## वयोवृद्ध खेळाडूंना मासिक मानधन योजना

ज्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑलिम्पिक किंवा तत्सम स्पर्धेत भारताचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्याचे सुधारित युवा धोरण तयार करण्याबाबत गठित युवा धोरण समितीची प्रथम बैठक. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री दत्तात्रय भरणे, आ. प्रवीण दटके, आ. संतोष दानवे, आ. श्रीकांत भारतीय, आ. सुहास कांदे यांच्यासह समितीच्या इतर सदस्यांची उपस्थिती.

तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. लोकसंख्येच्या ४० टक्के तरुण आहेत. बदलता वैज्ञानिक दृष्टिकोन, तंत्रज्ञान, जागतिकीकरण, नागरिकांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या याबाबत युवकांमध्ये जागृती निर्माण व्हावी, देशाच्या सर्वांगीण प्रगतीत त्यांचाही सहभाग वाढावा, यासाठी सक्रिय योजनांचा समावेश राज्य युवा धोरणात करण्यात येत आहे. युवा वसतिगृह, युवा महोत्सव, समाजहिताच्या कार्याचा गौरव करण्यासाठी युवा पुरस्कार, युवा नेतृत्व तयार करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांची स्थापना, कल्याणकारी उपक्रमाला आर्थिक साहाय्य करण्यासाठी राज्य युवा विकास निधीची स्थापना; तसेच राज्यात युवा नेतृत्व, व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रशिक्षण देण्यात येते. क्रीडा ही केवळ स्पर्धा नाही तर आरोग्य, शिस्त व प्रगतीची गुरुकिल्ली आहे. राज्यातील युवकांचा आणि खेळाडूंचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून प्रगतीच्या संधी देण्यासाठी शासन कार्यरत आहे.

जास्तीत जास्त क्रीडापटूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होण्यासाठी त्यांना मिशन लक्ष्यवेध योजना, क्रीडा प्रबोधिनी व अन्य योजनांमार्फत आवश्यक त्या सुविधा, साहित्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. क्रीडा धोरणांतर्गत राज्यातील प्रत्येक तालुका, जिल्हा आणि विभाग स्तरावर क्रीडा संकुले उभारण्यात येत आहेत. या क्रीडा संकुलांमध्ये क्रीडा सुविधांचे नूतनीकरण व नवीन सुविधा उभारणी करण्यात येत आहे. राज्यात पुणे येथील श्री शिवछत्रपती राज्य क्रीडा संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उभारण्यात आल्या आहेत. तसेच नागपूर विभागीय क्रीडा संकुलाला शासनाने राज्य क्रीडा संकुलाचा दर्जा दिला असून त्या ठिकाणीदेखील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांचे काम प्रगतिपथावर आहे. आगामी सन २०२९ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन राज्यात होण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा व ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, २०३६ मध्ये भारतात भरविण्याचे केंद्र सरकारचे प्रयत्न विचारात घेऊन शिवछत्रपती क्रीडा संकुल, पुणे व अन्य संबंधित संकुलांमध्ये स्पर्धेसाठी आवश्यक व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांची निर्मिती व विद्यमान सुविधांचे नूतनीकरण, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. एकूणच राज्यात क्रीडास्नेही वातावरणासाठी व युवाकेंद्री विकासासाठी क्रीडा व युवक कल्याण विभाग प्राधान्याने काम करत आहे.



**- दत्तात्रय भरणे, क्रीडा मंत्री**

प्रतिनिधित्व केले आहे, अशा वयोवृद्ध खेळाडूंना मानधन देण्यात येते. महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी, महान भारत केसरी, रुस्तम-ए-हिंद केसरी अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा रुपये १५ हजार, आशियाई अजिंक्यपद एशियन गेम्स व इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धा रुपये १० हजार; तसेच राष्ट्रकुल स्पर्धा रुपये १० हजार; तसेच अर्जुन पुरस्कार रुपये १५ हजार याप्रमाणे मासिक मानधन दिले जाते. राष्ट्रीयस्तरावर एकविध खेळाच्या राष्ट्रीय संघटनेने आयोजित केलेल्या खुल्या गटातील राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत एकविध खेळाच्या राज्य संघटनेमार्फत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केलेल्या खेळाडूंना रुपये ७,५०० प्रमाणे मासिक मानधन देण्यात येते. नोकरी करणाऱ्या महिलांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण देण्याचा हा कार्यक्रम आहे.

## क्रीडा धोरण

क्रीडा क्षेत्रात राज्य अग्रगण्य राहावे, नागरिकांमध्ये व्यायामाची आवड जोपासावी, खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी क्रीडाविषयक तंत्रशुद्ध प्रशिक्षण, खेळाच्या दर्जात सुधारणा, खेळाडूंचा गौरव, दर्जेदार क्रीडा सुविधा या बाबी केंद्रबिंदू मानून खेळाडूंसाठी राज्यात हितावह योजना राबविण्यासाठी क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आले असून खेळाडूंच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा धोरणात सुधारणा करण्यात येणार आहेत. तसेच युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्याच्या युवा धोरणात सुधारणा सर्वच स्तरातील तरुणांच्या सूचनांचा समावेश यात करण्यात येणार आहे.

## मिशन लक्ष्यवेध योजना

ऑलिम्पिक, आशियाई व राष्ट्रकुल यासारख्या महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश संपादन करता यावे, यासाठी मिशन लक्ष्यवेध ही योजना राबविण्यात येत आहे. याकरिता ऑलिम्पिक क्रीडा प्रकारातील निवडक १२ खेळांतील खेळाडूंसाठी क्रीडावैद्यक शास्त्राद्वारे आवश्यक साहाय्य, क्रीडा साहित्य, खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार; याबरोबरच खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी विदेशी संस्थांचा सहभाग असणार आहे. ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शूटिंग, रोईंग, सेलिंग, लॉन टेनिस व टेबल टेनिस या १२ क्रीडा प्रकारांकरिता हाय परफॉर्मन्स सेंटरची स्थापना जिल्हास्तरावर करण्यात येणार आहे.

## खेळाडूंसाठी शासकीय नोकरीत आरक्षण

गुणवत्ताधारक खेळाडूंची गट 'अ', 'ब', 'क' आणि 'ड'च्या पदांवर त्यांच्या क्रीडा अर्हतेप्रमाणे थेट नियुक्ती करण्यात येते. आतापर्यंत एकूण १५३ खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यात आली आहे. या बरोबरच राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेत्या खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेत पाच टक्के खेळाडू आरक्षण राखून ठेवण्यात आले आहे.

## 'खेलो इंडिया' क्रीडा स्पर्धा

'खेलो इंडिया'मार्फत १७ वर्षांखालील खेळाडूंसाठी; तसेच १७ ते २१ वर्षे वयातील खेळाडूंसाठी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा घेण्यात येतात. यामध्ये आर्चरी, बॉक्सिंग, ज्युदो, जिम्नॅस्टिक्स, जलतरण, वेटलिफ्टिंग, कुस्ती, मैदानी, बॅडमिंटन, शूटींग, कबड्डी, खो-खो, बास्केटबॉल, हॉकी, फुटबॉल, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, लॉन टेनिस, लॉन बॉल, सायकलिंग, कलारी पयट्टू, थांग ता, योगा, मल्लखांब, गटका या खेळांचा समावेश आहे. या स्पर्धांचे युथ गेम्स्, बीच गेम्स्, विंटर गेम्स्, पॅरा गेम्स् अशा वेगवेगळ्या आवृत्तींमध्ये होणाऱ्या खेळप्रकारांमध्ये आयोजन होते. वॉटर स्पोर्ट्स आणि निवडक खेळांसाठी खेलो इंडिया स्कुल गेम्स्च्या स्पर्धांचे आयोजन करण्याचे निश्चित होऊन त्या दिशेने प्रक्रिया सुरू झालेली आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २२ जुलै रोजी वाढदिवसानिमित्त देशभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत असतानाही कोणताही वैयक्तिक सोहळा न करता, संपूर्ण दिवस गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी समर्पित केला. सेवाभाव, पर्यावरण संवर्धन आणि औद्योगिक उन्नती या त्रिवेणी संगमातून मागास गडचिरोलीच्या विकासाचा केलेला हा संकल्प होता.**

# सेवा, संकल्प, विकासाचा साज

**गजानन जाधव**

गडचिरोली जिल्ह्यात हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र अभियानांतर्गत एक कोटी वृक्ष लागवडीचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. सध्या गडचिरोली हा राज्यातील सर्वाधिक वनक्षेत्र असलेला जिल्हा आहे, मात्र आता त्याला देशातील सर्वात हरित जिल्हा बनवण्याचा संकल्प मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या निमित्ताने व्यक्त केला. 'महाराष्ट्राचे फुफ्फुस' ही जिल्ह्याची ओळख अधिक बळकट करण्यासाठी वनवाढ, पर्यावरणपूरक औद्योगिकरण आणि जैवविविधतेचे संवर्धन हा त्रिसूत्री दृष्टिकोन पुढे नेला जात आहे.

## स्टील हबची स्वप्नपूर्ती

कोनसरी येथे ४.५ दशलक्ष टन प्रतिवर्ष क्षमतेच्या स्टील प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. हा प्रकल्प राज्याच्या औद्योगिक नकाशावर गडचिरोलीला ठळकपणे अधोरेखित करणारा आहे. यामध्ये सुमारे २४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून १०,००० पेक्षा अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत.

हेडरी येथील आयर्न ओर ग्राईंडिंग युनिट आणि हेडरी-कोनसरी या दरम्यानची महाराष्ट्रातील पहिली व विक्रमी वेळेत पूर्ण झालेली स्लरी पाइपलाईन याचेही उद्घाटन यावेळी करण्यात आले. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे कार्बन उत्सर्जनात ५५ टक्के घट होणार असून पर्यावरणपूरक औद्योगिकरणाचा नवा आदर्श प्रस्तुत केला गेला. तसेच कोनसरी येथे भारतातील



सर्वात मोठ्या पॅलेट प्लांटचे उद्घाटन, १०० खाटांचे आधुनिक रुग्णालय आणि सीबीएसई शाळा या प्रकल्पांचे भूमीपूजन झाले. यामुळे गडचिरोली जिल्ह्यात उद्योग, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील सर्वांगीण विकासाचा महत्त्वपूर्ण टप्पा निश्चित होणार आहे. 'गडचिरोली स्टील हब' हे स्वप्न आता प्रत्यक्ष वास्तवात उतरत असल्याचे मुख्यमंत्री यांनी याप्रसंगी सांगितले.

## आर्थिक प्रगतीचे दृढ आश्वासन

गडचिरोली जिल्ह्याच्या आर्थिक उन्नतीबाबत स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, सध्या दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत गडचिरोली हा जिल्हा राज्यात सर्वात मागे आहे. मात्र जिल्ह्यात होत असलेल्या उद्योग, पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील व्यापक विकासकामांमुळे पुढील पाच वर्षांत गडचिरोलीचा दरडोई उत्पन्नात राज्यातील पहिल्या दहा जिल्ह्यांमध्ये समावेश होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## सेवेसाठी समर्पित वाढदिवस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वर्षी वाढदिवस साजरा करताना हार-तुरे, केक, बॅनर याऐवजी मुख्यमंत्री सहायता निधीत योगदान देण्याचे आवाहन जनतेला केले होते. त्यांच्या या भावनिक आवाहनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला. राज्यभरात रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, आभा कार्ड वितरण, कृत्रिम अवयव वाटप व अवयव दान जनजागृती यांसारखे उपक्रम राबविण्यात आले. अनेक संस्था, नागरिक व उद्योजकांनी मुख्यमंत्री सहायता निधीत मोठ्या प्रमाणावर आर्थिक योगदान दिले. या कार्यातून त्यांच्या नेतृत्वावर असलेला जनतेचा विश्वास अधोरेखित झाला. मुख्यमंत्र्यांनी कोणताही वैयक्तिक गौरव न स्वीकारता संपूर्ण दिवस 'सेवा व विकास' यासाठी अर्पण केला.

## नव्या महाराष्ट्राची दिशा

गडचिरोलीसारखा आकांक्षित जिल्हा जेव्हा हरिततेपासून स्टील उद्योगांपर्यंत प्रगती करतो, तेव्हा तो केवळ स्थानिकच नव्हे, तर राज्याच्या विकासाचे प्रतीक ठरतो. राज्यात पूर्वेकडचा हा पहिला जिल्हा माओवादामुळे विकासप्रक्रियेत सर्वात शेवटी राहिला होता. मात्र मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वात गडचिरोली आता महाराष्ट्राच्या औद्योगिक, सामाजिक आणि पर्यावरणीय प्रगतीचा नवा केंद्रबिंदू बनत असून विकासप्रक्रियेत राज्यातून पहिला जिल्हा ठरण्यासाठी पुढे येत आहे.

**(जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली.)**

**नागपूर हे भौगोलिकदृष्ट्या देशाचा केंद्रबिंदू असणारे शहर. या शहराचे मध्यवर्ती असणे आता भौगोलिक दृष्टिकोनापुरते मर्यादित राहिलेले नाही. गेल्या दशकभरापासून नागपूरच्या चौफेर विकासाची सुरू असलेली घोडदौड शिक्षण क्षेत्रातही कायम आहे. आयआयएम, आयआयआयटी, एआयआयएमएस, महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अशा नामांकित शिक्षण संस्थांच्या स्थापनेमुळे नागपूर हे मध्य भारतातील एक महत्त्वाचे 'एज्युकेशनल हब' म्हणून उदयास आले आहे.**

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ नागपूरचा शैक्षणिक मानबिंदू!

**पल्लवी धारव**

नागपूर शहरात कवी कालिदास संस्कृत विद्यापीठातील संस्कृत साहित्यापासून विज्ञान-तंत्रज्ञान, व्यवस्थापन शास्त्र, माहिती तंत्रज्ञान, विविध वैद्यकीय अभ्यासक्रम तसेच विधिक्षेत्रापर्यंत अशा विविध ज्ञानशाखांमध्ये विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे. येथील शैक्षणिक संस्थांमधून शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कीर्ती प्राप्त केली आहे. देशाच्या न्याय क्षेत्रात अमूल्य योगदान देणाऱ्या नामांकित विधितज्ज्ञांची समृद्ध परंपरा या शहराने देशाला दिलेली आहे. महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या निर्मितीमुळे ही परंपरा भविष्यात अधिकच समृद्ध होणार आहे.

### विद्यापीठाच्या इमारतीचे उद्घाटन

जवळपास १३ वर्षांपूर्वी निर्मितीची संकल्पना मांडण्यात आलेल्या नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन व ग्रंथालयाचे भूमिपूजन देशाचे सरन्यायाधीश तथा विद्यापीठाचे कुलपती भूषण गवई यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता, न्या. प्रसन्न वराळे, न्या. अतुल चांदूरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती तथा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू न्या. आलोक आराधे, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय प्रमुख न्या. नितीन सांबरे, न्या. भारती डांगरे, न्या. अनिल किलोर, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर, देशाचे सॉलिसिटर जनरल ॲड. तुषार मेहता, महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ, विद्यापीठाचे कुलगुरू विजेंदर कुमार, विद्यापीठाच्या कुलसचिव रागिणी खुबाळकर आदी यावेळी उपस्थित होते.

### नागपूरच्या विधि विद्यापीठाचा प्रवास!

सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांनी सर्वप्रथम नागपूरमध्ये नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या स्थापनेचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि तत्कालीन सरन्यायाधीश शरद बोबडे यांच्यासह सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून फार कमी कालावधीत पूर्णत्वास आला. हे विद्यापीठ प्रारंभी केवळ मुंबई येथे स्थापन करण्यात येणार होते; परंतु मुख्यमंत्र्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे या विद्यापीठाची स्थापना मुंबईसह छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर येथेही करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. तीन राष्ट्रीय विधि विद्यापीठे असलेले महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरले आहे. ही बाब विधि शिक्षणाच्या क्षेत्रातील राज्याची प्रगती अधोरेखित करणारी आहे.



ज्ञानार्जनासाठी खुले झालेले हे नवे दालन विधिक्षेत्राचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक नवी संधी आहे. जागतिक स्तरावर नावारूपाला येणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या उभारणीसाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे यातून दिसून येते.

जुलै २०१६ मध्ये सिविल लाईन्स परिसरात कार्यरत झालेल्या या विद्यापीठाच्या जागेसाठी हायकोर्ट बार असोसिएशनने प्रयत्न केले. जागा मिळाल्यानंतर पायाभूत सुविधांच्या उभारणीचे मोठे आव्हान होते. मात्र लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणा यांच्यासह विविध घटक आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे अत्यंत अद्ययावत स्वरूपात विद्यापीठ उभे राहिले आहे.

## आंतरराष्ट्रीय स्तरावर आदर्श

नागपूर येथे राष्ट्रीय विधि विद्यापीठाची स्थापना होणे, ही अत्यंत गौरवाची व अभिमानास्पद बाब ठरली आहे. देशाला प्रगतीच्या वाटेवर नेण्यात या विद्यापीठाचा मोठा वाटा असणार आहे. राज्य सरकारने या विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीसाठी ५०० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी नामांकित वास्तुविशारदकारांची समिती स्थापन करण्यात आली. समितीसमोर विविध मॉडेल्स सादर करण्यात आले व त्यातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या वास्तुशास्त्रज्ञांकडे या इमारतीच्या निर्मितीची विविध कामे सोपविण्यात आली. साठ एकरमध्ये उभारण्यात आलेले हे विद्यापीठ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये आदर्श ठरले आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा परिपूर्ण वापर येथे करण्यात आला असून सौर ऊर्जा व इतर प्रगत सुविधांमुळे ही इमारत पर्यावरणपूरक झाली आहे. पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असलेल्या या विद्यापीठात गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्व सुविधा



उभारण्यात आल्या आहेत. परिसरातील वातावरणामुळे येथील नैसर्गिक सौंदर्यात भर पडली आहे. येत्या काळात हे विद्यापीठ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार असून कायद्याचे सखोल ज्ञान घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही मोठी उपलब्धी ठरली आहे.

आपल्या भाषणात सरन्यायाधीश तथा विद्यापीठाचे कुलपती भूषण गवई यांनी विद्यापीठाच्या उभारणीत योगदान देणाऱ्या सर्व छोट्या-मोठ्या घटकांचा अत्यंत कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. सर्वांचा सहभाग व समर्पणातून निर्माण झालेल्या या विद्यापीठाने आपल्या गुणवत्तेच्या माध्यमातून जागतिक स्तरावर ओळख निर्माण करावी, असा आशावादही सरन्यायाधीशांनी व्यक्त केला.

निष्पक्ष, अचूक आणि गतिमान न्यायदानासाठी आता नव्या तंत्रज्ञानाची मदत घेणे शक्य झाले असून, यामुळे न्यायदानविषयक कामकाजाला अधिक गती मिळणार आहे. आज प्रत्येक क्षेत्रात कायद्याची गरज भासते. भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होत असताना त्यात विधिक्षेत्रातील अद्ययावत शिक्षण व अभ्यासक्रमाची मोठी भूमिका तर असेलच; परंतु कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अधिक जबाबदारी असणार आहे. बदलत्या जगातील आव्हानांचा सामना करायचा, तर विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठांशिवाय दुसरी योग्य जागा नसून या विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना सायबर क्राईम, डिजिटल फ्रॉड; तसेच इतर क्षेत्रात न्यायव्यवस्थेची जाणीव व जागृती निर्माण करण्यास वाव आहे. या विद्यापीठात विधि शिक्षणासोबतच नवाचार, नावीन्यता, नवतंत्रज्ञान, संशोधन आदींचे शिक्षण प्रदान करण्यात येत आहे. हे विद्यापीठ देशातील सर्वोत्तम, स्वयंपूर्ण व धोरण निर्मितीत अग्रणी केंद्र म्हणून उदयास येण्यासाठी येथील सर्व उपक्रम व प्रयत्नांना शासनाचा पूर्ण पाठिंबा देण्यात येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. देशाच्या न्यायव्यवस्थेकडून नागरिकांच्या अपेक्षा उंचावलेल्या असताना व सध्याच्या परिस्थितीत ही व्यवस्था अधिक सुसंगत आणि सक्षम करण्याची गरज असताना येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ भविष्यातील राज्य आणि देशातील विधि शिक्षणाच्या उन्नतीचा मजबूत पाया असल्याचे सिद्ध होईल, यात शंका नाही.

(सहायक संचालक, नागपूर)

### विद्यापीठाची इमारत वास्तूकलेचा सुंदर आविष्कार !

विद्यापीठाची प्रशासकीय इमारत ही आधुनिक वास्तुकलेचा एक सुंदर आविष्कार आहे. या इमारतीत कुलगुरू, कुलसचिव, उपकुलसचिव, परीक्षा विभाग, प्रॉक्टर, मुख्य वॉर्डन, अंतर्गत गुणवत्ता आणि हमी कक्ष, कायदा संग्रहालय, वित्त अधिकारी, अभियांत्रिकी विभाग, विद्यापीठ प्रेस आणि विद्यापीठाच्या इतर कार्यालयांचे बांधकाम जागतिक दर्जाचे आहे. येथील ग्रंथालयात स्वतंत्र संदर्भ कक्षाची सुविधा राहणार असून संगणकीकरणामुळे येथील कामकाज सुलभ करण्यावर भर देण्यात आला आहे. नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाने सुसज्ज ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी विशेष अभ्यासिकेचे नियोजन करण्यात आले आहे. उच्च दर्जाचे आणि पर्यावरणपूरक असलेल्या या इमारतीचे बांधकाम विद्यापीठाच्या दृष्टिकोनानुसार आहे आणि विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देण्यास मोठी मदत करेल. आर्किटेक्चर मनोज लद्दाड आणि आर्किटेक्चर पॅराडाइम, बंगळुरू येथील आर्किटेक्चर संदीप जे हे या इमारतीचे शिल्पकार आहेत. ही इमारत सुपर कन्स्ट्रक्शन कंपनी जेव्हीचे सुरेश पटेल यांनी नागपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता दिनेश नंदनवार यांच्या देखरेखीखाली बांधली असून, महाराष्ट्र सरकारच्या इतर अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील विद्यापीठ इमारत समितीच्या मार्गदर्शनात उभारण्यात आली आहे. हे विद्यापीठ राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी घडविलेले वैभवशाली ज्ञानमंदिर असून प्रगतीचा आधारस्तंभ आहे.

**देशाने विज्ञान आणि तंत्रज्ञानात मोठी प्रगती केली आहे. या प्रगतीच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यातील शिरपूर तालुक्यात समाविष्ट, सातपुडा पर्वतरांगेतील आणि दुर्गम अशा भागातील रोहिणी ग्रामपंचायत! आता जन्म-मृत्यू नोंदणीसह विविध दाखले ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे रोहिणी ग्रामपंचायत केंद्र सरकारतर्फे राष्ट्रीय पातळीवर आयोजित ई- गव्हर्नन्स स्पर्धेत सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे.**

# रोहिणी ग्रामपंचायतीची ई-गव्हर्नन्समध्ये भरारी!



**विलास बोडके**

सातपुडाच्या डोंगररांगेत वसलेले रोहिणी हे गाव १०० टक्के आदिवासी गाव आहे. या ग्रामपंचायतीचा अनुसूचित क्षेत्राअंतर्गत 'पेसा'त समावेश आहे. केंद्र सरकारच्या कार्मिक, सार्वजनिक तक्रार आणि निवृत्ती वेतन मंत्रालय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाने २०२३-२०२४ मध्ये आयोजित स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या स्पर्धेत रोहिणी ग्रामपंचायतीला करंडक, प्रमाणपत्र आणि १० लाख रुपयांचा रोख पुरस्कार मिळणार आहे. या पुरस्काराचा वितरण सोहळा लवकरच होणार आहे.

## देशातील सहा ग्रामपंचायतींचा सहभाग

राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार २०२३-२४ स्पर्धेसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला होता, त्यात धुळे जिल्हास्तरावरून राज्यस्तरावर रोहिणी (ता.शिरपूर) ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यातून एकूण १८ ग्रामपंचायतींची निवड झाली होती. त्यात राज्यात पहिला क्रमांक मिळवून रोहिणी ग्रामपंचायतींची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. या स्पर्धेसाठी देशभरातून केवळ सहा ग्रामपंचायती या पुरस्कारासाठी सहभागी झाल्या होत्या. त्यात रोहिणी ग्रामपंचायतीने सुवर्णपदकाला गवसणी घातली. याशिवाय पश्चिम मजलीशपूर, जि. पश्चिम त्रिपुरा (त्रिपुरा) ग्रामपंचायतीस रौप्य पुरस्कार, पलसाणा, जि. सुरत (गुजरात) आणि सुकाटी जि. केंदुझार (ओडिशा) या ग्रामपंचायतींना ज्युरी पुरस्कार मिळाला आहे. या स्पर्धेत प्रामुख्याने ग्रामपंचायती किंवा समतुल्य पारंपरिक स्थानिक संस्थांद्वारे केलेल्या उपक्रमांवर लक्ष केंद्रित करून सेवा वितरण अधिक सखोल/विस्तारित करण्यासाठी 'ग्रासरूट लेव्हल इनिशिएटिव्हज्' या श्रेणींतर्गत सुवर्ण, रौप्य आणि ज्युरी पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी गेल्या मे महिन्यात राजधानी नवी दिल्ली येथे सेंट्रल ज्युरी पथकासमोर धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी सादरीकरण केले होते.

## ग्रामपंचायत देतेय ऑनलाइन सेवा

राष्ट्रीय पातळीवरील ई-गव्हर्नन्स स्पर्धेत सहभागी होताना रोहिणी ग्रामपंचायतीने ऑनलाइन सेवा ग्रामस्थांना कशा प्रकारे देता येतील, याचा प्रामुख्याने विचार केला. त्यासाठी ग्रामपंचायतीने विविध माध्यम, शासनाचे ॲप, पोर्टल यांचा सुलभ रितीने वापर केला आहे. तसेच रोहिणी ग्रामपंचायतीला राज्य शासनाकडून महाऑनलाइन आयडी प्राप्त झाला आहे, त्याद्वारे साधारण ९५६ आणि अन्य सुविधा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पुरविल्या जात आहेत. त्याचप्रमाणे रोहिणी ग्रामपंचायतीत महिला व बालकल्याण, शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन या विभागांतर्गत ऑनलाइन प्रणालीचा उपयोग सेवा वितरित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे, या ग्रामपंचायतीने निर्णय, मेरी ग्रामपंचायत, चॅट जीपीटी या आधारे ग्रामस्थांना सहभागी करून घेतले आहे. तसेच ग्रामपंचायतीने विविध प्रकारच्या लिंक यु-ट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम या माध्यमातूनदेखील शेअर केल्या आहेत.

## डिजिटल कार्यक्षमतेचा वापर

रोहिणी ग्रामपंचायतीकडून जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची सेवा ग्रामपंचायतस्तरावर स्वयंचलितपणे आणि पूर्णपणे ऑनलाइन माध्यमातून दिली जात आहे. महाराष्ट्र



लोकसेवा हक्क कायदा २०१५ अंतर्गत विहित केलेल्या सात कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीत नागरिकांना ही सेवा प्रदान केली जात आहे. अर्ज प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, त्यांना ग्रामपंचायतीत प्रत्यक्ष उपस्थित न राहता त्यांच्या व्हॉट्सॲप किंवा ई-मेलद्वारे मृत्यू प्रमाणपत्र वितरित करण्यात येते. रोहिणी ग्रामपंचायतीद्वारे जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांची डिजिटल सेवा केवळ नागरिककेंद्रित आणि पारदर्शकच नाही, तर ग्रामीण पातळीवर डिजिटल कार्यक्षमता आणि तांत्रिक स्वावलंबनाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. या प्रणालीकडे गावपातळीवर एक प्रभावी सार्वजनिक सेवा वितरणाचे प्रारूप (मॉडेल) म्हणून पाहिले जात आहे.



## घरबसल्या डिजिटल सेवा

रोहिणी ग्रामपंचायतीतर्फे शाळा, आरोग्य, अंगणवाडी, कृषी सेवा आदींमध्ये ई-गव्हर्नन्स प्रणालीचा वापर केला जात आहे. या डिजिटल सेवा प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. नागरी सेवांमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता आणि सुलभता लक्षात घेऊन ग्रामपंचायतींकडून जन्म प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. ही सुविधा विशेषतः दुर्गम, आदिवासी भागांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे. ग्रामपंचायतीने त्यांच्या संकेतस्थळावर लिंक दिली आहे. या माध्यमातून नागरिक घरी बसून ऑनलाइन अर्ज करू शकतात. अर्ज प्रक्रियेदरम्यान ऑनलाइन शुल्क भरण्याची सुविधादेखील उपलब्ध आहे, ज्यामुळे संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पूर्ण होते. दोन्ही पोर्टल वापरकर्ता-अनुकूल, अंतर्ज्ञानी नेव्हिगेशन, कमी कालावधीसाठी सेवा देणारा, मोबाइल फ्रेंडली, नागरिक-केंद्रित आहेत. या उपक्रमातून आदिवासी पेसा गावदेखील डिजिटल इंडियाचे स्वप्न साकार करू शकते, हा संदेश रोहिणी ग्रामपंचायतीने दिला आहे.

## माध्यमांनी घेतली दखल

रोहिणीसारख्या दुर्गम भागातील ग्रामपंचायतीला राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार मिळताच राष्ट्रीय पातळीवरील माध्यमांनीदेखील दखल घेतली. एवढेच नव्हे, तर विविध माध्यम प्रतिनिधींनी नुकतीच या गावाला भेट देऊन तेथील ऑनलाइन सेवांची सद्य:स्थिती समजून घेतली. तसेच तेथील सोयी-सुविधांची पाहणी केली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नरवाडे यांच्यासह उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश मोरे (ग्रामपंचायत), जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय फडोळ, शिरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रदीपकुमार पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संदीप निकम, तालुका कृषी अधिकारी संजय पवार, रोहिणी ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ. आनंद पावरा, उपसरपंच वसंत पावरा, ग्रामसेवक आर. के. कुमावत यांनी रोहिणी ग्रामपंचायतीतर्फे देण्यात येणाऱ्या विविध सेवांची माहिती माध्यम प्रतिनिधींना दिली.

**(जिल्हा माहिती अधिकारी, धुळे.)**

**महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या वतीने महाराष्ट्राचे पुत्र आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. चार मुख्य स्तंभ असलेल्या आपल्या लोकशाही व्यवस्थेतील एका स्तंभाने दुसऱ्या स्तंभाचा सन्मानपूर्वक गौरव केल्याचे अनोखे उदाहरण म्हणजे हा सोहळा म्हणता येईल.**

# सरन्यायाधीशांचा हृद्य सत्कार!

**किरण वाघ**



महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांच्या वतीने महाराष्ट्राचे पुत्र आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. चार मुख्य स्तंभ असलेल्या आपल्या लोकशाही व्यवस्थेतील एका स्तंभाने दुसऱ्या स्तंभाचा सन्मानपूर्वक गौरव केल्याचे अनोखे उदाहरण म्हणजे हा सोहळा म्हणता येईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे व उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या कार्यक्रमात सरन्यायाधीश गवई यांच्या कार्याचा उल्लेख केला. सत्कार सोहळ्यास उत्तर देताना त्यांनी केलेले भाषण हे राज्यघटनेवरील सोपे, सहज, सुंदर विवेचन होते. शेवटी त्याला सभागृहात उपस्थित सर्व मान्यवरांनी उभे राहून दाद दिली.

महाराष्ट्राच्या सुपुत्राने सर्वोच्चपद गाठल्याने राज्याला अभिमान वाटतो. गवई यांच्या निर्णयांमध्ये मानवता आणि संवेदनशीलता आढळते, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या नियुक्तीबद्दल व्यक्त होताना काढले. नागपूरमधील झोपडपट्टी प्रकरणात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात जाऊन त्यावर तोडगा काढून स्थगिती मिळवून दिली. टायगर कॉरिडॉर प्रकरणात समिती नेमून त्यांनी अडकलेला विकास मार्गी लावला. न्या. गवई हे चर्चेच्या माध्यमातून निर्णय घेणारे आणि व्यापक जनहित डोळ्यासमोर ठेवणारे न्यायाधीश आहेत. अमृतमहोत्सवी वर्षात त्यांच्या योगदानाची नोंद इतिहासात होईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी गवई यांच्या संघर्षशील प्रवासाची, अभ्यासू वृत्तीची आणि सामाजिक बांधिलकीची आठवण करून दिली.

अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांना सर्वोच्च न्यायालयाने कायम दिलेल्या प्रतिष्ठेचा उल्लेख करत कृतज्ञता व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी न्या. गवई यांच्या न्यायनिर्णयांमधील संवेदनशीलता आणि संविधाननिष्ठेचे कौतुक केले. त्यांनी सामाजिक समतेसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत न्या. गवई यांच्यामुळे न्यायमंडळातील माणुसकीचे मूल्य अधोरेखित झाले, असे स्पष्ट केले.

तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकशाहीतील तीन प्रमुख स्तंभांमध्ये सुसंवाद आणि परस्पर सन्मानाची गरज अधोरेखित केली. विधिमंडळाकडून न्यायमंडळाचा होत असलेला सत्कार हा लोकशाहीच्या एका स्तंभाने दुसऱ्या स्तंभाचा केलेला गौरव आहे, असे नमूद केले.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी न्या. गवई यांच्या कार्याची प्रशंसा केली, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. याप्रसंगी उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची उपस्थित होती.

## भारतीय राज्यघटना ही रक्तविहीन क्रांती

भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून स्वातंत्र्य, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, समानता, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मता या तत्त्वांचा डॉ. बाबासाहेब

आंबेडकर यांनी दृढ आग्रह धरला. त्यावेळेस आपण घटना समितीमध्ये असू किंवा मसुदा समितीचे अध्यक्ष होऊ, हेदेखील त्यांना माहीत नव्हते, मात्र त्यांच्या दूरदृष्टीने सर्वांच्या हक्कांचे रक्षण करण्याची मोठी मांडणी केली.

## मूलभूत अधिकारांची हमी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेतील मूलभूत अधिकार या तत्त्वाच्या उल्लेखाची गरज प्रकर्षाने व्यक्त केली होती. नागरिकांना मूलभूत अधिकार देण्याबाबत उल्लेख करताना त्यांनी नागरिकांच्या या मूलभूत अधिकारांचे हनन होत असेल, तर त्यासाठी उपायदेखील राज्यघटनेमध्ये दिला जावा. याशिवाय ते उपयोगाचे ठरणार नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले होते. हेच विचार पुढे जाऊन संविधानाचा आत्मा ठरले. २२ जुलै १९४७ रोजी त्यांची घटना समितीवर निवड झाली. देशाचे प्रथम प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुढाकाराने तयार झालेला राज्यघटनेतील 'ऑब्जेक्टिव्ह प्रिन्सिपल्स' मसुदा ४ नोव्हेंबर १९४८ रोजी सादर करण्यात आला. मसुदा समितीचे अध्यक्षपद बाबासाहेबांना देण्यात आले. भारतीय राज्यघटनेचा मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारला गेला आणि २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना देशात अमलात आली. प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा गौरव करताना म्हटले की, एकट्याने ही जबाबदारी पेलणे म्हणजे असामान्य कार्य आहे.

## एकच राज्यघटना, एक नागरिकत्व

भारतीय राज्यघटनेची निर्मिती करताना त्यांनी अमेरिकेप्रमाणे संघराज्यासाठी वेगळी आणि राज्यांसाठी वेगवेगळ्या स्वतंत्र घटना नको, असा विचार मांडला. 'एक देश, एक नागरिकत्व, एक संविधान' या तत्त्वावर त्यांनी भर दिला. संविधानात कायदेमंडळ, कार्यकारी आणि न्यायपालिका या तीन स्तंभांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करण्यात आल्या. संसद, विधिमंडळे कायदे बनवतील, कार्यकारी यंत्रणा अंमलबजावणी करतील, तर न्यायव्यवस्था कायद्याच्या पालनावर लक्ष ठेवेल.



## सामाजिक परिवर्तनासाठी कायदे

सरन्यायाधीश गवई यांनी स्पष्ट केले की, राज्यघटनेतील सशक्त तरतुदींमुळे नागरिकांचे मूलभूत अधिकार सुरक्षित राहतात. सामाजिक न्यायासाठी आरक्षण, अॅट्रॉसिटी अॅक्ट, कामगार कायदे, जमिनीच्या मालकीसंदर्भातील सिलिंग कायदे (टेनन्सी अॅक्ट) महत्त्वपूर्ण ठरले आहेत. मागास घटक व मागास वर्गासाठी केलेल्या तरतुदींमुळे समाजात समता प्रस्थापित होण्यास मदत झाली. यामुळे कसणाऱ्यांना जमीन मिळाली, गरीब कुळांना उपजीविकेचे साधन मिळाले. महिलांना, अनुसूचित जाती-जमातींना आणि इतर मागासवर्गीय घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा मार्ग खुला झाला.

## स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आणि सामाजिक न्याय

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त, देशाने लोकशाहीच्या ७५ वर्षांचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या काळखंडात संसद व राज्य विधिमंडळांमधून अनेक कायदे झाले. महिलांनी राष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, पोलीस महासंचालक अशा सर्वोच्च पदांवर काम केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या देशाच्या सर्वोच्चपदी आहेत. इंदिरा गांधी, के. आर. नारायणन यांनी देखील देशाची सर्वोच्च पदे भूषवली. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला केला होता. त्याच पद्धतीने राज्यघटना महिलांसाठी, मागास घटकांना सामाजिक न्यायाची फलश्रुती देणारी आणि उत्कर्षाची संधी निर्माण करणारी आहे.

## राज्यघटना ही रक्तविहीन क्रांती

घटनेच्या अनुच्छेद-१२चा संदर्भ देत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना ही रक्तविहीन सामाजिक क्रांती आहे, असे नमूद केले होते. याचे उदाहरण देताना सरन्यायाधीश गवई म्हणाले, ३० ते ४० वर्षांपासून रहिवासामध्ये असलेल्यांना अथवा उपजीविकेसाठी शेती करणाऱ्यांचे साधन आपण काढून घेत असू, तर त्यांना स्वाभिमानाने जगण्यापासून आपण वंचित करतो, हे निश्चितच राज्यघटनेला अभिप्रेत नाही. न्यायालयीन आदेशाने नागपूरमधील हजारो झोपडपट्टीधारकांना बेघर होण्यापासून वाचविण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, तत्कालीन लोकप्रतिनिधी आमदार आणि सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रयत्न केले. आम्ही ते थांबवू शकलो. हे संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांमुळे शक्य झाले.

## संविधानात्मक पदावरील जबाबदारी

'मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्व' ही राज्यघटनेचा आत्मा आहे. संवैधानिक पदावर काम करताना यांचा समतोल साधत समाजाची सेवा करण्याची संधी मिळणे आणि लोकशाही शतकपूर्तीकडे वाटचाल करत असताना देशाच्या सरन्यायाधीशपदावर पोहोचणे, हे मी भाग्य समजतो.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर व्यक्तिमत्त्वांनी देशात सामाजिक आणि आर्थिक समानतेसाठी भरीव कार्य केले, याचा उल्लेख सरन्यायाधीश गवई यांनी केला. माझ्या वडिलांनी याच विधिमंडळात उपाध्यक्ष आणि सभापती म्हणून काम पाहिले होते. त्यामुळे येथे मिळालेला सन्मान 'न भूतो, न भविष्यति' असा आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या वतीने दिलेला सन्मान महाराष्ट्रातील १२ कोटी ८७ लाख जनतेच्या आशीर्वादाचे प्रतीक आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी)

**महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. हे केवळ आर्थिक स्थैर्यासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील गरिबी कमी करण्यासाठी आणि पर्यावरणीय शाश्वतता साधण्यासाठीदेखील आवश्यक ठरणार आहे. शेती ही केवळ जमीन जोपासण्यापुरती मर्यादित न राहता, ती समग्र ग्रामीण जीवनशैलीचा भाग आहे. पशुपालन हा त्यातील एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक निर्णय नसून सामाजिक न्याय आणि समावेशक विकासाचा मार्ग आहे.**

# पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा

**नंदकुमार वाघमारे**

महाराष्ट्र हे देशातील सर्वांत मोठ्या कृषिप्रधान राज्यांपैकी एक आहे. राज्यातील सुमारे ५५ टक्के लोकसंख्या थेट शेतीवर आणि संबंधित व्यवसायांवर अवलंबून आहे. शेतीसोबतच पशुपालन हेदेखील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. मात्र, दीर्घकाळापासून पशुपालनाला स्वतंत्र व्यवसाय म्हणून मान्यता असूनही, शासनाच्या धोरणांमध्ये त्याला अद्याप पुरेसा प्राथमिक दर्जा मिळालेला नाही. त्यामुळे पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी पशुसंवर्धन विभागाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची अनेक पशुपालकांबरोबरच राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आग्रही मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी सकारात्मक पाठिंबा दर्शविला आहे. पावसाळी अधिवेशनात पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी हा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला. पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा लोकाभिमुख निर्णय घेणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ७६.४१ लाख पशुपालक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असून, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मेंढी-शेळीपालन, वराहपालन; तसेच पशुपालनाशी निगडित मूल्यवर्धित प्रकल्प यांसारख्या व्यवसायांना आता कृषी क्षेत्रातीलच सवलती व लाभ मिळणार आहेत.

## पशुपालन सामाजिक स्थैर्याचा आधार

भारताची अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून शेतकरी हा तिचा कणा मानला जातो. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठ्या क्षेत्रांपैकी एक आहे, जे भारताच्या ११.६ टक्के पशुधनासह जगाच्या पशुधनात मोठा वाटा उचलते. ग्रामीण भागातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या शेती व संलग्न व्यवसायांवर अवलंबून आहे. त्यामुळे पशुपालन, कुक्कुटपालन, मेंढी-शेळीपालन यांसारखे व्यवसाय केवळ आर्थिकस्रोत नसून सामाजिक स्थैर्याचेही आधार आहेत.

पशुपालनातून मिळणारे नियमित उत्पन्न हे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे ठरते. ज्या भागांमध्ये पशुपालनाचा प्रसार अधिक आहे, तेथे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ७९ टक्क्यांनी घटल्याचे निदर्शनास आले आहे. याच कारणास्तव केंद्र सरकारने आत्महत्याग्रस्त भागात एकात्मिक शेती प्रणाली, मत्स्य व पशुपालन पॅकेज लागू केले आहे. केंद्रीय कुक्कुट संशोधन संस्था (ICAR) च्या संशोधनानुसार, १.२५ हेक्टर जमिनीवर एकात्मिक शेती प्रणालीद्वारे सुमारे ५८,३६० रुपये उत्पन्न आणि ५७३ दिवस रोजगार मिळतो. यातूनच शेतीसोबत पशुपालन केल्यास आर्थिक व सामाजिक स्थैर्य साधता येते, हे दर्शविते.

## पशुजन्य उत्पन्नाचा वाटा

महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे कृषिप्रधान राज्य आहे. राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीबरोबरच कृषिसंलग्न क्षेत्रे जसे पशुपालन, मत्स्यपालन तसेच फळफळावळ-भाजीपाला उत्पादनासारख्या पूरक क्षेत्रांशी जोडलेली आहे. कृषी हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, जे राज्याच्या अंदाजे ५० टक्के लोकसंख्येला रोजगार देते. महाराष्ट्रातील कृषिक्षेत्र हे ७-८ टक्के दराने वाढले आहे. महाराष्ट्राचा वार्षिक वाढीचा दर अंदाजे ८-९ टक्के इतका आहे. महाराष्ट्र राज्याचा भारतातील सकल राष्ट्रीय उत्पन्नातील (जीडीपी) वाटा अंदाजे १३ टक्के आहे.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने जे घटक उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे आठ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये कृषी व संलग्न या घटकांचा समावेश आहे. सद्य:स्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून, कृषी क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. राज्याच्या सकल उत्पन्नात (जीडीपी)



पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा देणे हा ऐतिहासिक निर्णय असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला यामुळे गती प्राप्त होईल. या निर्णयामुळे शाश्वत शेतीला चालना मिळेल. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७६ लाख कुटुंबे पशुपालन व्यवसायात असून त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. या निर्णयामुळे राज्यात पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती होईल.

**- पंकजा मुंडे, मंत्री,**
**पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य.**

अवघ्या सहा जिल्ह्यांचा ५६ टक्के वाटा असून, उर्वरित ३० जिल्ह्यांचा वाटा केवळ ४४ टक्के आहे. ही असमतोल स्थिती दूर करण्यासाठी पशुपालन हा आर्थिक समावेशनाचा महत्त्वाचा मार्ग ठरतो.

दुग्धव्यवसाय, मेंढी-शेळीपालन आणि कुक्कुटपालन या व्यवसायांतून केवळ शेतकरीच नव्हे, तर संबंधित औषध, खाद्य, सेवा पुरवठादार कुटुंबांनाही उपजीविका मिळते. राज्यात १९५ लाख गोवंशीय व म्हशी आहेत, तर सुमारे १ कोटी शेळ्या व २६ लाख मेंढ्या आहेत. हे पशुधन शेकडो कुटुंबांच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कुक्कुटपालनातही राज्य अग्रेसर असून ७.४ कोटी पक्षी नोंदणीकृत आहेत.

## पशुपालन स्वतंत्र आधार

गेल्या काही दशकांत कृषी उत्पन्नात होणाऱ्या चढ-उतारांमुळे अनेक शेतकऱ्यांनी पशुपालनाचा आधार घेतला. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, कुक्कुटपालन, वराह पालन यांसारख्या व्यवसायांनी शेतकऱ्यांच्या घरात रोजचा खर्च भागवण्यास हातभार लावला आहे. दुग्धव्यवसायातून निर्माण होणारे उत्पादन, अंडी, मांस, लोकर, शेणखत या सर्व गोष्टींची बाजारात वाढती मागणी असताना, या क्षेत्रासाठी शासनाच्या धोरणात मात्र मर्यादित सहभाग दिसून येतो.

नीती आयोगाच्या अहवालानुसार पशुसंवर्धनाचा जीडीपीतील वाटा ४ टक्के असून तो वाढवण्यासाठी नियोजनबद्ध गुंतवणूक व धोरण राबवणे आवश्यक आहे. २०३० पर्यंत भारतात दूध, अंडी, मांस यांची मागणी अन्नधान्यापेक्षा अधिक असणार आहे. त्यामुळे पशुपालनाला धोरणात्मक महत्त्व देणे अपरिहार्य होते.

सद्यःस्थितीत दूध, अंडी व मांस यांचे उत्पादन व उपलब्धता विचारात घेता २०३० पर्यंत दूध, अंडी व मांस यांची एकूण मागणी १७ कोटी टन इतकी असून ही मागणी तृणधान्याच्या मागणीपेक्षा अधिक आहे. पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपूर्वक व शास्त्रीय पद्धतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असल्याकडेही नीती आयोगाने लक्ष वेधले असून त्यावर उपाययोजना करून शेतकऱ्यांची / पशुपालकांची आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली आहे. पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषी वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याजदराच्या तुलनेत अधिक व्याजदराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. पशुपालक व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषी व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देणे हा महत्त्वाचा पर्याय होता. त्यामुळेच पशुसंवर्धनाला कृषी समकक्ष दर्जा देण्याची भूमिका पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडली.

## पशुधनाची आकडेवारी

- महाराष्ट्रात सुमारे १ कोटी ९० लाख जनावरे असून त्यातील ८० टक्के ग्रामीण भागात आहेत.
- राज्याचे वार्षिक दुग्ध उत्पादन १ कोटी टनांहून अधिक असून त्यातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो.
- पशुपालनातून सध्या २ कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष पद्धतीने रोजगारात गुंतलेली आहे.

## पशुपालनास कृषी समकक्ष दर्जा मिळाल्यास :

- पशुपालन व्यवसाय आता कृषी क्षेत्राशी समकक्ष मानला जाईल.
- **वीज दरात सवलत :** या निर्णयांमध्ये २५ हजार मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५० हजार अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्या; तसेच ४५ हजार क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसायासाठी, १०० दुधाळ जनावरांचे संगोपन, ५०० मेंढी किंवा शेळीपालन आणि २०० वराह या पशुसंवर्धनविषयक व्यवसायासाठी वीजदर आकारणी 'कृषी इतर' या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात आली.
- **सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अनुदान :** कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.
- **व्याज दरात सवलत :** कृषीप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.
- **ग्रामपंचायत करात एकसमानता :** पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्यासाठी, कृषी व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.
- **अंमलबजावणीसाठी निधी :** योजनेच्या राबवणीसाठी आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणार.

या निर्णयामुळे पशुपालक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात प्रत्यक्ष वाढ होईलच; पण औषध उत्पादक कंपन्या, खाद्य उत्पादक कंपन्या, दूध संकलक आणि प्रक्रिया उद्योग, विक्रेते, वाहतूकदार यांसारख्या अप्रत्यक्षपणे संबंधित व्यवसायांनाही चालना मिळणार आहे. तसेच यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होऊन अर्थव्यवस्था बळकट होण्यास मदत होईल. महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी पशुपालन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. हे केवळ आर्थिक स्थैर्यासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील गरिबी कमी करण्यासाठी आणि पर्यावरणीय शाश्वतता साधण्यासाठीदेखील आवश्यक ठरणार आहे. शेती ही केवळ जमीन जोपासण्यापुरती मर्यादित न राहता, ती समग्र ग्रामीण जीवनशैलीचा भाग आहे. पशुपालन हा त्यातील एक अविभाज्य घटक आहे. त्यामुळे पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय हा केवळ आर्थिक निर्णय नसून सामाजिक न्याय आणि समावेशक विकासाचा मार्ग आहे.

कृषी समकक्ष दर्जा दिल्यामुळे महाराष्ट्रातील कोट्यवधी पशुपालकांना मुख्य प्रवाहात आणता येईल आणि त्यातून महाराष्ट्रातील दुग्ध उत्पादन, रोजगार निर्मिती आणि ग्रामीण विकासाला नवे बळ मिळेल, यात शंका नाही.

**(सहायक संचालक (माहिती))**

**मराठीचा आद्यग्रंथ 'लीळाचरित्र' आणि आद्यपद्य 'धवळे'निर्मितीचा मान महानुभावाकडे आहे. 'महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र' अशी महाराष्ट्राची थोरवी आणि त्याची व्याप्ती महानुभावांनी सांगितली. मानवी मूल्यांना नवसंजीवनी देण्यासाठी श्री चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान, कार्याची ओळख समाजाला करून देण्यासाठी भाद्रपद शुद्ध द्वितीया हा दिवस उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे.**

# जीवनमूल्यांचे रक्षक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी

**हरिहर पांडे**

महाराष्ट्राच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक जडणघडणीत अनेकांनी योगदान दिले; पण समाजसुधारणेची सुरुवात करणारे, मराठीला देवभाषेचा मान देऊन मानवतेचा संदेश देणारे महानुभाव पंथ प्रवर्तक भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे अमूल्य योगदान आहे. स्वामींनी सांगितलेल्या सत्य, अहिंसा, मानवता, समानता या विचारांचा जागर सर्वत्र व्हावा, या हेतूने महाराष्ट्र शासनाने 'भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिना'बाबत २९ एप्रिल २०२५ रोजी स्वतंत्र परिपत्रक निर्गमित केले. श्री चक्रधर स्वामींचे जीवोद्धारक विचार, तत्त्वज्ञान, मानवतावादी कार्य, अलौकिक मराठी साहित्य आणि सामाजिक योगदानाची माहिती संपूर्ण विश्वाला करून देण्याकरिता भाद्रपद शुद्ध द्वितीया हा दिवस उपयुक्त ठरेल असा, शासनाला विश्वास आहे. या शासन निर्णयाचे राज्यातील तीन टक्के, देशातील दीड कोटी आणि जगभरात कोट्यवधी संख्येने असणाऱ्या महानुभावपंथीय साधकांसह मराठी सारस्वतानेही स्वागत केले आहे.

श्री चक्रधर स्वामींनी गुजरातमधील भडोच नगरीचे प्रधान विशालदेव व माता माल्हनीदेवी यांच्या घरी १२व्या शतकात अवतार घेतला. वयाच्या २५व्या वर्षापर्यंत समर्थपणे राज्यकारभार केल्यानंतर रामटेक यात्रेनिमित्त महाराष्ट्रात आले. मानव समाज वर्णव्यवस्थेच्या बंधनात बंदिस्थ होता. अशा काळात श्री चक्रधर स्वामींनी महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानले. असहाय समाजाचे अवलोकन करून समतेच्या अधिष्ठानावर



आधारित नवमतांचे प्रतिपादन केले. जीवाला परमेश्वराचा आनंद देण्यासाठी या सृष्टीची निर्मिती आहे, परमेश्वरीय तत्त्वज्ञानाने हा आनंद जीवाने प्राप्त करून घ्यावा, असे श्रीचक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान सांगते. परमेश्वरप्राप्ती हीच नित्यमुक्ती आहे. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार नित्यवस्तूंची ही सृष्टी आहे. परमेश्वराची प्राप्ती होणे, हाच जीवाचा खरा मार्ग आहे. मोक्षाची इच्छा असेल, तर जीवाने परमेश्वराची अनन्य उपासना करावी, असे प्रतिपादन केले. श्री चक्रधर स्वामींनी तत्त्वज्ञानासोबतच सामाजिक चालीरितींवरही भर दिला. सत्य बोलावे, प्राणीमात्रांवर दया करावी, कुणाचेही अंतःकरण दुखवू नये, भीती दाखवू नये, अभद्र बोलू नये, अपमान करू नये यासह समाजातील अंधश्रद्धा, उच्च-नीचता, विटाळ, वर्णावर्ण, स्पृश्यास्पृश्यता, स्त्रियांना असमान वागणूक अशा अनेक अनिष्ट प्रथा बंद करून सर्वांना मोक्षाचा अधिकार बहाल केला. समाजात रुंदावत जाणारी दरी समाप्त करून एकात्मतेचे गुह्यातीगुह्य सर्वसमावेशक तत्त्व प्रतिपादन केले. प्राणीमात्रांवर दया करणे, माणसाने माणसाशी माणूस म्हणून वागावे, हा जागतिक संदेश दिला.

समाजाने शतकानुशतके ज्यांना आपल्याजवळही फिरकू दिले नाही, अशा झाडी, गोंड वाड्यातील आदिवासींबरोबरही स्वामी राहिले. त्यांच्या बांबूच्या काड्यांवर शिजलेला भात स्वामींनी प्रीतीपूर्वक स्वीकारला. जोगेश्वरीला असताना एका मातंगाला स्वामींना भेटण्याची तीव्र इच्छा होती. स्वामी मंदिराबाहेर त्याला येऊन भेटले. त्याने भेटीदाखल स्वामींना एक लाडू दिला. श्री चक्रधर स्वामींनी त्याचा हात धरून मंदिरात आणले आणि त्याने दिलेला तो लाडू स्वामींनी सर्व भक्तजनांना वाटला. ही त्या काळातील प्रचंड मोठी क्रांती होती. सालबर्डीच्या डोंगरात स्वामींच्या आश्रयाला आलेल्या सशाची मागणी करणाऱ्या पारध्यांना स्वामी सांगतात, 'हा ससा तुमचा नाही. तुम्ही जीव प्राणी आहात, तसा तोसुद्धा प्राणी आहे.' असा उपदेश श्री चक्रधर स्वामींनी करताच त्यांच्या मनातील दुष्ट भावना नष्ट झाली. स्वामींनी त्या सशाला 'जा महात्मे हो' असे संबोधले. जीवमात्रांविषयी अपार करुणा असल्याचे स्वामींच्या अनेक लीळांतून दिसून येते. अशा अनेक लीळांची माहिती 'लीळाचरित्रा'त मिळते.

संपूर्ण महाराष्ट्रात श्रीक्षेत्र पैठणला अनेक विद्वान, संत, समाजमान्य, सर्वसामान्य मंडळी स्वामींचे भक्त झाले. पैठण, रामटेक, सालबर्डी, भंडारा, डाकराम, रिद्धपूर, राहेर,

नांदेड, वेरूळ, सिन्नर, बीड, कनाशी, जालना, पांचाळेश्वर, खडकुली, डोमेग्राम, नेवासा, श्रीरामपूर, बेलापूर इत्यादी असंख्य ठिकाणच्या परिभ्रमण काळात महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मांचे लोक स्वामींजवळ आले. त्यात प्रामुख्याने नागुबाईसा, महानुभाव पंथाचे पहिले आचार्य श्रीनागदेव, मराठी साहित्यातील आद्यचरित्र ग्रंथ लिहिणारे पंडित श्री म्हाइंभट्ट, नाथोबा, साधाईसा, आऊसा, मराठीतील आद्य कवयित्री महदंबा, सारंगपंडित आदींचा समावेश आहे. श्रीचक्रधर स्वामींनी भक्तांना अध्यात्माची शिकवण देत असताना सत्य, अहिंसा, मानवता, समानता ही जगण्याची जीवनमूल्ये सांगितली.

धर्माचे ज्ञान संस्कृत भाषेत बंदिस्थ झालेल्या काळात सर्वसामान्यांना ज्ञानाची दारे खुली करून दिली. धर्मज्ञानाच्या तात्त्विक व्यवहाराबरोबरच दैनंदिन व्यवहारातही मराठीचा आग्रह धरला. मराठी लोकभाषेला धर्मभाषेचा दर्जा देऊन राजसिंहासनावर बसविले. तोच आदर्श श्री चक्रधर स्वामींच्या उत्तरापंथे गमनानंतर शिष्यपरिवारानेही डोळ्यांपुढे ठेवला. स्वामींच्या स्मरण भक्तीतून ग्रंथराज 'लीळाचरित्र' ग्रंथ तयार झाला. महदंबेसारखी आद्य कवयित्री मराठी भाषेला मिळाली. या ग्रंथांतून महानुभावांनी ६५०० ग्रंथ निर्माण केले. येथूनच मराठी साहित्यपरंपरेची सुरुवात झाली. मराठी आत्मीयतेच्या भावनेमुळे विविध साहित्य प्रकारांत महानुभावांनी रचना करून मराठी साहित्य समृद्ध केले. स्मृति-संकलनात्मक गद्यचरित्र ग्रंथ ही महानुभावांची मराठी साहित्यास लाभलेली महत्त्वाची देणगी आहे. महानुभाव साहित्यात चरित्रे, सूत्रात्मक, टीकात्मक, न्याय-व्याकरणादि शास्त्रे, क्षेत्र व व्यक्तिमहात्म्य वर्णने, स्तोत्रे इ. प्रकारचा समावेश आहे.

निरनिराळ्या काळात पंथातील प्रतिभासंपन्न कवींनी लिहिलेल्या सात काव्यांना साती ग्रंथ म्हटले जाते. मराठी लोकभाषा, राजभाषा, ज्ञानभाषा आणि महानुभावांची धर्मभाषा आहे. मराठीत प्रथमच ग्रंथबद्ध झालेली, 'एक होता कावळा, नि एक होती चिमणी...' आजही प्रत्येक घरात सांगितली जाणारी ही गोष्ट पहिल्यांदा 'लीळाचरित्रा'त लिहिली गेली. मराठीचा आद्यग्रंथ 'लीळाचरित्र' आणि आद्यपद्य 'धवळे' निर्मितीचा मान महानुभावाकडे आहे. 'महाराष्ट्र म्हणजे, महंत राष्ट्र' अशी महाराष्ट्राची थोरवी आणि त्याची व्याप्ती महानुभावांनी सांगितली. मानवी मूल्यांना नवसंजीवनी देण्यासाठी श्री चक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान, कार्याची ओळख समाजाला करून देण्यासाठी भाद्रपद शुद्ध द्वितीया हा दिवस उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे.

**(लेखक या विषयाचे अभ्यासक आहेत.)**

# प्रत्येक जिल्ह्यात 'सिट्रीपलआयटी' केंद्र

राज्यातील युवकांना रोजगाराभिमुख व आधुनिक तंत्रज्ञानाधिष्ठित प्रशिक्षण मिळण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲण्ड ट्रेनिंग' अर्थात 'सिट्रीपलआयटी' केंद्र उभारण्यात यावे. या केंद्रासाठी एमआयडीसीमार्फत आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात यावी, यासाठी आवश्यक असणारा १५ टक्के निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. राज्यात सध्या दहा केंद्रे मंजूर असून, उर्वरित २६ जिल्ह्यांमध्येही याच धर्तीवर 'सिट्रीपलआयटी' केंद्रे उभारण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



राज्यातील तरुणांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळावे, त्यांच्यामध्ये कौशल्यवृद्धी होऊन ते रोजगारक्षम व्हावेत, यासाठी कोणतीही तडजोड करण्यात येणार नाही. त्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक 'सिट्रीपलआयटी' केंद्र उभारण्यात यावे. राज्यात सध्या दहा ठिकाणी 'सिट्रीपलआयटी' केंद्रे मंजूर करण्यात आली असून, उर्वरित २६ जिल्ह्यांमध्ये ही केंद्रे उभारण्यासाठी टाटा कंपनीशी आवश्यक तो समन्वय साधून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, या केंद्राच्या माध्यमातून दरवर्षी हजारो युवकांना एआय, ऑटोमेशन, रोबोटिक्स, मशीन लर्निंग अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळणार आहे.

या प्रकल्पांमुळे राज्यात उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होणार असून नवउद्योजकांना प्रोत्साहन मिळणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात उद्योगस्नेही वातावरणाची पायाभरणी होणार आहे. युवकांचे कौशल्यवर्धन, रोजगार व स्वयंरोजगारासाठी यामुळे मोठी चालना मिळणार आहे. या केंद्रांसाठी आवश्यक असणारी जागा एमआयडीसीने द्यावी. तसेच केंद्राची जागा निवडताना ती शहराच्या जवळ असावी, प्रशिक्षणार्थींना सोयीची असावी, याची काळजी घेण्यात यावी. या केंद्रासाठी आवश्यक असणारा १५ टक्के निधी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा नियोजन समितीमार्फत देण्यात येईल.

# विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल



आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांच्या पत्नी सौ. अमृता फडणवीस;
तसेच मानाचे वारकरी उगले दाम्पत्य यांच्या हस्ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात शासकीय महापूजा.





देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त मानाचे वारकरी ठरलेले कैलास दामू उगले व त्यांच्या पत्नी सौ. कल्पना कैलास उगले यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

R.N.I.No. 14140

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## अधिकृत–विश्वासार्ह–वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**केशव करंदीकर**
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२.

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक केशव करंदीकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई – ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह